


कनिष्ठ महाविद्यालयाचे नियतकालिक १९७७·७८

# परशुरामीय



बळवंत रघुनाथ पाटील. बारावीच्या परीक्षेत बोर्डात शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये अठराव्या क्रमांकाने उत्तीर्ण →



← रोहित श्रीनिवास कावळे. बारावीच्या परीक्षेत बोर्डात साहित्यशाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण.

अकरावीच्या परीक्षेत लक्षणीय यश मिळविलेले साहित्य, शास्त्र आणि वाणिज्य शाखांमधील विद्यार्थी



उभे : ( डावीकडून उजवीकडे ) हेमा भट, रंजना दीक्षित, दीपक कुलकर्णी, रश्मी बर्वे, सुधा म्हैसुरकर

बसलेले : ( डावीकडून उजवीकडे ) विवेक उटगीकर, भालचंद्र पटवर्धन, उप–प्राचार्य डॉ. श्री. र. कावळे, प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर,

प र शु रा मी य

# कनिष्ठ महाविद्यालय वार्षिकांक

१९७७–७८

## संपादक मंडळ

प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर
उपप्राचार्य डॉ. श्री. र. कावळे
उपप्राचार्य म. कृ. केळकर
प्रा. वि. रा. शिरगुरकर

## कार्यकारी संपादक

प्रा. डॉ. श्रीलेखा साने
प्रा. प्रकाश सोमण
प्रा. चंद्रशेखर जोशी

## विद्यार्थी प्रतिनिधी

अजीम खान, १२ वी साहित्य
रोहित कावळे, प्रथम वर्ष साहित्य
अभय कुलकर्णी, १२ वी वाणिज्य
वंदना बोकील, १२ वी शास्त्र
विद्या नित्सुरे, प्रथम वर्ष शास्त्र

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ४६१/४ सदाशिव, शिव-पार्वती, टिळक रस्ता, पुणे ३०.

‘ शिक्षण प्रसारक मंडळी ’च्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा हीरक महोत्सव समारंभ मंगळवार दि. २७ डिसेंबर १९७७ रोजी साजरा झाला. या अविस्मरणीय सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्यमंत्री माननीय श्री. वसंतदादा पाटील हे अध्यक्ष म्हणून आणि भारताचे पंतप्रधान माननीय श्री. मोरारजीभाई देसाई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या अपूर्व प्रसंगी ‘ हीरकस्मृति ’ या ‘ परशुरामीय ’च्या विशेषांकाचे प्रकाशन माननीय पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या शुभ हस्ते आणि ‘ हीरक मुद्रा ’ या हीरक महोत्सवाच्या स्मरणिकेचे प्रकाशन वाणिज्य, नागरी पुरवठा आणि सहकार या खात्याचे केंद्रीय मंत्री माननीय श्री. मोहन धारिया यांच्या शुभहस्ते झाले. या तीनही व्यक्ती म्हणजे या समारंभाची खास भूषणे होती असे म्हणता येईल.

हीरक महोत्सव
२७ डिसेंबर १९७७

**स्मृतिचित्रे**




........विद्या आणि विद्यार्थी यांच्याबद्दल शिक्षकांना वाटणारी कळकळ आणि शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना वाटणारा आदर–दोन्ही महत्त्वाचे आहे......विद्यार्थ्यांचे कर्तृत्व, गुण–अवगुण यांचा परीक्षा हा एकच निकष असेल तर...... विद्यार्थ्यांना परीक्षार्थी आणि शिक्षकांना परीक्षक होण्यावाचून गत्यंतरच राहणार नाही......गाइडसूचे प्रकाशक, परीक्षक आणि परीक्षार्थी; सगळेच ‘ गाइडा ’वलंबी झाले आहेत......

—माननीय पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई

हीरक महोत्सव
२७ डिसेंबर १९७७

**स्मृतिचित्रे**



'हीरकस्मृति' प्रकाशन : माननीय पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांच्या शुभहस्ते

हीरक महोत्सव
२७ डिसेंबर १९७७

**स्मृतिचित्रे**



' हीरक मुद्रा ' प्रकाशन :
केंद्रीय वाणिज्य, नागरी पुरवठा आणि सहकार मंत्री ना. श्री. मोहन धारिया यांच्या शुभहस्ते

# प्राचार्यांचे पत्र

विद्यार्थिमित्रांनो,

नवं वर्ष म्हणजे नवा उत्साह. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे निकाल चांगले लागले त्यामुळे आपल्या या वर्षाच्या कामाला नवीन प्रेरणा मिळणार आहे. आपला कुमार ब. र. पाटील यानं बारावीच्या शास्त्र शाखेत १८ वा क्रमांक पटकावला, तर साहित्य शाखेकडील कुमार रोहित काबळे यानं साहित्य विभागात चौथा क्रमांक मिळवला, आणि स. प. च्या यशाची उज्ज्वल परंपरा कनिष्ठ महाविद्यालयातही रूढ केली. पण याहीपेक्षा अधिक यश आपले विद्यार्थी यापुढील काळात मिळवतील असा माझा विश्वास आहे. अपयशानं निराश न होता स्थिरचित्त वृत्तीने प्रयत्न चालू ठेवल्यास ज्यांना या परीक्षेत अपेक्षित यश मिळू शकलं नाही त्यांना ते पुढील परीक्षेत निश्चित मिळेल.

यंदा आणखी एक ऐतिहासिक घटना आपल्या महाविद्यालयात घडली आहे. वाणिज्य शाखेच्या बारावीच्या वर्गाबरोबर स. प. महाविद्यालयात प्रथम वर्ष वाणिज्य विभागही सुरू झाला आहे. आणखी दोन वर्षांत वाणिज्य विभाग पदवी स्तरापर्यंत पूर्ण होईल. आणि येत्या चार–पाच वर्षांच्या कालावधीत शिक्षण प्रसारक मंडळीचं वाणिज्य महाविद्यालय स्वतंत्र, आधुनिक इमारतीत उभं राहील याची मला खात्री वाटते. गेल्या वर्षी स. प. महाविद्यालयानं आपला हीरक महोत्सव मोठ्या थाटात साजरा केला. त्या समारंभाचं ऐश्वर्य अनेक वर्षे अनेकांच्या लक्षात राहील. स. प. बद्दल केवढं प्रेम आणि सहानुभूती लोकमानसात आहे त्याचा साक्षात्कारी प्रत्यय या निमित्तानं अनेकांना झाला. समाजाला आणि विद्यार्थिजीवनाला उपयुक्त अशा योजना आपण मांडल्या तर लोकांची मदत उत्स्फूर्तपणे मिळते हा अनुभव आहे. तसा प्रयत्न सतत करावा लागेल. कनिष्ठ महाविद्यालयालासुद्धा काही वर्षांतच आपला संसार एका नव्या इमारतीत मांडावा लागेल. कनिष्ठ महाविद्यालयातील आपण सर्व विद्यार्थी स. प. च्या वातावरणाशी एकरूप झालात याचा मला आनंद आणि अभिमान वाटतो. या वातावरणात थोडा धाक असेल पण अनंत प्रेमही आहे, थोडा कडकपणा असेल पण खूप स्वातंत्र्यही आहे. या वयातच आपणास चांगल्या सवयी लागल्या पाहिजेत. नियमित अभ्यास, नियमित व्यायाम, – ही जीवनाची दैनंदिनी झाली पाहिजे. पुढचा काळ अनिश्चिततेचा, धकाधकीचा आहे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि नैतिक तयारीनिशी त्याच्याशी मुकाबला तुम्हाला करावा लागणार आहे. शांतपणे विचार करण्याची, निर्भयपणे निर्णय घेण्याची, आणि निर्धाराने घेतलेला मानसिक निर्णय अमलात आणण्याची तयारी आपणास केली पाहिजे. दैनंदिन जीवनाची धारणा या उद्दिष्टांवर बांधली गेली पाहिजे. सवंगपणा कितीही सोपा आणि आकर्षक वाटला तरी तो टाकून देण्याची तयारी केली पाहिजे.

स. प. महाविद्यालयाचा मीही तुमच्याप्रमाणे एक विद्यार्थी – इथे शिक्षक होण्याची सुवर्णसंधी मला मिळाली. स. प. मधील माझ्या शिक्षकांनी मला दिलेलं विचारधन फार मौलिक आहे. स. प. नं जसं मला घडवलं तसं अनेकांना – माझ्यापेक्षा कितीतरी मोठमोठ्या लोकांना घडवलं. १९३६ पासून गेली बत्तीस वर्षे माझा स. प. शी जवळचा संबंध आला. हा प्रेमसुगंध मला आयुष्यभर पुरणार आहे. त्याचप्रमाणे मला इथे भेटलेले विद्यार्थी – मी त्यांच्यावर अनेकवेळा रागावलो असेन – तेही माझ्यावर माझ्या अनेक गोष्टींकरता रुष्ट झाले असतील. पण आमची परस्परांबद्दलची आपुलकी आणि प्रेम याला कुठेच कधीही तडा गेला नाही. हा स. प. च्या वातावरणचा विशेष आहे. आपणा सर्वांना ही दिंडी पुढे न्यायची आहे. स. प. ची परंपरा राखायची आहे, त्याची कीर्तिध्वजा उंचावत ठेवायची आहे. आपल्या मनोधारणेवर माझा विश्वास आहे. स. प. ची कीर्ती आपल्या कर्तृत्वातून साकार होणार आहे, आणि त्याच्या या कीर्तीतून समाजाला आणि देशाला शैक्षणिक आणि सांस्कृतिक रूप मिळणार आहे. स्वतःला अनुरूप कार्यक्षेत्र निवडा – स्वतःच्या कर्तृत्वावर श्रद्धा ठेवा – स्वार्थ विसरून कामात स्वतःला झोकून द्या. निंदा–स्तुती, यश–अपयश याची खंत सोडून द्या, म्हणजे तुमचं जीवन खऱ्या अर्थाने कृतार्थ होईल.

आपला,

**के. पं. मंगळवेढेकर**, प्राचार्य

श्री. उमेश घोडके पुण्याच्या विद्यार्थिजगतात सर्वांनाच परिचित आहे. उमेश शालान्त परीक्षेत बोर्डात गेल्या वर्षी दुसरा आला. या वर्षी तो आपल्या महाविद्यालयात १२ वी च्या वर्गात शिकत आहे. १९७७ ७८ या वर्षी उमेशने वक्तृत्वादी क्षेत्रांत केलेली कामगिरी स्पृहणीय आहे. त्याचे हे चौफेर कर्तृत्व याहीपुढे असेच फुलत राहील अशी आमची खात्री आहे.



**श्री. उमेश घोडके →**

( १ ) आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व :

( १ ) आचार्य शांतिसागर वक्तृत्वस्पर्धा, सोलापूर—( सप्टेंबर ७७ ) प्रथम क्रमांक ( विषय : जैन धर्मचक्राचे मनोगत )

( २ ) वक्तृत्वोत्तेजक मंडळी, सोलापूर – ( डिसेंबर ७७ ) प्रथम क्रमांक – मराठी व शास्त्रीय विषय.

( २ ) अभिरूप लोकसभा, स. प. म. ( डिसेंबर ७७ )–द्वितीय पारितोषिक.

( ३ ) रोटरी क्लब, सोलापूर–व्याख्यान. ( ६ जानेवारी, ७८ ). विषय : इतर ग्रहांवरील जीवसृष्टी.

( ४ ) अक्षर काव्यसंस्था आयोजित आंतरमहाविद्यालयीन काव्यस्पर्धा ( जानेवारी ७८ ). प्रशस्तिपत्रक.

( ५ ) Indian Physics Association ( Poona chapter ) ( Feb. 78 ). Project competitions : second prize ( subject : astronomical telescope ).
Lecture competitions : second prize ( subject : Exploration of space ).

( ६ ) Skill prize–Jr. College ' Best Orator '–S. P. College ( March 78. )

( ७ ) चिं. श्री. कर्वे लिखित पुस्तकाचे ' माणूस ' साप्ताहिकात परीक्षण. ( २५ मार्च, ७८ ).

( ८ ) संत-बोध मंडळ आयोजित वक्तृत्व स्पर्धा, पुणे. ( द्वितीय क्रमांक ) विषय : संतांविषयी माझे विचार

( ९ ) Member of winner team–Science Quiz competition S. P. College.

# संपादकीय

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांचा 'परशुरामीय' हा वार्षिकांक वाचकांच्या हाती सोपविताना आम्हांला आनंद होतो आहे. शिक्षणक्षेत्रात हस्तलिखित, भित्तीपत्रक, वार्षिकांक या सर्वांनाच एक निश्चित असे आगळे स्थान असते. लेखनकलेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांना जागे करून प्रगट व्हायला वाव मिळावा हा त्यामागील हेतू असतो. एखाद्याला लेखनाची नव्याने प्रेरणाही लाभते. त्यातून उद्याचा एखादा लेखक-कवी घडत जातो. कनिष्ठ विभागाचा स्वतंत्र वार्षिकांक काढण्यामागे आणखीही लाभ आहे. महाविद्यालयाच्या विशाल प्रांगणात नव्यानेच प्रवेश करणाऱ्या आणि म्हणून काहीशा बावरलेल्या विद्यार्थ्यांना लेखनाचे स्वतंत्र व्यासपीठ प्राप्त व्हावे, 'हे आपले स्वतंत्र व्यासपीठ' या जाणिवेने त्यांना अधिक आत्मीयता वाटावी आणि त्याच्यातील संकोचाने किंवा गोंधळून गेल्यामुळे मिटलेल्या गुणांच्या पाकळयांना हळुवार आश्वासक फुंकर मारून उमलण्याची अधिक संधी मिळावी हा लाभ विशेष महत्त्वाचा आहे. मोठ्या विद्यार्थ्यांमध्ये छोटे विद्यार्थी मागे मागे राहण्याची शक्यताही यामुळे नाहीशी होते. आज अशा लाभाचे एक रूप वाचकांपुढे येत आहे.

हे सगळे साहित्य जमविताना आलेल्या अनुभवात एक खंत आहे. ती म्हणजे ज्यांच्यासाठी हा उपक्रम, त्यांच्याकडून पुरेशा उत्साही प्रमाणात दाद मिळत नाही. हा त्यांच्या मनातील संकोच की या उपक्रमाबद्दलची किंवा स्वतःच्या लेखनगुणांना वाव देण्याबाबतची अनास्था? तेव्हा वाटते, काही प्रमाणात संकोच असावा आणि अनास्था असलीच तर ती स्वतःच्या लेखनगुणांना वाव देण्या-बद्दलची असावी. उपक्रमाबद्दलची निश्चित नसावी आणि जाणीवपूर्वक तर नसावीच असे वाटते. हा संकोच आणि ही अनास्था हळूहळू नाहीशी होईल अशी आशा वाटते.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित म्हणून शिक्षणक्षेत्रातील उंबरठ्यावर असलेल्या नव्या विचाराची दखल घ्यायला हवी. सर्वच क्षेत्रांत प्रयोगशीलता हे फार महत्त्वाचे मूल्य मानले जाते, आणि त्याचे उत्साहाने स्वागत केले जाते. सध्या शिक्षणक्षेत्रात ही प्रयोगशीलता तीव्रपणे प्रत्ययाला येते. १० + २ + ३ हा शैक्षणिक आकृतिबंध अजून पुरेसा जुना व्हायच्या आतच ८ + ४ + ३ हा नवा आकृति-बंध येऊ पाहात आहे, याला प्रयोगशीलता म्हणावे की अस्थिरता, असा प्रश्न आहे. प्रयोगशीलता नेहमीच स्वागतार्ह असते. पण अस्थिरतेचे रूप अनर्थकारक होण्याचा धोका असतो. शिक्षणक्षेत्रात तरी अशी एखादी पिढी बळी जाणे योग्य नसते.

या अंकासाठी एक नवा उपक्रम आयोजित केला होता. अंकासाठी विद्यार्थ्यांनी जाहिराती मिळ-विण्याचे आवाहन केले होते. विद्यार्थ्यांना विक्रयकलेचा अनुभव यावा, परिश्रमाचे महत्त्व या वेगळ्या मार्गाने कळावे, आर्थिक स्वावलंबनाचा श्रीगणेशा गिरवावा, असे काही विचार त्या मागे होते. याबाबतीत अजीम खान ( ११ वी साहित्य ) विद्यार्थ्याचा उल्लेख करणे अगत्याचे आहे.

हा अंक आकाराला येण्यामध्ये विद्यार्थी-प्रतिनिधी, लेखक विद्यार्थी आणि काही सहकारी प्राध्यापक यांची मोलाची मदत झाली. त्या सर्वांचे औपचारिक आभार मानण्यापेक्षा हार्दिक कृतज्ञता व्यक्त करणेच योग्य. तसेच आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन काही संस्थांनी आणि व्यक्तींनी या वार्षिकांकासाठी जाहिराती पाठविल्या त्यांचे मनःपूर्वक आभार. 'परशुरामीय'चे हे स्वतंत्र आणि छोटे रोप रुजावे, अंकुरावे आणि बहरत जावे, असेच या निमित्ताने म्हणावेसे वाटते. शेवटी वाच-कांना विनंती की—

तऱ्हीं न्यून ते पुरतें । अधिक तें ही सरतें । करूनि घेयावे हे तुमते । विनविले मियां ॥

( ज्ञानेश्वरी : अ. १ : ८० )

S.P. COLLE[GE] 2 JUNE 30 LIBRARY

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर : वंदना बोकील १
काय भुललासी जाहिरातीच्या रंगा : अंजली मराठे २
आम्ही सारे माणसे आहोत : भाग्यश्री सहस्रबुद्धे ४
आम्ही सारी माणसे आहोत : विनीता आंबेटकर ७
अशा स्पर्धा ! अशी भाषणे ! :
प्रा. डॉ. श्रीलेखा साने ९
महाराष्ट्राचा वाल्मीकी : रजनी बोकील ११
नंदादीप मालवला : दीपक करंदीकर १३
चिरतरुणा रे ! चिररुचिरा रे ! : वंदना दिवाकर १५
प्रिय चिमणराव... : वर्षा दप्तरदार १७
निद्रायोग : अभिजित वैद्य १९
सिंहगडाची साहस सहल : ११ वी वाणिज्य २१
जग हा वेड्यांचा बाजार : दीक्षित २३
पाखरा, येशिल का परतून ? : प्रज्ञा पिसोळकर २४
क्लास–एक फॅड : भालचंद्र पटवर्धन २८
Don't take lightly ! : प्राची क्षीरसागर २९


## काव्य विभाग


खोड : उज्ज्वला खिरे ३१
जीवन : अरुंधती वैद्य ३१
शब्दांचे देणे : उज्ज्वला खिरे ३२
ती बाभूळ : अरुंधती वैद्य ३२
विकल मन : संजीव देशमुख ३२
...कधी तरी व्हायला लागलं नसतं ! :
भाग्यश्री सहस्रबुद्धे ३२
जीवन : भाग्यश्री सहस्रबुद्धे ३३
सिगारेट : रोहित कावळे ३३
मला असं वाटतं : स्वाती मराठे ३३
फुले आणि धूळ : राजेंद्र पडतुरे ३४
वात्रटिका : संगीता कपटकर ३४
अनोळखी : दीपक शेलार ३४


## हिंदी विभाग


अमृतसर : एक झलक : राजीव देशमुख ३५
कन्याकुमारी : अनोखी यात्रा : भारती थळे ३७
इंतजार : शोभा कुलबुर्गी ३८
न लौटनेवाला कल : प्रज्ञा राजे ३९
जिंदगी : अमिता सूर्यवंशी ४१


## इंग्रजी विभाग


Inimitable Charles Dickens :
Minal Kulkarni ४३
A Nurse Reflects : Pradnva Raje ४४
My heavenly Haven : Triveni Thatte ४६
Warning : Male Sex in Danger : ४७
Michael Gandhi
Cancer : Anjali Deshpande ४९
Nothing but trouble : Hemant Mahadkar ५१
A Look at your eyes : Sanjaya Chordiya ५३


## वार्षिक अहवाल


( १ ) हीरक महोत्सव ५५
( २ ) स्नेहसंमेलन ५६
( ३ ) कनिष्ठ महाविद्यालय ५७
( ४ ) सायन्स असोसिएशन ६०
( ५ ) वाणिज्य मंडळ ६१
( ६ ) राष्ट्रीय सेवा योजना ६१
( ७ ) राष्ट्रीय छात्रसेना ६२
( ८ ) जिमखाना विभाग आणि क्रिकेट विभाग ६३
( ९ ) वादविवाद मंडळ ६३



## पैशाला जेव्हां जाग येते

घरात असलेला पैसा
तसा झोपलेलाच असतो. पण तो जेव्हां
विद्या सहकारी बँकेत येतो
तेव्हां तो खडबडून जागा होतो.
त्याला हजार हात फुटतात.
विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, प्रकाशकांना,
यांत्रिकांना, उद्योगपतींनासुद्धा
हा तुमचा पैसा हजार हजार हातांनी
मदत करतो. आणि जेव्हां तुम्ही त्याला
बोलवाल तेव्हां तो लवाजम्यासह
तुमच्याकडे हजर होतो.

**विद्या सहकारी बँक लि.**
कॉमनवेल्थजवळ, लक्ष्मी रोड, पुणे ३०

देवीदास बागूल

मराठवाडा
पुनर्वसनासाठी
सढळ हाताने
सहाय्य करा

# महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर....

**वंदना बोकील**, ११ वी ( शास्त्र )

तुम्ही पांढऱ्या चाफ्याचं झाड पाहिलंय ? ते कसं पानांच्या हलत्या हातांनी वर्षाराणीला निरोप देत असतं आणि फुलांच्या उमलत्या हातांनी अश्विनाला कुरवाळत असतं. अगदी अस्संच, महाविद्यालयात प्रवेशताना आमचं झालं होतं. अश्रुभरल्या डोळयांनी शाळेचा आणि बाल्यावस्थेचा आम्ही निरोप घेत होतो आणि त्याचवेळी त्याच अश्रूंतून, त्याच त्या ओथंबलेल्या डोळयांतून आनंदाची लहर प्रतीत होत होती. झरणाऱ्या डोळयांतून उमलणाऱ्या आनंदाने आम्ही महाविद्यालयीन जीवनाचं स्वागत केलं.

खरंच ! फुलपाखरांचे रंग नि हंसाचे पंख घेऊन शाळेतले ते दिवस कसे भुर्रकन् उडून गेले ! पाकोळ्यासारखे भिरभिरत केव्हाच दिसेनासे झाले ! चिवचिवत, किलबिलत दूर निघून गेले ! परत कधीही न येण्यासाठी !

किशोरावस्थेतल्या त्या विविधरंगी, विविधढंगी शालेय जीवनाचा निरोप घेताना निर्माण झालेली हुरहूर अंतरी बाळगून, बावरलेल्या अवस्थेत, भिरभिरणाऱ्या नजरेने आम्ही या महाविद्यालयाचा उंबरठा ओलांडला. नवजीवनाच्या वाटेवरचे हे पहिले पाऊल टाकताना नजरेत सभय उत्सुकता होती, अनोळखी अल्लडपणा होता, नव्याच्या नवलाईचे नवल होते. पावलात जोम होता पण ते अडखळत होतं.

पहिल्या–पहिल्यांदा, पापुद्र्यामागून पापुद्रे काढावेत. तशा आठवणी आम्ही काढीत होतो. मधूनच शाळेतल्या रम्य स्मृतींची, वाळाच्या भुरभुरणाऱ्या जावळासारखी मृदु–मुलायम मोरपिसं मनाला गुदगुल्या करीत होती. नवी क्षितिजे ! नवे तरंग ! सारंच कसं लोभसवाणं वाटत होतं ! क्षणाक्षणाला कणाकणांतून उधळणाऱ्या आकाशात अनंत रंगांची उधळण दिसत होती. अंजिरी, सोनेरी, केशरी...... कितीतरी ! ही सगळीच मनोज्ञ रंगसंगती मनाला भुरळ घालत होती. कोणत्या रंगात रंगून जावं हेच नीट समजत नव्हतं.

नंतर आलेले अनुभव, आढळणारी दृश्यं चिरपरिचित झाली. इथे अवास्तव मोकळेपणा मला कुठेच आढळला नाही. प्राध्यापकांचा फक्त वर्गापुरता विद्यार्थ्यांशी संबंध आहे असं मला अजून तरी दिसलं नाही. शाळेत शिक्षकांभोवती असणारे विद्यार्थी—मित्र मंडळ मला इथेही आढळलं. आणि म्हणूनच मला अनुभवातून बोलणाऱ्या भावनेचा ओलावा सापडला.

जागोजाग उभे असणारे तरुण–तरुणींचे पुंजके ! तिथे खळखळणारी निर्भयता होती, ओसंडणारा आनंद होता, फेसाळणारा, उधळणारा जिवंतपणा होता, विपुलतेचे वैभवही होतं. नि या साऱ्या अस्थिरातलं स्थिर सौंदर्यही होतं.

महाविद्यालयाच्या चराचरातून मला ते महाविद्यालयीन जीवन आढळत होतं. ते वर्गाच्या खिडक्यांतून डोकावत होतं. फुलत्या फुलांतून फुलत होतं, कारंज्यातून तुषारत होतं. गुलाबावरच्या दंवबिंदूतून ठिपकत होतं, मध्येच थांबणाऱ्या खारीसारखं कुठंतरी थबकत होतं. आंब्याच्या पालवीतून मोहरत होतं, आणि युवक–युवतींच्या पावलांतून पुढे धावत होतं. झाडाझाडांतून किलबिलणाऱ्या, बालकांच्या निरागस कुतूहलाने घराघरांतून डोकावणाऱ्या, जलबिंदूंनी डवरलेल्या पहाटेसारखं ते प्रसन्न होतं. सगळीकडे व्यापून उरलं होतं.

हळुहळू या नव्या वातावरणात, मोकळेपणात थंडीबरोबर येणाऱ्या धुक्याची धूसरता शालेय–आठवणीवर दाटू लागली. थंडी आली की लपणाऱ्या पालवीसारखे शाळेतले दिवस कुठेसे लपून बसले, आडोशाला जाणाऱ्या फळाफुलांसारखा स्मृतींचा गंध मनाच्या कप्प्यात दडून बसला. आणि आम्हीही या महाविद्यालयाच्या चित्राचा एक रंग होऊन गेलो !

# काय भुललासी जाहिरातीच्या रंगा ?

प्रथम क्रमांकाचा निबंध

**अंजली मराठे**, बारावी 'शास्त्र'

विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळावे म्हणून आम्ही काही योजना आखल्या होत्या. विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा आणि काव्यस्पर्धा अशा दोन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. निबंधस्पर्धेत विजेते झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

प्रथम क्र. अंजली मराठे, १२ वी शास्त्र द्वितीय क्र. भाग्यश्री सहस्रबुद्धे, १२ वी साहित्य

तृतीय क्र. विनीता आंबेटकर, १२ वी शास्त्र

या स्पर्धेसाठी प्रा. साने ( हिंदी ), डॉ. सौ. विजयालक्ष्मी शिंदे ( वनस्पतिशास्त्र ) आणि डॉ. सौ. श्रीलेखा साने ( मराठी ) यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद ! तसेच, यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन !

परीक्षा नुकतीच संपली होती. तेव्हा दुपारचे जेवण आटोपून जरा पडावे असा माझा विचार होता. जेवून पडते न पडते तोच रस्त्यावरून कर्कश आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. जरा चडफडतच उठले. चार–पाच रिक्षा माझ्यासमोरून गेल्या. त्या रिक्षांवर लाल झेंडे लावलेले होते आणि आतमध्ये रुमालाने मुस्कुटे बांधलेली माणसे हातात माईक घेऊन 'कॅप्स्टन सिगारेट'ची जाहिरात करत होती. रिक्षा लगेच पुढे निघून गेल्या. पण आलेली झोप मात्र कुठल्याकुठे पळून गेली.

सहज चाळा म्हणून मी टीपॉयवर पडलेले मासिक उचलले. पहिले पान उघडताच 'संभाजी जर्दा'ची जाहिरात डोळ्यांसमोर आली. खरोखर मला अजूनपर्यंतही न सुटलेले हे एक कोडे आहे की, संभाजीराजे म्हणा किंवा शिवाजीराजे म्हणा हे दोघेही त्या तंबाखूला स्पर्शही करत नसतील पण त्यांच्याच नावावर ही एवढी जाहिरात! केवळ आपल्या मालाची विक्री जास्त व्हावी म्हणून! एक-मात्र खरे की या तंबाखूचा खप मोठा आहे. मला वाटतं केवळ या जाहिरात देण्याच्या पद्धतीमुळेच लोक त्याकडे आकर्षित होत असावेत. एवढी मोठी जाहिरात आहे तेव्हा हा माल नक्कीच चांगला असला पाहिजे ही भावना लोकांच्या मनात दृढ होत असावी !

माझ्या डोळ्यांसमोर मी जाहिरात वाचून घेतलेला आठ रुपयांचा लेडीज झब्बा तरळून गेला. दोन महिन्यांपूर्वी कुठल्याशा वर्तमानपत्रात या लेडीज झब्ब्याची आकर्षक जाहिरात पाहून मी तो घेऊन टाकला. सुंदरश मरुन कलरचा हा झब्बा मला अतिशय आवडत असे. मी तो धुतला तेव्हा त्याचा इतका रंग गेला की त्याचा मूळचा रंग ओळखू येईना. आणखी दोनदा धुतल्यावर त्याला चक्क छोटीछोटी भोकं पडली. मग काय ? माझ्या पूज्य ( सॉरी हं ! परमपूज्य ) आईने तो टरटरा फाडून ( आणि अर्थातच माझ्या नावाने ओरडून ) त्याचं हात पुसायचं फडकं केलं ! ते आठ रुपये अक्कलखाती जमा झाले.

रेडिओवर लागणाऱ्या बऱ्याच जाहिराती मला गोंधळात टाकतात. उदा– फोऱ्हान्स टूथपेस्टची जाहिरात पाहा.

एका छोट्याशा मुलाचा आवाज–

"मम्मी, मैं बडा कैसे बनूँगा ?"

"साफ–सुथरे दातोंसे खाना खाकर !"

"कैसे ?"

"..."

"कैसे ?"

"..."

आणि या प्रत्येक 'कैसे ?' ला मम्मी उत्तर देत जाते. आता मी जर माझ्या आईला बोलताना हा प्रश्न विचारला तर फक्त एकदा उत्तर मिळते. पुढच्या उत्तराला कोणती क्रिया घडते ते सूज्ञास सांगणे न लगे ! पण ही रेडिओतली मम्मी मात्र आपल्याला एकदम पसंत !

दुसरी ब्रिटानिया–ग्लुकोज–डी बिस्किटांची जाहिरात

" मुन्ने, ओ मुन्ने, आँखे बंद "
ही आईची आज्ञा मी तरी सरळसरळ ऐकली नसती. पण हा आदर्श मुन्ना पडला ना! तो लगेच म्हणतो,

" ओ. के. मम्मी आँखे बंद! "

" बिस्कीट खा, खा के बता, है कौनसा? "

इतका सुंदर प्रश्न मला वाटतं आपली आई सर्वसामान्यपणे कधीच विचारत नाही.

या जाहिरातींचे प्रकार तरी किती? ' एस कुमार ' तर्फे एस कुमार्स का फिल्मी मुकद्दमा ' सादर होतो व ते आपल्या मालाची अधिक जाहिरात करतात. कोहिनूरतर्फे कोहिनूर गीतगुंजारव हा कार्यक्रम पेश होतो. कोणी नुसतीच दोन मिनिटांची जाहिरात पसंत करतात तर कोणी एखाद्या चौकात भले मोठे पोस्टर लटकावून देतात.

चित्रपटाच्या जाहिरातीसुद्धा इतक्या सुंदर असतात की प्रेक्षक ती जाहिरात वाचूनच त्याकडे आकर्षित व्हावेत. उदा.–

( १ ) ' चित्रपटाचा चित्तथरारक प्रारंभ आणि कलात्मक शेवट चुकवू नका '......" चानी "

( २ ) ' युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ।

बी. नागीरेड्डी यांनी आपल्या या चित्रपटात माणसाच्या मनातील विचारवलयांचे अगदी जवळून चित्रण केले आहे,......' यही है जिन्दगी '

( ३ ) लाख लाख धन्यवाद...बहोत बहोत शुक्रिया मेनीमेनी थॅंक्स...प्रिय रसिकहो, तुमचे आभार मानावयास आज आमच्याजवळ शब्द अपुरे आहेत...' चोरी चोरी '

अशा जाहिरातींमुळे रसिक त्या चित्राकडे आकर्षित न झाल्यासच नवल म्हणावे लागेल.

हल्ली हप्त्याहप्त्याने वस्तू द्यायच्या ही एक नवीनच पद्धत निघाली आहे. रेडिओवर कुठल्याशा एका प्रेशरकुकरची जाहिरात लागते, ती अशी, की हा कुकर जर एकदम घेतला तर दोनशेपस्तीस रुपये पडतात. पण तोच जर हप्त्याने घेतला तर वीस रुपयांचे तेरा हप्ते भरावे लागतात. म्हणजे मग कुकर मिळणार. म्हणजे मग त्या विक्रेत्याला पंचवीस रुपये फायदा मिळतो. पण सर्वसामान्यपणे संसारी माणूस एकदम दोनशे पस्तीस रुपये भरू शकत नाही हा वीक पॉईंट–मर्मबिंदू ओळखून हुशार विक्रेते फायदा करून घेतात.

एक अनुभव ' कासव छाप मच्छर अगरबत्ती ' बाबत आला. आमच्या घरासमोर खूप पाणी साचले होते तेव्हा त्यात साहजिकच डास झाले आणि आम्हाला चावायला लागले. बाबांनी लगेच ' कासव छाप मच्छर अगरबत्ती ' आणली. पण जाहिरातीत जसे सांगितले होते तसे घडलेच नाही. जाहिरातीत म्हणतात, ' ही उदबत्ती लावा आणि निश्चिन्त झोपा. ' पण आम्ही झोपलो. तोच उघड्या दारातून डास आत येऊ लागले. उदबत्ती मध्येच विझली होती. परत पेटवली. पण काय आश्चर्य! डास आत येत होते, आम्हाला चावत होते अन् उदबत्ती इकडे शांतपणे जळत होती. काय म्हणावं बरं या दैवदुर्विलासाला.

' लेडीज झब्बा ' आणि ' कासव छाप मच्छर अगरबत्ती ' याबाबतीत अतिशय 'सुरस' (?) अनुभव आल्यापासून ' मी सस्ता दाम अच्छा काम ' अशी जाहिरात कुठेही जरी वाचली तरी तिकडे ढुंकूनही पाहात नाही.

आमच्या शेजारच्या कमलाकाकू साड्यांच्या फार शौकीन. पेपरात एक जाहिरात वाचून त्या कुठल्याशा साडी भांडारात साडी घेण्यासाठी गेल्या. साडी पसंत केली आणि जाहिरातीत सांगितल्याप्रमाणे त्यांनी कूपन घेतले. त्यावेळी त्या कूपनवर त्यांना एक छोटे स्टीलचे भांडे मिळाले. काकू तर एकदम खूष! पण दुसरी साडी घेतल्यावर त्यांना एक कंगवा मिळाला आणि ती साडीही टिकली नाही. त्यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर, " जळ्ळं मेलं ते? काही नका घेऊ त्या दुकानात साडीन्फिडी! सहासात महिन्यांत भूत झालंय बघा की! " आता बोला! पण तुम्ही तरी काय बोलणार म्हणा! पण तमाम स्त्रियांनी हा अनुभव लक्षात घेतला पाहिजे.

त्या दिवशी आमच्या शेजारचे करुणन् अंकल आमच्या घरी आले नि बाबांना म्हणाले, " मराठे, तुम्ही ती ओनरशिप फ्लॅटस्‌ची जाहिरात वाचली नाहीत का? फक्त अठ्ठावीस हजार रूपयांत दोन खोल्या! संडास–बाथरुमचीसुद्धा सोय आहे म्हणे! शिवाय प्लॅस्टरच्या भिंती! "

बाबा म्हणाले, " अहो आमच्या गावी आम्हाला घर आहे तेव्हा मी काही तिकडे फारसे लक्ष देणार नाही. " मग अंकलनी स्वतः जाऊन बांधकामाची जागा, पद्धत इत्यादीची माहिती करून घेतली. थोड्याच दिवसात ते तेथे जाऊन पैसे भरून आले. मधे पाच–सहा महिने गेले. अजून कुठेच बांधकामाला सुरुवात नव्हती. खूप दिवसांनी बांधायला सुरुवात झाली तेव्हा अंकलना रहायला मोठ्या कृपेने फक्त प्लॅस्टरच्या भिंती बांधून देण्यात आल्या व

नंतर सांगण्यात आले की प्रत्येकाने आणखी कमीत कमी आठ हजार रुपये दिले तरच पूर्ण घर बांधून देणे शक्य होईल. ( आठवा ' घरौंदा ' ) मग अंकलनीच स्वतः जाऊन आणखी आठ हजार रुपये भरून स्वतःच्या मनाप्रमाणे घर बांधवून घेतले. केवळ एका आकर्षक जाहिरातीमुळे हे एवढें घडले.

माझ्या आईला कोडी सोडविण्याची फार हौस ! नुकतंच तिनं एक कोडं सोडवलं आणि मग सांगितलेल्या पत्त्यावर पाठवून दिलं. त्यांच्याकडून उत्तर आलं की, तुम्ही आमच्या पत्त्यावर साडेचौदा रुपयांची मनीऑर्डर करा. तुम्हाला साडी बक्षीस मिळाली आहे. मग काय, आई नुसती हवेत तरंगत होती. तिने पैसे पाठवून दिले. मग आणखी थोड्या दिवसांनी उत्तर आलं की तुमचे पैसे मिळाले. आणखी पस्तीस रुपये पाठवा. आईने जरा कुरकुरतच पैसे पाठविले. थोड्या दिवसांनी एक घाणेरडी साडी आली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ती साडी एकशे सतरा रुपयांची होती. पण पुण्याच्या एका प्रसिद्ध साडी भांडारात चौकशी केल्यावर समजले की ती साडी जास्तीत जास्त साठ रुपयांपर्यंत मिळते व उरलेला माल खपावयाला असल्या जाहिराती देतात. मग मात्र हवेत तरंगणारी आई दाणकन् जमिनीवर आपटली.

हल्ली आम्ही जे च्युईंगगम खातो त्याची जाहिरात काही दिवसांपूर्वी वाचण्यात आली. या निर्मात्यांच्या म्हणण्याप्रमाणे च्युईंगगम खाल्ल्याने मेंदू तल्लख होतो, स्मरणशक्ती वाढते व आळस नाहीसा होतो. पण हल्लीच काही शास्त्रज्ञांनी असे सिद्ध केले आहे की यात मानव-निर्मिती रबर, साखर व इतर रसायने असतात त्यामुळे काही प्रमाणात आळस जातो हे खरे; पण इतर कामे हा गम करू शकत नाही.

हल्ली कुठेही सेल लागला की, तिथे जायचे व तिथला माल केवळ स्वस्तात मिळतो म्हणून घ्यायचा ही प्रवृत्ती वाढत आहे. पण काही अपवाद वगळता या सेलमध्ये मांडलेल्या वस्तू जास्त टिकाऊ नसतात.

' सेल ! सेल ! ! सेल ! ! ! ' अशी जाहिरात करणे आम्हाला आवडत नाही, अशी एक जाहिरात नुकतीच पाहण्यात आली. वाचून जरा हसूच आले. कारण ही जाहिरात तर चक्क ' आमच्याकडचा माल स्वस्त नाही ' असे सांगते.

एकंदरीत मला आत्तापर्यंत आलेल्या अनुभवावरून असे दिसते की जाहिरात म्हणजे केवळ ' वरलिया रंग ' आहे. या जाहिराती केवळ दिखाऊ असतात. त्यात काहीच तथ्य नसते.

एकच, या जगात ओरडून विकणाऱ्याचे राळेसुद्धा विकले जातील पण न ओरडता विकणाऱ्याचे गहूसुद्धा विकले जाणार नाहीत.

त्याचमुळे ' काय भुललासी वरलिया रंगा ' या उक्तीत थोडासाच बदल करून ' काय भुललासी जाहिरातीच्या रंगा ' असे मला म्हणावेसे वाटते.

★

## आम्ही सारे माणसे आहोत

द्वितीय क्रमांकाचा निबंध

**भाग्यश्री सहस्रबुद्धे**, १२ वी साहित्य

आम्ही सारे माणसे आहोत असं वेगळं ठासून सांगायची आणि लिहायचीही वेळ आज का यावी ? जीवशास्त्रीय दृष्ट्या आणि निसर्गाचा विचार करता आपण माणसं आहोत हे सत्य आहे. मग यात सांगण्यासारखं नवीन असं काय आहे ? माणूस व्हायला दोन हात, दोन पाय, डोळे, नाक आदि इंद्रिये या सर्व वर्णनाच्या शरीरापेक्षाही काही जास्त लागतं की काय ? आणि तसं लागत असेल तर ते काय ?

याला एक उत्तर असंही देता येईल की शंभर टक्के माणूस व्हायला शरीराबरोबरच माणुसकीही असावी लागते. ही माणुसकी एखादी दैवी शक्ती नव्हे अगर देणगीही नव्हे. ती निसर्गाकडून शरीराबरोबर आणि

शरीरासारखी मिळत नाही तर ती आत्मसात करावी लागते, कमवावी लागते. स्वतः कष्ट करून, त्याग करून मिळवावी लागते. ती सहजसाध्य नाही.

जेव्हा दुसऱ्यावर संकट येते तेव्हा आपणहून संकट-ग्रस्ताला मदतीचा हात पुढे करणाऱ्याजवळ माणुसकी आहे, असे म्हणता येईल. आंध्र चक्रीवादळात सापडलेला असताना हजारो हात मदतीसाठी धावून येत आहेत आणि काही हात तेथील भयावह परिस्थितीतही लूटमार करण्यात गुंतले आहेत. या लुटारूंना माणुसकीची, मानवतेची मूल्ये समजलीच नाहीत, असं म्हटल्यास वावगं नाही.

तर मग ही मूल्ये कोणती? माणुसकी म्हणजे नक्की काय? असा प्रश्न पडणे साहजिक आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन शब्दांत ' मानवता ' व्याख्याबद्ध करता येईल. अर्थात ही काही अंतिम किंवा परिपूर्ण व्याख्या नव्हे. ही त्रिविध मानवता मनात बाणवण्यासाठी आज कित्येक शतकं माणूस लढा देत आला आहे. अमेरिकन यादवीयुद्ध हे याचं एक ठळक उदाहरण. अब्राहम लिंकननं आणि इतर उदार मानवतावाद्यांनी गुलामगिरीच्या संतापजनक पद्धतीविरुद्ध दिलेला हा लढा, दक्षिणेकडील गुलामगिरीला मानणारे मळेवाले आणि उत्तरेकडील, गुलामगिरी नष्ट व्हावी या मताचे सुधारक सामान्यजन यांच्यात झाला. आणि त्या लढ्यातून निष्पन्न झालं अपेक्षित असं गुलामांचं स्वातंत्र्य! हजारो गुलाम कायदेशीररीत्या, शारीरिकरीत्या बंधमुक्त झाले. परंतु विचित्र योगायोग असा की या मानवतेसाठी झालेल्या लढ्याचा मार्ग मात्र मानवतेला पायदळी तुडवणारा होता, रक्तरंजित होता. नाझी हुकूमशहा हिटलर याच्या सत्तापिपासेमुळे सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धातही हाच दैवदुर्विलास दिसून येतो. त्याचा पराभव करण्यासाठी व लोकशाहीची, मानवतेची मूल्ये जपण्यासाठी अनेक बलाढ्य राष्ट्रे त्याच्या विरुद्ध उभी ठाकली खरी, पण त्यासाठी निम्म्याहून अधिक जगाला प्रचंड नुकसानीची झळ सहन करावी लागली. लाखोंना प्राण गमवावे लागले.

जगात सर्वत्र मानवतेच्या मूल्यांच्या रक्षणासाठी युद्धे अगर क्रांत्या झाल्या. भारतातही आणीबाणीत काहीसा अशाच प्रकारचा लढा झाला. आणीबाणीत सप्तस्वातंत्र्यावर गदा आली आणि मानवतेची मूल्ये धुळीला मिळाली परंतु भारतीय परंपरेनुसार जनतेने निवडणुकीच्या, मतदानाच्या शांततामय मार्गाने जुलमी सत्ता तिच्या नेत्यासकट हाकलून लावून एक अभूतपूर्व पराक्रम केला आणि मानवतेच्या मूल्यांना अर्थ प्राप्त करून दिला.

हे सर्व प्रयत्न ' स्वातंत्र्य ' या मानवतेच्या एका घटकासंबंधी झाले. मानवतेचे इतर दोन घटक समता व बंधुता यासाठी मानवानं आजवर केलेले प्रयत्न लक्षात घेणंही आवश्यक आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीचे या दृष्टीने जास्त महत्त्व आहे. किंबहुना लोकशाही अगर मानवतेच्या मूल्यांसाठी झगडण्याची नवी दृष्टी फ्रेंच राज्यक्रांतीनेच जगाला दिली. जुलमी राजांविरुद्ध अनेक क्रांतिकारकांनी उठाव करून समाजजागृती केली. राजेशाही नष्ट झालीही परंतु दुर्दैवाने पुढे या क्रांतिकारकांतच मतभेद होऊन दुही निर्माण झाली आणि महत्त्वाकांक्षी नेपोलियनने नेमक्या याच संधीचा फायदा घेऊन हुकुमशाही प्रस्थापित केली, हा भाग निराळा!

रशियन राज्यक्रांतीचा भर फ्रेंच राज्यक्रांतीपेक्षाही समतेवर जास्त होता. आर्थिक, सामाजिक कोणत्याही दृष्टीनं त्यांना विषमतेला फाटा देणे महत्त्वाचे वाटत होते. क्रूर झारची जुलमी झारशाही उलथवून लावण्यात रशियन क्रांतिकारक यशस्वी झाले खरे परंतु समतेसाठी झगडताना कम्युनिस्टविरोधी हजारो लोकांच्या इतर स्वातंत्र्याची व हक्कांची त्यांनी पायमल्ली केली. चिनी राजवट व रशियन राजवट यांच्यात आता मतभेद असले तरीही चिनी राज्यक्रांती रशियन साम्यवादापासून स्फूर्ती घेऊनच झाली. दोन्ही राज्यक्रांत्यांची उद्दिष्टे मानवतेच्या मूल्यांची प्रस्थापना व जोपासना हीच असली तरी प्रत्यक्ष त्यांची अंमलबजावणी करताना कार्यवाहीत आलेले अत्याचार मात्र मानवतेविरुद्ध होते, अमानुष होते हा दुर्दैवाचा मुद्दा!

रशियन व चिनी राज्यक्रांतीमागील साम्यवादात माणुसकीची तत्त्वे अभिप्रेत होतीच. मार्क्सच्या आवाहनामागील शोषणमुक्तीच्या आग्रहाचा या दृष्टीने उल्लेख करता येईल. त्याने दिलेला संदेश असा, "जगातल्या कामगारांनो, एक व्हा. शृंखलांशिवाय तुमच्याकडे गमावण्यासारखे काही नाही." परंतु या क्रांत्यांचे फलित आणि अंमलबजावणी लक्षात घेता ब्रिटिश लेखक जॉन ऑरवेल यांच्या ' Animal Farm ' या रूपकात्मक कादंबरीची आठवण होते. या कादंबरीतील जनावरांचा एक कळप आपल्या निष्काळजी मालकाला बंडखोरी करून हाकलून लावतो, आणि मळा आपल्या ताब्यात घेतो. स्वतः कष्ट करून, धान्य पिकवून ते गुण्यागोविंदानं नांदू लागतात. काही

नियम ठरवून ते भिंतीवर लिहितात. त्यापैकी एक महत्त्वाचा नियम असतो.

' All animals are equal, ' त्या कळपातली काही हुशार डुकरं हळूहळू इतर जनावरांवर आपलं वर्चस्व प्रस्थापित करू लागतात. मालकाच्या घरात राहून चांगले अन्न खाऊ लागतात, दुग्धवाटप आपल्या हाती घेतात. इतर भोळ्या जनावरांच्या लक्षात ही कावेबाजी येत नाही आणि एक दिवस त्यांना दिसून येतं–भिंतीवरचे सर्व नियम पुसून एकच नियम लिहिलेला आहे. ' All animals are equal but some animals are more equal than others. ' निष्काळजी मालक जाऊन डुकरांचं वर्चस्व आलं. समतेसाठी झालेल्या या राज्यक्रांत्यांतूनही आर्थिक अगर सामाजिक विषमतेचा उगम कसा होतो हे लेखकाने प्रभावीपणे या कादंबरीत दाखवून दिले आहे.

या कादंबरीतील डुकरे माणसाच्या स्वार्थी वृत्तीची, सत्तापिपासेची द्योतक आहेत असे म्हटल्यास हरकत नाही. पूर्वीपासून आजपर्यंत अखिल मानवसमाजात जे स्पष्ट असे दोन तट पडले आहेत; उदाहरणार्थः–मालक–मजूर जमीनदार–भूदास, सत्ताधिकारी–पददलित, श्रीमंत–गरीब यांचं मूळ या मानवताविरोधी दुर्गुणांतच आढळून येईल. या वर्गांमुळेच मार्क्सची वर्गकलहाची व म. गांधींची वर्गसमन्वयाची कल्पना ठळकपणे पुढे आली. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे समाजातील शोषणवृत्ती नष्ट व्हायला हवी. असे शोषक कोणत्याही आर्थिक अगर सामाजिक थरावर असले तरीही त्यांच्याकडची शोषणाची साधने दूर व्हायला हवीत. मग भलेही त्यांच्याशी प्रत्यक्ष शस्त्रांनी लढा द्यायला लागो. भारताची शांतताप्रिय परंपरा लक्षात घेता गांधीजींनी थोडेसे मवाळ धोरण आखल्याचे लक्षात येते. त्यांच्यामते शोषक वर्गाचे हृदयपरिवर्तन, मतपरिवर्तन करून त्यांना न्यायाने वागायला भाग पाडले पाहिजे. माणुसकीची मूल्ये प्रस्थापित करण्यासाठी अमानुष मार्ग वापरायचे नाहीत. रक्तरंजित वर्गलढा नको तर शांततामय बदल हवा.

' माणसानं, माणसाला, माणसासारखं वागवलं पाहिजे. ' हा आग्रह गांधी आणि विनोबा व जयप्रकाश आदि सर्वोदयी नेत्यांच्या वर्गसमन्वयाच्या कल्पनेवरच आधारलेला आहे. या संदर्भात भारतातील दलितांच्या प्रश्नाची आठवण होणे अपरिहार्य आहे. अस्पृश्यता–निवारणाचा कायदा करून आपण ती नष्ट करण्याचा कायद्याने प्रयत्न केला, परंतु प्रत्यक्षात तसे वागतो का हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शोषित उपेक्षितांसाठी काहीतरी केले पाहिजे अशी फक्त कोरडी सहानुभूती दाखवून आपण गप्प बसतो. जोपर्यंत आपल्याला दलितांबद्दल अंतःकरणापासून कणव येत नाही, जोपर्यंत आपण दुसऱ्याला माणुसकी दाखवत नाही तोपर्यंत आपल्याला माणूस म्हणून घेण्याचा हक्क नाही. अजूनही बेलचीसारख्या गावी अस्पृश्यांची नाहक हत्या होते. सवर्णांकडून दलितांवर अत्याचार होतात. दलित म्हणजे फक्त आर्थिक दृष्ट्या नव्हेत, तर भूमिहीन शेतमजूर, अशिक्षित लोक, असंघटित कामगार, ग्रामीण स्त्रिया या सगळ्याच पददलितांच्या गरजांकडे आपण सोयीस्करपणे दुर्लक्ष केलेले आहे. त्यांना मानवी हक्कांपासून, स्वातंत्र्यापासून आपण वंचित टेवलेले आहे. महारोग्यांसारखे दुर्दैवी जीवही असेच उपेक्षिले गेले आणि त्यांच्याविषयीच्या आत्मिक तळमळीने बाबा आमट्यांनी त्यांच्याच मदतीनं आनंदवन फुलवलं. त्यांच्याकडून शेतीसारखीही कामे करून घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास बाणवला. म्हैसाळच्या मधुकरराव देवलांनीही असंघटित, दलित शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना कर्जाच्या दरीतून बाहेर काढून त्यांना जमिनी मिळवून दिल्या. आत्तापर्यंत माणूस व्हायला काय लागतं याची सविस्तर चर्चा आपण केली पण माणुसकीनं वागायचं म्हणजे नक्की कसं हा प्रश्न पडणे साहजिकच आहे; आणि या प्रश्नाचं उत्तर आमटे–देवलांच्या कृतीत सापडतं. आज या व अशा माणसांचं वेगानं अनुकरण करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आपल्यापैकी सर्वांनाच ते जमेल असं नाही. पण किमान आपल्यातील दुर्गुणांचं परीक्षण करून ते क्रमाक्रमानं कमी करणं किंबहुना नाहीसे करणं हे तरी प्रत्येकाला जमण्यासारखं आहे. दुसऱ्यासाठी थोडाफार त्याग करायला शिकणं, Live and let live हे तत्त्व अंगी बाणवणं, निदान आपल्या दुर्गुणांपासून इतरांना इजा पोहोचू नये अशी काळजी घेणं हेही अशक्य नाही. आज ही वेळ आली आहे. ' माणसानं, माणसाला, माणसासारखं वागवायची समानतेनं वागायची, बंधुभावानं वागायची, दुसऱ्याच्या हक्कांना किंमत देण्याची. ज्यावेळेस ही समानता सर्वत्र नांदेल त्यावेळेस आपण जीवशास्त्रीय अर्थापलीकडे जाऊन खऱ्या, आत्मिक, आंतरिक अर्थानं म्हणू शकू, ' आम्ही सारे माणसे आहोत '. आणि मगच त्या वाक्यापुढे प्रश्नचिन्हाऐवजी पूर्णविराम देऊ शकू.

★

तृतीय
क्रमांकाचा
निबंध

# आम्ही सारी माणसे आहोत

**कु. विनीता आंबेटकर**

वैदिक काळात स्त्रीला समाजात पूजनीय स्थान होते. स्त्री आणि पुरुष ही दोघं संसार-रथाची चाकं मानली जात.

' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता: ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते, सर्वास्तत्राफला: क्रिया: ॥

अशी तिची महती होती ! यमी, वैवस्तती, गार्गी, मैत्रेयी, जाबाला यांसारख्या मंत्रद्रष्ट्या स्त्रियांचे श्लोक ऋग्वेदात समाविष्ट आहेत. कैकेयीचे युद्धकौशल्य सर्वविदितच आहे. अशा प्रकारे सर्व तऱ्हेची कार्ये मोठ्या कुशलतेने तिने केल्याची अनेक उदाहरणे आहेत. पण मधल्या काळात स्त्री ही शूद्राप्रमाणेच गणली जाऊ लागली. असं वाटतं की आर्य समाजात आर्येतर स्त्रियांची संख्या जसजशी वाढू लागली तसतशी त्यांची समाजातील महत्ता ऱ्हास पावू लागली. वेदांच्या पठण-पाठणापासून त्या वंचित झाल्या. उपनयनाचा त्यांचा अधिकार हिरावला गेला. आणि दावणीला बांधलेल्या गुराप्रमाणे तिची दयनीय अवस्था झाली. कोणत्याही कार्यामध्ये स्त्रीला शूद्राप्रमाणे दूर ठेवू लागले. ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति । ' असा मनूचा दाखला देऊन जीवन विकासाच्या दृष्टीने तिची कोंडी करण्यात आली. ' जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी ' पण हे केव्हा ? समाजात तिला काही स्थान असेल तर ना ? पण माणसाने तिला माणुसकीने कधी वागवलेच नाही.

आफ्रिका, अमेरिका आदी राष्ट्रातील काळागोरा भेद ! त्यातून निर्माण होणारे संघर्ष ! माणूस म्हणून सांगण्यास लाज वाटावी असे त्यांच्यावर होणारे अत्याचार ! हे अत्याचार ऐकले की वाटतं शिक्षणाने या गोऱ्यांवर काही संस्कार झाले की नाही ? अमेरिका म्हणजे बडे प्रस्थ ! चंद्राचं संशोधन करून मंगळाकडे झेपावणारी शक्ती ! पण आपल्याच देशबांधवांना निग्रोंना–आपल्याच बरोबरीने सर्व अधिकार, सोयी-सवलती उपलब्ध होतात का ? याकडे दुर्लक्ष करतात. त्यावेळी त्यांची बुद्धिमत्ता, विचार सरणी का बोथट होते ? कोट्यधीश झालेले भांडवलदार आणि भुके कंगाल झालेले कामगार ! भारतातील बरीचशी

बेलची येथील हत्याकांड ! त्याबद्दल विरोधी पक्षियांची लोकसभेत प्रश्नांची सरबत्ती ! गवई बंधूंचे मामुली वैमनस्यामुळे डोळे काढले ! पोलिसांच्या संरक्षणात दिल्लीच्या उपनगरातील हरिजन शेतकऱ्यांची कामे सुरू ! कस्टम अधिकाऱ्यांच्या बायकांनी ढसाढसा रडत शहाआयोगापुढे दिलेल्या साक्षी ! शुभांगी सोहोनी खटल्याची पुनरावृत्ती !

वृत्तपत्रातील अनेकविध बातम्यांपैकी वर उल्लेख केलेली काही शीर्षके ! अशी शीर्षके वाचली की मन विषण्ण होते आणि मनात विचार येतो. ही सर्व कृत्ये माणसानेच का केली ? ' नरेचि केला हीन किती नर !' माणूस म्हटला की माणुसकी आलीच पाहिजे; पण हे झाले व्याकरणाच्या दृष्टीतून ! सत्य सृष्टीशी त्याचा काय संबंध ? नाहीतर आपण शूद्र म्हणून हरिजनांना वाळीत टाकले नसते, त्यांची उपेक्षा केली नसती. वास्तविक श्रीकृष्णाने ज्या चातुर्वर्ण्याची निर्मिती केली ती गुण आणि कर्म यांच्या आधारे ! ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं, गुणकर्मविभागशः ' पण सेवावृत्तीने सेवक बनलेल्या या हरिजनांची, त्यांच्या पिढ्यान् पिढ्यांच्या दास्यातून मुक्तता करायला समाज तयारच नाही. हिन्दू समाजधुरीणांच्या या संकुचित प्रवृत्तीमुळे हिंदूसमाजाचे अपरिमित नुकसान झाले आहे. या प्रवृत्तीचा फायदा खिस्ती मिशनऱ्यांनी नि मुस्लीम मुल्ला–मौलवींनी उत्तम रीतीने उठविला. काश्मिरची १० टक्के मुस्लीम प्रजा, दक्षिणभारतातील बहुसंख्य मुस्लीम, अँग्लोइंडियन्स ही सर्व आपल्यातील हीन प्रवृत्तीची जिवंत प्रतीके आहेत. ' जन्मना जायते शूद्रः, संस्कारात् द्विज उच्यते ! ' पण छे ! वेदांतील हे दाखले नकोतच आम्हाला. आम्ही त्यांच्यावर संस्कार करणार नाही आणि कुणी केले तरी मानणार नाही. हीच काहींची भूमिका ! कसं पटवायचं यांना की ती आपलीच भावंडं आहेत. अज्ञान, दास्य, लाचारीनं ती ग्रासली आहेत. त्यांच्यावर संस्कार केले तर त्यांच्यातूनच काही महान व्यक्ती उदयास येतील. पण...पण झोपलेल्याला जागं करता येतं पण झोपेचे सोंग घेतलेल्याला हो काय करणार ?

संपत्ती ५-१० लक्ष्मी पुत्रांच्याच मालकीची असल्यामुळे ३० टक्के दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. चार-चार दिवस उपाशीपोटी काम करणारे कामगार पाहूनसुद्धा ज्यांचे काळीज हेलावत नाही, असे मालक जणू काही यंत्रेच बनली आहेत. कारण तसे नसते तर त्यांचे मन हेलावून टाकणारे दारिद्र्य पाहून मालक नक्कीच विरघळला असता !

अनवाणी, बोटभर चिंधी गुंडाळलेली, अन्न मिळाले-मिळाले नाही-नाही अशा अवस्थेत रानावनात काम करणारे गिरीजन आदिवासी ! पोटासाठी चोरी करणारा चोर ! पण समाज कधी त्याने का चोरी केली याची चौकशी तरी करतो का ? अडीनडीला कर्ज घेणारा शेतकरी, भरमसाट व्याज घेणारे सावकार ! अज्ञानाचा फायदा घेऊन मुद्दलावरची शून्ये वाढवणारे गुजर मारवाडी ! दिसेल त्याला पकडून त्याच्याकडून मन मानेल तसे काम करून घेणारी वेठबिगारी पद्धत ! वर्षानुवर्ष उनपावसाची तमा न करता, निसर्गाच्या लहरीशी झुंजत मोत्याची रास निर्माण करणारा भूमिपुत्र ! पण सावकाराने ते धान्य आपल्या घरी नेल्याने वर्षभर डोळ्यातल्या आंसवावरच जीवन जगायचे, 'मरायचे' नाही म्हणून जगायचे ? अपंग, भिकारी, कुष्ठरोगी हे सर्व म्हणजे समाजाला एक आव्हानच आहे. देवाने खफामर्जी केलेल्या या दीन-दुबळ्या माणसांना माणसाकडून घृणा आणि तिरस्कार सतत भोगावा लागतो. आलिशान बंगल्याभोवती पसरलेली विस्तीर्ण झोपडपट्टी काय सांगते ? अभाव हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव ! त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचा मनाचा मोठेपणा कुणीतरी दाखवते का ? या व अशा अनेक ठिकाणी आपण माणूस म्हणून वावरतो पण माणुसकीला तिलांजली देऊन ! आपण सारी माणसे आहोत, एकाच देवाची लेकरे आहोत, स्खलनशील आहोत. पण माणुसकी, समानता, क्षमा करण्याचे औदार्य किती जणांजवळ असते ? आपल्या मनातील सुप्त युद्धप्रवृत्तीसच जणू काही मालक, सावकार इत्यादी वर्ग वाव करून देत असतो.

माणूस आणि पशू यांच्या 'आहार, निद्रा, भय मैथुनं च' या सहज प्रवृत्ती आहेत, पण माणूस हा त्याच्या काही मौलिक गुणांमुळे पशुपेक्षा श्रेष्ठ आहे. पण रानटी अवस्थेतील माणूस आज प्रगत आणि संसारी झाला आहे. मनातील युद्धप्रवृत्तीला उदात्त वळण लावण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. पण तो प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झाला आहे असे त्याच्या माणुसकीशून्य व्यवहारातून वाटत नाही. निसर्गाला तरी तसं कुठे वाटतंय ? म्हणूनच नखे आणि दात ही त्याची नैसर्गिक शस्त्रे अजूनही नष्ट होत नाहीत. नखे कापून आपण माणुसकी जागवू इच्छितो. पण तरीही नखे वाढतातच. तशाच या हिंसक-प्रवृत्ती मधूनच डोके वर काढतात. लहानमोठ्या राष्ट्रांचा अंदाजपत्रकात संरक्षणाचा खर्च वाढत आहे.

जगातील सर्व धर्मप्रवर्तकांनी माणुसकीचा गहिवर उत्पन्न होईल अशीच शिकवण दिली. भारतीय संतांनी ठायीठायी ह्याच गोष्टीचा आपल्या उक्तींनी आणि कृतींनी समाजापुढे महान आदर्श ठेवला. एकनाथांनी काशीची गंगा एका अंत्यजाच्या तोंडात घातली. तर भगवंताने अजमिळासारख्या अस्पृश्याला आपला निस्सीम भक्त मानला. गौतमबुद्धाने सुजातेकडे भिक्षा मागून तिच्या समाजाला महानता दिली. तर जैन तीर्थंकराने स्त्री-शुद्रांना पूर्वापार बंधनातून मुक्त केले. पृथ्वीचे स्वर्गीकरण करू इच्छिणाऱ्या पूज्य बापूजींनी अस्पृश्यांना 'हरिजन' देवाची लेकरे असे नामाभिधान करून तर, महर्षि कर्वे, फुले ह्यांनी स्त्रीशिक्षणाची दालने मोकळी करून आपला मानवतावादी धर्म स्पष्ट केला आहे. आम्ही सारी माणसे आहोत म्हणून सर्वांना समानसंधी समान हक्क हवेत या तत्त्वाचा हिरीरीने पुरस्कार करत असताना, काळ्या-गोऱ्यांमध्ये एकता निर्माण करत असताना अब्राहम लिंकन, मार्टिन ल्यूथर किंग, सारख्यांना त्यांच्या प्राणांची आहुती द्यायला लागली. संपूर्ण क्रांतीचा उद्घोष करणाऱ्या जयप्रकाशजींनी माणसाचे माणूसपणच गृहीत धरून क्रांतीची रुपरेखा आखली. समाजाने पददलित, निराश्रित, असहाय्य लोकांना सहाय्य करण्यासाठी जुन्या रूढी, समजुती काढून टाकून सत्य शोधले पाहिजे. समाज क्रांतीसाठी वस्तुस्थिती अभ्यासून आपली वागणूक बदलली पाहिजे. माणसाने माणूस ओळखला तरच ही क्रांती होईल.

आज समाजाला गरज आहे तळमळीच्या ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची, मानवतावादी व्यापक दृष्टीकोन समोर ठेवून सारे जग म्हणजे एक घर असे मानणाऱ्या सेवाभावी व्यक्तींची. देश, काळ, धर्म जाती, ही सर्व बंधने झुगारून माणूस हीच आपली आराध्य देवता मानली पाहिजे. आपण सर्व माणसे आहोत. सर्वांशी माणुसकीने प्रेमाने वागले पाहिजे. प्रत्येकाच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत म्हणजे कवी नीरजच्या स्वरात स्वर मिळवून आम्हीही म्हणू.

कहीं रहे कैसे भी मुझको प्यारा यह इन्सान है।
मुझको अपनी मानवतापर बहुत बहुत अभिमान है।।

★

"जशी भावना तसे फल देणारे ग्रंथाशिवाय दुसरे कोणीही नाही. इतके असूनही तुम्ही त्यांना जसे वागवून घ्याल तसे वागण्याइतकी लीनता ग्रंथांच्या अंगी असते हे वेगळेच!"

—**न. चिं. केळकर**
(केसरी, १७ ऑक्टो. १९११)

# मराठी विभाग

जैसी हरळां माजि रत्नकिळा।
कि रत्नांमाजि हिरा निळा।
तैसी भासां माजि चोखाळा।
भासा मराठी॥

जैसी पुस्पां माजि पुस्प मोगरी।
कि परिमळां माजि कस्तुरी।
तैसी भासां माजि साजरी।
मराठिया॥

पाखिआं मधें मयोरू।
व्रुखिआं मधें कल्पतरु।
भासां मधें मानु थोरु।
मराठियेसी॥

—**तोमास स्टिफन्स**, खिस्तपुराण

# अशा स्पर्धा ! अशी भाषणे !

डॉ. सौ. श्रीलेखा साने

[ १९७७–७८ या वर्षात ज्या वादविवाद स्पर्धा झाल्या त्यात भाग घेऊन यशस्वी, झालेल्या विद्यार्थ्यांच्या भाषणांचे संकलन–प्रा. डॉ. श्रीलेखा साने यांनी केले आहे. ]

वादविवाद स्पर्धांमध्ये स. प. म. चे विद्यार्थी आपल्या कर्तृत्वाचा वाटा नेहमीच उचलीत आले आहेत. या वर्षीच्या स्पर्धांत–ज्येष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही ' आपणही काही कमी नाही ' असे दाखवून आपल्या कर्तृत्वाची हजेरी लावली आहे.

बेळगाव येथे झालेल्या गोगटे ढाल वक्तृत्व स्पर्धेमध्ये १२ वी ( शास्त्र ) च्या वर्गात शिकत असलेल्या कु. वर्षा दप्तरदार हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. तिच्या भाषणाचा विषय होता, ' दलित साहित्य : वैशिष्ट्ये आणि मर्यादा ! ' मराठी साहित्यातील या नव्या प्रवाहाची दखल घ्यावीच लागते. ' उपेक्षितांचे अंतरंग ' उकलून समाजाला 'माणुसकीच्या गहिवरा'चे दर्शन घडविले ते श्री म. माटे यांनी. कु. दप्तरदारने तिथपासून या अश्रुगाथेचा इतिहास लक्षात घेतला. या काळ्या–चिरफाळलेल्या इतिहासातील डॉ. आंबेडकरांचे कर्तृत्व स्फूर्तीप्रद होते. त्यांनी दलितांना लढण्याची स्फूर्ती आणि धमक दिली.

दलित साहित्य म्हणजे ' Continuous overflow of powerful killings ' ही दप्तरदारने ' spontaneous overflow of powerful feelings ' च्या चालीवर केलेली व्याख्या अभिनव तितकीच त्यातील प्रखर वास्तवतेचा स्पर्श असलेली आहे. सध्याचे दलित लेखक हे स्वतःच्या अनुभूतीने भरलेले म्हणून ज्वलंत आणि जिवंत साहित्य निर्माण करीत आहेत. त्यांचे अवघे जीवन त्यांच्या शब्दांत उतरले आहे. त्यांची सारी प्रेरणा त्यांनी आतापर्यंत सोसलेल्या आघातांत आहे. " आज विषाद वाटतो कशा वागवल्या हातात बेड्या, शिळेखाली हात होता तरीही फोडला नाही हंबरडा " या दया पवारांच्या ओळी याची साक्ष देतील. ' दलितांचं, दलितांनी लिहिलेलं स्फोटक विद्रोही साहित्य ' ही राजा ढाले यांनी केलेली दलित साहित्याची व्याख्या अशीच त्यांच्या अनुभूतींतून स्फुरलेली आहे.

दलित साहित्यावर भडकपणाचा, अतिवास्तवतेचा आरोप केला जातो. यात गैर काय आहे ?

" जाळायला बघतोय संस्कृतीचे मढे,
जे शतकानुशतके तिरडीवर पडून आहे, "

असा युगानुयुगांच्या प्रक्षोभाला वाट देणारे साहित्य यापेक्षा वेगळे कसे असेल ? ही दाहकता, उत्कटता हे तर त्याचे वैभव आहे.

वैभवालाही त्याच्या स्वतःच्या मर्यादा येतातच. जो प्रक्षोभ एकेकाळी नावीन्यामुळे काळजाला स्पर्श करणारा वाटत होता तोच आता कंटाळवाणाही वाटायला लागला आहे. त्याच त्याच मुरावटीमुळे प्रारंभीची धार बोथटल्यासारखी वाटते. प्रचार आणि प्रसार या सवंग गोष्टींचा वास दलित साहित्याला येऊ लागला आहे.

या साऱ्या मर्यादांसह आणि दोषांसह हे मान्य करायलाच हवे की, दलित साहित्याने मराठी साहित्याला वेगळे वळण दिले. त्यामुळे दलित साहित्याचे मराठी साहित्यावरील ऋण मोठे आहे,

वाङ्मय–चर्चा मंडळ, बेळगाव, येथील वक्तृत्व स्पर्धेत भाग घेणाऱ्या कु. हिमानी अर्जुनवाडकर ( १२ वी शास्त्र ) हिच्या भाषणाचा विषय होता, ' भारतात लोकशाही रूजली आहे काय ? ' भारतातील लोकशाही तिच्या जन्मापासून आतापर्यंत नेहमी चर्चेचा विषय झाली आहे. आजही घडणाऱ्या प्रसंगांनी पुनः पुन्हा हाच विचार करायला लावला आहे. १९७७ सालच्या निवडणुकीने भारतात लोकशाही रूजल्याचा दावा कोणीही करेल. पण तो फसवा असण्याची शक्यता नंतरच्या परिस्थितीने नाकारता येणार नाही.

'व्यक्ती हा लोकशाहीचा गाभा' या मूलभूत विचारापासून कु. अर्जुनवाडकरने आपला विषय मांडला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास आणि त्यातून राष्ट्रविकास साधण्यासाठी आपण लोकशाही स्वीकारली असे सांगून त्या विधानाच्या प्रकाशात तिने १९७७ च्या निवणुकीचा अर्थ शोधला आहे. 'काँग्रेसचा पराभव आणि जनता पक्षाचा विजय' ही अपूर्व घटना लोकशाहीची आणि व्यक्तिस्वातंत्र्याची आपल्याला चाड होती म्हणून घडली नसून काँग्रेसने आणीबाणीच्या काळात केलेल्या अन्यायाची प्रतिक्रिया होती. ही काहीशी भावनिक लाट होती, वैचारिक नव्हती. असा अर्थ तिला उमगला आहे. आपल्याकडील सदोष निवडणुकीचा निर्देशही तिने केला आहे.

विरोधी पक्षविरहीत भारतीय लोकशाहीचे चित्र रेखाटताना विरोधी पक्षांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणाऱ्या वृत्तीवर कु. अर्जुनवाडकरने बोट ठेवले आहे. पक्षीय लोकशाहीतील आयाराम-गयाराम यांचा निर्देश करताना तिने उपरोधाचा छान वापर केला आहे. तसेच, भारतीय लोकशाहीतील 'विभूतिपूजे'चा दोषही परखडपणे दाखविला आहे. भारतातील मोजक्या विचारवंतांनी लोकशाहीची प्रेमाने आयात केली. पण समाजाला ती पचली नाही; आणि तिची निगा घेतली गेली नाही. याला जबाबदार कोण ? अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, जातीयता इ. प्रश्नांनी ग्रासलेली परिस्थिती याला जबाबदार आहे, असे तिला वाटते. हे चित्र जरी निराशाजनक असले तरी भारतीय परंपरेतील सहिष्णुतेचा धागा वैचारिक लोकशाहीला अनुकूल आणि आवश्यक आहे. तेव्हा त्याच्या आधारावर अद्यापिही भारतात लोकशाही रूजू शकेल असा दृढ विश्वास आणि आशावाद अखेरीला तिने व्यक्त केली आहे.

नाशिक येथे झालेल्या कै. चंदुबाई कुलकर्णी वादस्पर्धेत कु. प्राची क्षीरसागर ( ११ वी शास्त्र ) हिचे भाषण प्रशस्तिपात्र ठरले. सर्वंकष क्रांतीचे उद्दिष्ट केवळ संघर्षात्मक कार्यक्रमांनीच साध्य होईल...? या विषयावर ती बोलत होती.--

"स्वातंत्र्य हे भारताचे इंग्रजी अंमलातील उद्दिष्ट. संघर्षामुळे स्वतंत्र भारताची स्थिती अधिकच हलाखीची झाली. भारतातील निरनिराळ्या पक्षांनी आपापल्या परीने क्रांतीची व्याख्या केली; आणि पक्षांच्या भांडणातच समग्र क्रांती बुडून गेली. संघशक्ती विभागली गेली. राष्ट्रापुढील समस्या, राष्ट्राचे धोरण यांचा विचार नाही.

आजही सर्वंकष क्रांतीची गरज आहेच. ही क्रांती समाजाचा मूलभूत घटक जो माणूस त्याच्या सर्वांगीण विकासाच्या हक्कासाठी. या क्रांतीसाठी दोन मार्ग समोर आहेत. एक संघर्षात्मक आणि दुसरा शांततामय किंवा सहकार्यात्मक. संघर्षात्मक मार्गाचे बहुतेक लोकांना आकर्षण वाटताना दिसते. त्यातून विध्वंसाशिवाय हाती काहीच पडत नाही. कारण, त्यांच्याजवळ पुढील विधायक योजनांचा अभाव असतो. तेव्हा संघर्षात्मक कार्यक्रम कुचकामी म्हणायला हवेत. जगाच्या इतिहासाने हा धडा शिकविला की, रक्तरंजित क्रांती निरर्थक आहे. तिने साधलेला परिणाम क्षणभंगुर असतो.

अंतिम उद्दिष्टाबद्दल मतभेद नसताना संघर्षाची गरज काय, हा मूलभूत प्रश्न आहे. शांतता, सहकार्य हा मार्ग सर्वांच्याच हिताचा आहे. दंडशक्ती किंवा हिंसा शक्तीपेक्षा लोकशाही मोठी आहे. क्रांतीचे आवाहन माणसातील माणुसकीला करायला हवे. नराचा नारायण होण्यासाठी धीर धरायला हवा. लोकशिक्षणाने जे साध्य होईल ते चिरकाल टिकणारे असेल यात शंका नाही."

या तीनही विद्यार्थिनींनी आपापला विषय अभ्यासपूर्वक मांडला. स्वतःची मते, स्वतःचे विचार स्पष्टपणे आणि ठामपणे व्यक्त केले आहेत. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांचे वक्तृत्व उत्तरोत्तर प्रगत होत जावो, ही सदिच्छा !

# महाराष्ट्राचा वाल्मिकी

**रजनी वोकील**, ११ व साहित्य

" शब्द सुचेनासा झाला तर,
नुसतीच शीळ मारीन.
मी असाच चालत रहाणार आहे
मुखी येईल ते गाणार आहे. "

असे म्हणणारे आण्णा खरोखरीच का या जीवनाच्या एवढ्या वाटेवर चालत येऊन एकदम थांबले? निश्चितपणे का या वाटेवरून माया, मोह, कीर्ती, पैसा, कला, साहित्य हे सर्व पाश सोडून, नुसतीच जीवनाची अर्धी वाट तोंडीत शीळ भरीत निघून गेले? स्वतःचे 'मी पण' या जनसामान्यांच्या हृदयात विलीन करून समोर येणाऱ्या काळदैवताचे बोट धरून निघून गेले? दुर्दैवी योगायोगाने, स्वतःच्या मातेचा सत्कार होत असताना तिला चुकवून ते गेले हे सगळे खरे आहे का? हो, हे खरे आहे; परंतु एक कटु सत्य आहे.

हे सत्य कटु आहे कारण या माणगंगा नदीच्या माणदेशच्या माणसाने अख्ख्या महाराष्ट्राला रामायण लिहून दिले अन् जगावेगळी कीर्ती संपादन केली. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात स्फूर्ती दिली, स्वतःच्या गीतांनी! आण्णा म्हणजे आमच्या मराठी बोलणाऱ्या मराठी मनाच्या महाराष्ट्राचे वाल्मिकी, पु. भा. भाव्यांचा लाल डेंगरू, एका थोर आदर्श मातेचा सुपुत्र, जनसामान्यांचे आण्णा म्हणजेच ग. दि. मा. उर्फ गजानन दिगंबर माडगूळकर.

आण्णा हे अव्वल दर्जाचे साहित्यिक होते, तसेच भावकोमल मनाचे, मृदू हृदयाचे कवी होते, प्रेक्षकांना डोळ्यांतून पाणी काढायला लावणारे चित्रपटकथाकार होते, असामान्य महान विनोदी नट होते व मनाला मोहवून टाकणाऱ्या पवित्र गीतरामायणाचे कारागीर होते.

गदिमांचे कार्य अफाट होते. ते सांगावे तितके थोडेच. आठवण झाली की हृदय उचंबळून येते व तेथे ही गोष्ट सुरू होते व जेथे मनाचे विचार, शब्दांचे सामर्थ्य संपेल व डोळ्यांतून फक्त अश्रु झिरपतील तेथेच ही गोष्ट संपते. अशी ही खोलवर अंतःकरणात जाऊन भिडलेली जखम आहे.

चित्रपट कथा, कादंबऱ्या, कविता, लावणी, भावगीते, भक्तिगीते, बालगीते, शाहिरी काव्य, प्रवासवर्णन, लघुकथा ललितकथा, शब्दचित्रे, आत्मचरित्र ह्या क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला. या साहित्यक्षेत्रात आण्णांनी आपली कवितांनी युक्त असलेली मधुर, हळुवार, मोहक पण पावित्र्य अन् मांगल्यांनी भरलेली, म्हणजेच एखाद्या स्त्रीने आपली नाजुक बोटे कुंकुमतिलकाच्या ताम्रकलशात बुडवून ती धरणीमातेवर उमटवावीत त्याप्रमाणेच, ही सतेज साहित्यिक मुद्रा उमटवली आहे.

एखाद्या पक्ष्याला गाणे जितके सहज तितकीच आण्णांना कविता सहज होती. कोकीळेला गायला कंठ फुटावा लागत नाही, तो उपजतच असतो अन् सगळे चराचर, आसमंत धुंद करून टाकतो. त्याचप्रमाणे आण्णांनी स्वतःच्या कवितांनी अख्खा महाराष्ट्र डोलविला अन् केवड्याच्या पानातून सुवास दरवळावा व कस्तुरीमृगाची कस्तुरी वाऱ्याबरोबर उधळावी असा दरवळून सुगंधाने मोहित करून टाकला. आण्णा व काव्य म्हणजे बावन्नकशी सोन्याचा अतूट धागा, आण्णांच्या गीताची जातकुळी ही अभंग व महारवाड्यातील गीतांची सांगड होती.

आण्णांनी बालमने सुखविली, तरुणांना हाक दिली, शृंगाराला साद घातली, तरुणरक्ताला उल्हसित केले. त्यांच्या यौवनाला स्पर्श केला. 'चंदाराणी, चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी " म्हणून बालांना, अबलांना आनंद दिला तर

' जग हे बंदिशाला,
कुणी न येथे भला चांगला, जो तो पथ चुकलेला. "

असे कळकळीने सांगून तरुणांना क्रांतीचे आव्हान दिले.

' चिंचा आल्यात पाडाला
हात नको लावूस झाडाला, माझ्या झाडाला '

अशा लावण्या लिहून महाराष्ट्रातील रांगड्या मराठी माणसाच्या माना डोलावून, हृदय हेलकावून, उचंबळून सोडले तर,

' तारुण्याचा नुकता लागत होता तिज वारा

नुकते कोठे झाले होते वय वर्षे बारा '
अशा काव्यपंक्तींतून शृंगाराला साद घातली.

' धुंद मधुमती रात रे नाच रे
तनमन नाचे यौवन नाचे उगवला रजनीचा नाथ रे
नाथ रे, '

या भावगीतेने तरुण रक्ताच्या धुंद झालेल्या, यौवनाने बहरलेल्या स्त्रीमनाची गोड हुरहूर जागृत केली.

' गंगा आली रे अंगणी '

या गाण्याने तरुणांना उल्हसित केले,

ज्याप्रमाणे या संसाररूपी अजानुवृक्षाची पाने कधीच गळून पडत नाहीत. शिशिरातसुद्धा ती प्राजक्ताप्रमाणे बहरून निघतात त्याप्रमाणे आण्णांची कविता आहे. ते कोमल हृदयाचे कवी असल्याने मानवी जीवनाचे व्यावहारिक चित्रण सुंदर केले आहे.

' उद्धवा, अजब तुझे सरकार
लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार '

परंतु याच आण्णांच्या गीतांनी भारतावर परचक्र आल्यावर सैनिकांना स्फूर्ती दिली,

' हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे '

आण्णांनी आम्हाला काय दिले नाही ? आण्णांनी गेल्या तीन–चार तपांत महाराष्ट्राला पसापसा भरून साहित्यधन दिले. महाराष्ट्रशारदेचा मंडप भान हरपून नाचून गाऊन जागता ठेवला. यशाचे अनेक तुरे मंदिलात रोवून हा शाहीर सभारंगणी उभा राहिला.

' मृत्यू हा अटळ आहे, तो कधीही, कुणालाही चुकणार नाही, पण त्या मृत्यूच्या सीमारेषा दिसेपर्यंत मी माझी लेखणी फिरवणार हीच त्यांची अखेरपर्यंतची महत्त्वकांक्षा होती अन ती त्यांनी पूर्ण केली.

जोपर्यंत या ज्ञानदेवांच्या मराठी भाषेत अपुरेपण नाही, ती कधीही संपणार नाही, अपमानित होणार नाही ती अमृताते पैजा जिंकेल तोपर्यंत, अन या देशातील मराठी बोलणारा मराठी मनुष्य असेपर्यंत ही गीते कधीही नष्ट होणार नाहीत.

आण्णांनी प्रत्येकाला मदत केली. प्रत्येकाला साहित्यिक सहवास दिला, मार्गदर्शन केले. आण्णांजवळ कलेची किमया होती. उपजत जातिवंत अस्सल मराठी भाषा होती. माणगंगेच्या माणदेशच्या माणसांचा प्रभाव होता यामुळेच त्यांची कविता सामर्थ्यवान झाली.

युगात फक्त एखादाच महान कवी निपजतो. लेखक म्हणून गदिमांनी मैत्रीत वयाचे अंतर तोडले. रामजोशींचा सवाई रामजोशी केला. त्यांनी या कलासृष्टीच्या युगात असामान्य कर्तृत्व गाजविले. यावर काळी सावली पडणार नाही.

आण्णांचे दुर्दैवी निधन म्हणजेच महाराष्ट्र सरस्वतीच्या लाडक्या सुपुत्राचा अंत ! त्यांच्या निधनाने एक उदात्त संस्कार लोपला आहे व एक सूर हरविला आहे. विविध रसांवर प्रभुत्व असणारा त्यांच्यासारखा कवी या काळात होणार नाही. गीतरामायणाने ते चिरंजीव झाले. ज्ञानेश्वर तुकाराम यांची महती सांगणारे चैतन्य संपले, लेखणी थिजली, शब्द संपले, आसू उरले, काळीज हेलावणारा एक हुंदका बाहेर पडला.

" आवडे सारखा चाळा, तयाला छंद म्हणतात
कोसळे अंगावरी जो, तयाला फंद म्हणतात "
" कळसावरती असतो पाया, पायावरती कळस चढे
चक्रगतीने फिरते जग हे, अंतामागे जन्म घडे "

**ग. दि. माडगूळकर**

# नंदादीप मालवला

**दीपक करंदीकर**, ११ वी, वाणिज्य

'सत्ता, सौंदर्य आणि संपत्ती या तीन चेटकिणी अप्सरांची रूपे धारण करून माणसाला अनीतीच्या मार्गाला न्यायला टपलेल्या असतात' असे मानवतावादी व वास्तववादी सत्य कथन करणाऱ्या भाऊसाहेब तथा विष्णु सखाराम खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. साऱ्या भारताला ललामभूत ठरणाऱ्या या थोर लेखकाला गरिबीमुळे, अतुलनीय बुद्धिमत्ता, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षा असूनही इंटर पर्यंतच शिकता आले. त्यांना परिस्थितीपुढे नमते घ्यावे लागले. त्यांनी राष्ट्रोद्धाराच्या तळमळीने १९२० ते १९३८ या काळात उत्तम शिक्षकाचे काम करून एक चांगला आदर्श समाजापुढे घालून दिला. परंतु लोकमान्यांप्रमाणे शिक्षकाचे डबके सोडून ते 'साहित्याच्या सागरात' दीपस्तंभाप्रमाणे आपली लेखणी सरसावून उभे ठाकले आणि भारतीय ज्ञानपीठाच्या पहिल्या, लाखाच्या पारितोषिकाचे मानकरी ठरले.

साहित्य क्षेत्रातील १९२० ते १९४० हा काळ म्हणजे हृदयस्पर्शी लेखक भाऊसाहेब खांडेकर यांचा सुवर्णकाळ होय. त्यांनी स्वतःचे जीवनच मुळी साहित्यमय करून टाकले होते. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या.

'हृदयाची हाक' ही त्यांची पहिली कादंबरी होय. त्यात त्यांनी जणू जुलमी रूढींविरूद्ध बंडच पुकारले होते. 'लग्न हे मुला–मुलींच्या मनाचा, आवडीनिवडीचा विचार करून मगच झाले पाहिजे' असे त्यांचे स्पष्ट मत होते. 'कांचनमृग' ही त्यांची दुसरी कादंबरी होय. त्यात त्यानी सुधारणांच्या सोंगांना भुलू नका असे स्पष्ट सांगितले आहे. (शिवाय त्यांनी तर सरळ समाजसुधारणेसच हात घातला आणि तसाच हातभारही लावला) नुसते आराखडे व योजना न करता, शहरांऐवजी खेड्यात राहून आपले ते कर्तव्यच आहे असे समजून समाज सुधारणा कराव्यात असे ते म्हणत.

'क्रौंचवध' ही त्यांची तिसरी कादंबरी. तिच्या प्रस्तावनेत ते लिहितात "समाजसुधारणा या बाहुलीप्रमाणे असतात. सुंदर, पण प्राणहीन. कारण बाहुल्या ज्याप्रमाणे कोणत्याही मातेची वात्सल्यभावना तृप्त करू शकत नाहीत, त्याप्रमाणे या सुधारणा असतात." 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या उक्तीप्रमाणे भाऊंना खरोखरीच शतशः वंदन करावे लागेल, कारण त्यांनी स्वतःच्या जीवनाचा आणि साहित्याचा कधीही क्रौंचवध होऊ दिला नाही.

'लज्जारक्षणार्थही कपडे नाहीत म्हणून घराबाहेर न पडणारी स्त्री मी प्रथम शिरोड्यास पाहिली.' असे ते आपल्या 'उल्का' या कादंबरीत लिहितात. शिरोड्याच्या सत्याग्रहाचे पडसाद तत्कालीन समाजावर व तसेच भाऊंच्या लेखनावर उमटले, त्याचेच उदाहरण म्हणजे ही भाऊंची 'उल्का' कादंबरी. 'उल्का' या कादंबरीच्या प्रस्तावनेत भाऊ लिहितात–" पांढरपेशा, मध्यमवर्ग म्हणजे खराखुरा समाज नाही. त्यांची हुंड्याची, प्रेमाची (प्रेमभंगाची) किंवा अशी अनेक दुःखे ही सर्व बहुजन समाजाची दुःखे नव्हेत हे मला शिरोड्यानेच शिकवले. जगाच्या खऱ्याखुऱ्या उग्र स्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शन मला शिरोड्यास झाले."

वरील थोड्याशा उदाहरणांवरूनही आपणास भाऊ मानवतावादी, वास्तववादी, सत्याचे भोक्ते होते हे दिसून येते. त्याप्रमाणे आपणास हेही समजते की ते एक थोर समाजचिंतकही होते. त्यामुळे समाजास पोषक अशा अनेक चित्रपटकथा त्यांनी लिहिल्या. मुख्यतः 'माझं बाळ', तुझाच, ' 'सुखाचा शोध, ' 'संगम', 'छाया' इत्यादी. "साहित्य म्हणजे केवळ समाजचिंतन" असे ते नेहमी म्हणत असत. ते समाजाचे दर्शन घेऊन ते सत्य स्वरूपात मांडून लोकांपर्यंत पोहोचवीत.

समाजाच्या दृष्टीने दुःखाचा विचार करून ते प्रश्न करतात—" दुःख कोण निर्माण करतो ?" आणि त्याचे समर्पक उत्तरही देतात – " दुःख पर्वताएवढे आहे हे सांगण्यासाठी कोणाही साधूची वा संताची आवश्यकता नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्ती अनुभवाने ते शिकत असते. माणूसच माणसाचा वैरी बनत चालला आहे.

माणसातले मनुष्यत्व जागे न होता नाहीसे झाल्याने व त्याच ओघात माणसाने माणुसकीस तिलांजली दिल्याने ही दुःखे निर्माण होतात; आणि जेव्हा हे पालटेल तेव्हाच पृथ्वीवरील कल्पित स्वर्ग दिसू लागेल.

भाऊसाहेब नेहमी म्हणत, की "कला ही फक्त आनंदासाठीच असते, तिचा दूरगामी परिणाम आपल्या मनावर कधी होतच नाही हे फडक्यांचे म्हणणे साफ खोटे आहे. उलट अशा लेखकास आपल्या सामर्थ्याची जाणीवच नाही असे म्हणावे लागेल."

आणि त्यांनी जी पुढची 'अमृतवेल' ही कादंबरी लिहिली, ती लेखकाच्या सामर्थ्याची जाणीव करून देण्यासाठीच की काय, असे मला ती कादंबरी वाचताना वाटले; इतकी ती प्रभावी आहे.

'अमृतवेल'च्या प्रस्तावनेत ते लिहितात– "भग्न स्वप्नांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्मास आला नाही! मानवी मनाला भूतकाळाच्या साखळदंडांनी बांधून ठेवता येत नाही; कारण त्याला भव्य असे–एक भविष्य-काळाचा व दुसरा स्वप्नांचा–दोन पंख लाभलेले आहेत.

एखादे स्वप्न पाहणे, ते फुलविणे, ते सत्यात अवतरण्यासाठी धडपड करणे, त्या धडपडीचा आनंद लुटणे, आणि दुर्दैवाने ते स्वप्न भंग पावणे व तरीही त्या भग्न स्वप्नांच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणे हा तर मानवी धर्मच आहे. परंतु मनुष्याच्या जीवनाला खरा अर्थ येतो तो फक्त ह्यामुळेच.

कादंबऱ्या, लघुकथा, रूपककथा, बोलपटकथा, ललित निबंध इत्यादी विविध वाङ्मयीन प्रकार हाताळणारा लेखक, योग्य शिक्षक, विचारवंत, समाजहितचिंतक, उत्तम माणूस अशा अनेक छटा घेऊन जन्मास आलेली व्यक्ती जणू अष्टपैलू हिराच, माझ्या माहितीत एकच-भाऊसाहेब खांडेकर.

१९४१ मध्ये सोलापूर येथे भरलेल्या मराठी साहित्य-संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. १९६८ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला होता.

आणि सर्वात सुंदर व भावनाविवश, तसेच साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेली त्यांची कादंबरी म्हणजे 'ययाति'. ही कादंबरी वाचताना वाटते, की ज्याप्रमाणे क्रौंच पक्ष्याच्या जोडीतील नराचा वध झाला त्याप्रमाणे बुद्धी व भावना आणि त्याग व भोग या जोड्यांतील भावनेचा व त्यागाचा वध झाला, आणि भोगाने वरचढ-लेला 'ययाति' साकारला गेला.

नंतर त्यांनी आत्मचरित्र लिहावयास घेतले. त्याचे नाव होते. 'एका पानाची कहाणी' त्यात फक्त सन १९३२ पर्यंतच्याच घटनांचे चित्रण केले गेले असून त्याची फक्त चारशेच पाने पूर्ण झाली आहेत...परंतु आता ही 'एका पानाची कहाणी' अपूर्णच राहिली आहे.

'सोनेरी स्वप्ने भंगलेली' ही भाऊंच्या जीवनातील अखेरची कादंबरी ठरली. या कादंबरीतही भाऊ मानवतावादी आहेत हे प्रत्ययास येते. किंबहुना, नुसती प्रस्तावना वाचताच हे जाणवते. ते प्रस्तावनेत लिहितात–

"हरिणी जिवाच्या आकांताने धावत होती. धावता धावता तिच्या तोंडाला कोरड पडली. तिने हताशपणे मागे पाहिले. पारधी मागून येतच होता. पुढे जायला वाटच नव्हती. आता काही क्षणातच पारध्याचा बाण आपल्या काळजात घुसणार, या कल्पनेने ती गर्भगळित झाली. पण संकटानेच तिला धैर्य दिले. पारध्याकडे तोंड करून ती निश्चयपूर्वक व निश्चलपणे उभी राहिली. हरिणीने जणू आपल्या स्वागताचीच तयारी केली आहे असे वाटून तो आश्चर्यचकितच झाला. तिच्यावर रोखलेला बाण त्याने फेकून दिला.

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी हरिणीवरती आली. ती पारध्यास म्हणाली, "आतापर्यंत तू माझा पाठलाग करीत होतास, मग माझ्यावर रोखलेला बाण तू फेकून का दिलास?" पारधी निरुत्तर झाला. हरिणी म्हणाली, "मी सांगते तुला. क्षणभर एक विचित्र चित्र तुझ्या डोळ्यां-समोरून तरारून गेले. त्यात माझ्या जागी तू व तुझ्या जागी तुझा मृत्यू तुझ्यावरच बाण रोखून उभा आहे."

ह्या झाल्या जनस्तुतींनी ओथंबलेल्या कादंबऱ्या. परंतु अजूनही काही उत्तम कादंबऱ्या भाऊंनी लिहिल्या आहेत. —दोन ध्रुव, अश्रु, हिरवा चाफा, जळलेला मोहर, दोन मने, पहिले प्रेम, रिकामा देव्हारा, सुखाचा शोध इत्यादी.

आपल्या साहित्यलेखनाबाबत भाऊ लिहितात—

"पन्नास वर्षे मी कथापंढरीचा वारकरी म्हणून झेंडे-पताका मिरवल्या. प्रथम मी तरुण वारकरी होतो. मला कथापंढरीतच राहावयास आनंद वाटे. त्याबद्दलच्या उत्साहाला, आनंदाला दाही दिशा उण्या भासत. नंतर मी थकलो, तो शरीराने. मनाने कधीच नाही. आता मात्र मी खरोखरीच वृद्ध बनत चाललो आहे."

"कथेने कथा म्हणूनच फुलले पाहिजे. कथेला जरी आपण सोडले तरीही कथा आपल्याला सोडत नाही."

असे भाऊ नेहमी म्हणत.

साहित्य व जीवन यांचा कधीही क्रौंचवध होऊ न देणाऱ्या या थोर, अलौकिक, अनोल समाजसुधारकास माझे शतशः वंदन.

२ सप्टेंबर १९७६ रोजी हा नंदादीपातील दीप निमाला. 'कालाय तस्मै नमः।' आपल्या या आवडत्या लेखकाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी वाचक भर पावसातही उभे होते. जणू त्या पावसानेच हा नंदादीप मालवला होता. मला तर वाटते, विधात्यानेच जणू आपल्या मुकुटाच्या कोंदणात बसविण्यासाठीच हा अष्टपैलू कौस्तुभ निवडला असावा. त्यामुळे दुःखाने हुंदका देण्यासाठी खाली जाणारी मान, अभिमानाने ताठ होते...

मुक्या मनाने किती उडवावे, शब्दांचे बुडबुडे।
तुझे पवाडे गातिल पुढती, इतिहासी चौघडे ॥

"कुणाचंही दुःख असो. ते कळण्याचा मार्ग या जगात एकच आहे; तो म्हणजे त्याच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करणं हा!"

"...निस्वार्थी, निरहंकारी प्रेम हीच माणसाच्या आत्म्याची विकासाची पहिली पायरी असते. असलं प्रेम केवळ मनुष्यच करू शकतो."

**वि. स. खांडेकर**

# 'चिरतरुणा रे चिररुचिरा रे'

**वंदना दिवाकर**, ११ वी, साहित्य

अर्वाचीन मराठी काव्याचे जनक आणि क्रांतिकारक कवी म्हणून केशवसुतांचा सार्थ गौरव केला जातो. केशवसुतांनी विषय, रचना आणि अभिव्यक्ती या साऱ्याच अंगांनी मराठी काव्यात आमूलाग्र बदल घडवून आणला व एक नवी परंपरा समाजापुढे ठेवली, म्हणून त्यांना 'युगप्रवर्तक कवी' असे म्हटले जाते. कवींच्या स्वातंत्र्याचा उच्चार त्यांनी प्रथम केला आणि प्रतिभेचे माहात्म्य कवीचे सामर्थ्य व काव्याचे प्रयोजन या विषयीचे आपले चांगले विचार, त्यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केले. साध्या विषयात आशय केवढा मोठा असतो तसेच त्याच्यात सौंदर्य कसे असते हे त्यांच्या काव्यलेखनातून आढळते. केशवसुतांनी सुनीतरचना मराठीत जाणीवपूर्वक आणली. ती रचना पुढे समाजात रूढ झाली. स्फुट कविता, उद्देशिका ह्यांचा जाणीवपूर्वक वापर त्यांनी आपल्या काव्यात केला आहे. व्यक्तिगत अनुभवांना व भावनांना व्यक्त करणारी त्यांची आत्मनिष्ठा, संवेदनशीलता, सामाजिक रूढींविरुद्ध बंडखोरी आणि निसर्गाकडे बघण्यासाठी कलात्मक दृष्टी अशी अनेक वैशिष्ट्ये त्यांनी मराठी काव्यात आणली. केशवसुत हे भाषाप्रभू नसले तरी त्यांची भाषा अनुभवानुसार कधी ठसठशीत व परखड तर कधी मृदू आणि आणि कोमल रूप सहजगत्या धारण करते. सामान्य माणसाच्या सुखदुःखांना हर्षविषादांना त्यांच्या कवितेत प्रथम श्रेणी मिळाली आहे. अशा तऱ्हेने क्रांतिकारक आशय आणि रचनेचे नवेनवे प्रयोग यामुळे केशवसुतांनी मराठी कवितेचे क्षितिज व सामर्थ्य वाढवले. त्यांच्या अनेक कविता गाजल्या आहेत. 'नवा शिपाई' 'गोफण' 'स्फूर्ती' 'सतारीचे बोल' 'तुतारी' 'रांगोळी घालताना पाहून' इ. 'आम्ही कोण?' ही एक त्यांची नावाजलेली कविता असून, कवीचे मोठेपण मनावर ठसवितानाच प्रतिभेचे व कल्पनाशक्तीचे अद्भुत सौंदर्य व सामर्थ्य त्यांनी अतिशयोक्तीपूर्ण परंतु प्रभावी स्वरूपात वर्णिले आहे. "आम्ही कोण?" ही केवळ

कवीची कैफियत नसून सर्व कलावंतांची ती कैफियत आहे अशी कल्पना त्यांनी मांडली आहे. कलावंत शून्यामधून असामान्य सौंदर्य निर्माण करतात. कलावंतांना जर वगळले तर आकाशातील तारे नाहीसे होतील. त्याचप्रमाणे कलावंतांना जर वगळले तर जगणे फार कठीण होईल.

केशवसुतांनी निसर्गाला उद्देशून 'पुष्पाप्रत' ही कविता केली आहे. त्यांच्या भावव्याकुल अंतःकरणाची उदासीनता आणि खोल निराशा टिपणारी अशी ही एक आत्मनिवेदनपर कविता आहे. 'पुष्पाप्रत' ही कविता फुलाला उद्देशून आहे. या कवितेत त्या फुलाच्या वर्णनापेक्षा त्या फुलाच्या दर्शनाने कविमन कसे भारावून जाते त्याचे वर्णन केले आहे म्हणून ही कविता आत्मनिष्ठ आहे. या कवितेत फूल हे निसर्गाचे प्रतीक मानले जाते. बालपणी फुलाला पाहताना जेवढा आनंद होतो तेवढा आनंद प्रौढावस्थेत होत नाही. परंतु कविता आत्मसात करताना एक मुख्य गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे, कवीला येथे कोणतेही एक फूल अपेक्षित नाही. सगळी पुष्पजात जिवंत उभी राहाते. 'पुष्पाप्रत' या कवितेत कवी निसर्गसौंदर्याने भारावून जाण्याऐवजी तत्त्वचिंतक होतो. म्हणून श्री. मं. वि. राजाध्यक्ष म्हणतात, "हे काळीज जाळणाऱ्या अशांतीचे गाणे आहे." 'पुष्पाप्रत' या कवितेत पहिली बारा कडवी ही 'अंजनी गीता' या जातिवृत्तातील असून शेवटचे कडवे हे 'इंद्रवज्रा' या अक्षर गणवृत्तात आहे. अशा या कविमनाचे आणि फुलाचे वर्णन कसे केले आहे हे पाहाण्यासारखे आहे. रम्य उषःकाली एक सुंदर फूल कवीच्या दृष्टीला पडते व कवीला आपल्या बाळपणीचा काळ आठवतो. त्या हरपलेल्या सुंदर दिवसांची हुरहुर लागते. फुलाच्या चिरतरुण सौंदर्याने कवी भारावतो. क्षणात चित्तवृत्ती उफाळतात व प्रौढावस्थेतल्या काळज्यांनी मन खिन्न होते.

फूल म्हणजे त्याचा बालपणीचा सवंगडी. तो अजून तितकाच सौंदर्यनिर्भर, निर्व्याज आहे. हसतो आहे, डोलतो आहे आणि आपले मात्र हे अमृतक्षण संपले, ही जाणीव कवीला अस्वस्थ करते. आणि तो उद्गारतो "गेला काळ अहह तो!"

तलम धुक्यात, अद्भुत वातावरणात फूल डोळे किलकिले करून बघते तेव्हा भगवान सूर्याची सोनेरी किरणं त्याला न्हाऊ घालत असतात. उषःकालचा शीत, मंद वात त्याला झोके देत असतो. पक्षीगण त्याच्यासाठी जणू भूपाळ्या गात असतो अशी मनोहर कल्पना त्यांनी मांडली आहे.

केशवसुतांचे स्वतःचे जीवन दारिद्र्यात गेले. जीवनाबद्दलच्या आशा-आकांक्षांच्या बाबत कवी निराश झाला होता. हा खिन्न हळवा सूर 'पुष्पाप्रत' मध्ये डोकावतो.

'काळोखाच्या जगामधे या
मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच्च माझे भटकत आहे–शांति नसेची तया.'

निसर्ग अन् मानवीजीवन यांच्यातला विरोध इथे दिसतो. आपल्यात आणि फुलात केवढा बदल झाला आहे–

चिरतरुणा रे! चिर रुचिरा रे
तुज सन्निध तो वास बरा रे
तुजमजमध्ये परी केवढी आहे रुंद दरा!

फुलाच्या चिरतरुण सौंदर्याने कवी हरखतो पण त्या दिव्य जीवनाला स्पर्श करण्याचे धाडस त्याला होत नाही. कारण फुलाचे निरागस जीवन आणि आपण दोन्ही किती भिन्न आहे ह्याची जाण त्याला असते. म्हणून तो म्हणतो, 'तुझे सौभाग्य गाण्यास मी पात्र नाही. तुझे स्तोत्र तुझे भुंगेच गातील.'

फुलाभोवती गुंजारव करणारा भुंगा कवीला भाग्यवान वाटतो. जणू भुंगा आणि फूल यांचे हितगुज असते आणि म्हणून भुंग्याच्या स्वरांनी आपले दुःख हलके होते.

शुचित्व, प्रसन्नता अन् निस्वार्थीवृत्ती निसर्गाच्या कणाकणांत भिनली आहे. याचे प्रतीक ते फूल! अशा या कविमनाच्या आठवणी वाचून माझ्या मनातही फुलाच्या सौंदर्याचे जिवंत प्रतीक उभे राहते.

# प्रिय चिमणराव....

कु. वर्षा दप्तरदार, १२ शास्त्र

प्रिय चिमणराव,

'प्रिय' वगैरे पुकारणं हा सदाशिव पेठेचा शिरस्ता नाही आणि त्यात एखाद्या मुलीनं तर नाहीच नाही!... आठवतं का, गुलाब तुम्हाला म्हणाली होती, "आप्पा, हे ऋषीपंचमीचं सामान तुम्ही आणलंत. मग हे सामान ऋषीपंचमीला चालणार नाही. बैलाच्या श्रमाचं चालत नाही. तेव्हा!" याचा वचपा काढायचा तुमचा बेत अगदी पक्का झाला. अन् लेखणीच्या जोरावर युद्ध खेळायचं ठरवलंत! सरळ एक फर्मास (तुमच्या मते) कथा लिहायला घेतली. कथा नायकाची कांगावखोर प्रेयसी—'बोक्यासारखं गुरगुरणारी, मांजरीच्या डोळ्यांची ...भांडखोर!' बरोबर गुलाबचंच वर्णन होतं ते. नायकाने धडधडत्या की थडथडत्या हृदयाने (कथेत) लिहिले...'प्रिय...तुम्हाला प्रिय तरी कसे म्हणू?"

मोन्याने नेमके तेच कागद पतंगासाठी ढापले अन् कसे काय कोण जाणे ते गुलाबच्या हाताला लागल्यावर ती कातावून ओरडली, 'आप्पा, शोभतं का हे या वयात? काऊ, अग काऊ, बघ तुझ्या पतिराजांचा हा पराक्रम!' 'ही कथा आहे' असं सांगायचा तुम्ही किती प्रयत्न केलात. पण छे! तो गुलाबच्या नाकाचा फेंदारलेला शेंडा, काऊताईचे खदिरांगारासारखे (की काय म्हणतात) तसे डोळे पाहून हताश झालेली तुमची मुद्रा दिसते अन् मनापासून हसू येते.

चिमणराव, असे हताश होण्याचे प्रसंग आमच्यावर थोडे का येतात? फसवल्या गेल्याचा, अतीव दुःखाचा अन्....जाऊ दे! विमनस्कता आली की माझे मन अगदी सहजच चिं. वि. जोगांचा दरवाजा ठोठावते. दरवाजा उघडाच असतो. सोप्यातच मोरु, मैनी, राघू असतात. झोपाळ्यावर तुम्ही बहुधा 'केश्री' वाचत असता, आई माजघरात जपाची माळ घेऊन बसलेली असते. काऊताई स्वयंपाकघरात दंग असते. कोन्याकरकरीत संध्याकाळी चित्रविचित्र कल्पनांच्या सावल्यांच्या वावटळी दूर उठत असतात. मर्ढेकर, तेंडुलकर कोणाच्या दाराकडे ढुंकूनही न पाहाता मी थेट तुमच्या दारात येते. सोप्यात आणखी गुंड्याभाऊ, घोंडोपंत वगैरे मंडळी असली की माझ्यासारखी भाग्यवान मीच! दूर बैठक मारून मी मनसोक्तपणे तुमच्या गप्पा ऐकते. गुंड्याभाऊच्या दंड्याची बहारदार वर्णनं ऐकून फुरफुरणारे तुमचे बाहू मला स्पष्ट दिसतात...'एखादा लक्षाधीशाचा मुलगा विहिरीत बुडतो आहे! आपण त्याला वाचवण्यासाठी विहिरीत सूर मारला आहे! बक्षीस म्हणून भलीमोठी पुंजी...!' तुमचे स्वप्नातले धाडस माझ्या डोळ्यांसमोर येते. त्या धाडसाला 'भाबडे' हे विशेषण लावायचा अनावर मोह मी टाळते आहे. प्रिय चिमणराव, मला तुमच्याशी खरंच मनापासून गप्पा मारायच्या आहेत.

स्वप्नं, आमची काय अन् तुमची काय? सगळाच भाबडेपणा! प्रचंड भाबडेपणा! पण प्रत्यक्षात काही जमलं नाही की तुम्ही जो हास्याचा विलक्षण फवारा उठवता! अन् कुढत बसण्याखेरीज आम्हाला दुसरा उपाय नसतो. हसवायची जी विलक्षण किमया तुमच्यापाशी आहे, म्हणूनच कोन्या करकरीत संध्याकाळी मला तुमच्या माजघरात किती उबदार वाटतं!

'आप्पा आज आम्ही डोंगरावर गेलो होतो. फुलांतले स्त्रीकेसर–पुंकेसर पाहायला!' मोन्यानं असं काही म्हणताच एकदम हॅवॉक उडतो. अभंग, श्लोक वगैरे म्हणायच्या ऐवजी पोरं सहलीत खय्यामचे शेर वगैरे म्हणतात हे ऐकून तुमच्या सदाशिवपेठी माजघरात उडणारा कोलाहल मी हसऱ्या मुद्रेनं न्याहाळते. प्रो. हणमंतरावांच्या—'मुलांची जिज्ञासा फुलवा' इ. तत्त्वज्ञानानं तुम्ही कसे भारून जाता. पण शेवटी पोरं ती पोरंच! दिवस संपतो पण शंका संपत नाही. वाघाला पट्टे आहेत मग सिंहाला का नाहीत? हा मैना अन मोन्याला रात्री बारा वाजता छळणारा प्रश्न! घोरणाऱ्या आप्पांना जागं करण्याची नामी शक्कल मोरू शोधतो. गुंतवळ नाकात घालून बापाला उठवण्याची डोकेबाज आयडिया आपल्याला आवडली बुवा! काय धमाल पोरं आहेत! दुस-

ऱ्याच दिवशी, ' आप्पा, आई कुंकू लावते तर आजी का नाही हो लावत ? ' ही मूलभूत शंका पोरं काढतात अन् तुमची आई अन् काऊताई हातात लाटणी अन् झाडू घेऊन जो हल्ला चढवतात की बस रे बस ! ' शंका विचारतात कार्टी ! ' बस्. ' जनरेशन गॅप, ' ' संतप्त युवापिढी वगैरे गहन प्रश्न या झाशीच्या राण्या चुटकीसरसे उडवून लावतात. या नसत्या खुळांनी येणारं दडपण कसं विरघळून जातं. चिमणराव, अन् हे पेल्यातलं वादळ तसंच शमून जातं.

खरंच सांगते आप्पा, किती जण म्हणतात– ' किती मिळमिळीत जीवन ! सदाशिवपेठी चित्रण हं ऽऽ ! ' मला जाम राग येतो. वास्तववाद, नवकाव्य म्हणून भुई धोपटणाऱ्या आगाऊंना मी, ढसाळ, तेंडुलकरांची घरं दाखवते. अनेकदा धक्के मारून सुद्धा दार न उघडल्या गेल्याच्या गोष्टी ते ( दीड ) शहाणे मला येऊन सांगतात.

चिमराव, तुमच्या पगारात कपात होणार होती तेव्हा तुम्ही किती चिंताक्रांत झाला होतात. ते आठवतं का ? काऊताई अशी दरवाज्यात कमरेवर हात ठेवून उभी होती. देवाच्या तांदळाची वाटी पूर्ण भरली नाही म्हणून आईनं फुणफुण सुरू केली. '–सगळी काटकसर मेली ती देवाच्या तांदळात ! ' हे आईचे उद्गार तुम्ही सोयीस्करपणे कानाबाहेर केले. मला सांगा—मध्यमवर्गीय जीवनात दुसरा कोणता वास्तववाद खरा आहे ?

आप्पा, आळूची पुणेरी फक्कड भाजी तुम्ही ओरपता अन् काऊताई कपाळ चढवून विचारते—' मीठ जास्त झालंय का ? ' तुम्ही चक् केल्यावर ती म्हणते ' गूळ ? ' ' अगदी छान '– मग ' तिखट तरी ? ' अशी पृच्छा झाल्यावर काऊला खूष करण्यासाठी भाजी भुरकत म्हणता–' तिखट, मीठ, गूळ सारं कसं झक्क पडलंय ! ' अन्...काऊ दणदिशी पातेलं आपटून म्हणते. ' मग खा सगळी ती तुम्हीच ! ' ' का बुवा ? ' असा प्रश्नार्थी चेहरा करून तुम्ही मोरूकडे बघता आणि...' ' भाजी आज आत्यानं केली आहे ' असं उत्तर मिळतं. खरोखरीच नणंदाभावजयांचे प्रेमसंबंध इतक्या कुशलतेने आजवर तरी कुणी कधी दाखवले नाहीत.

चिमणराव, तुमचा तो ' का बुवा ' असा प्रश्नार्थी चेहरा मला नेहमी दिसतो. तुमचाच नाही तर आमचाही चेहरा देखील अनेकदा असा ' का बुवा ' होऊन जातो. चिमणराव तुमच्या आळूच्या भाजीची गोष्ट मला माझ्या ' जीवघेण्या ' ' का बुवाला ' हसायचं धाडस देते.

काऊताई आजारी पडल्यावर स्वयंपाकाचे फार हाल होतात आणि गुंड्याभाऊला–' एक बाई ठेवायची आहे ' सांगून तुम्ही अशी काही जीभ चावता ! तर केसरीतल्या बातम्या बघण्यासाठी वर्तमानपत्र विकणाऱ्या पोऱ्याकडून केसरी घेता. विकत घ्यायच्या आधी चांगली दहा मिनिटं वाचता अन मग ' चांगल्या बातम्या दिल्या नाहीस गद्ध्या ' असं म्हणून वर्तमानपत्र साभार ( आभार डोंबलाचे ) परत करून सायकलवर टांग मारण्याचा पुणेरीपणा बाकी सराईतपणे करता हं ! बाकी तुम्ही पक्के संसारी आहात. स्वतःच्या पराक्रमाच्या बड्या बड्या बाता पोरांना खुलवून सांगताना मी स्वतः ऐकलं आहे. कधीमधी तुम्हालाही विरक्ती येते पण काऊनं खमंग थिरडं वगैरे केलं की तीही पळून जाते. तुमचे गमत्ये धोंडोपंत अन् गुंड्याभाऊ बावळट, लबाडपणा, भाबडेपणा...तुमच्यात सगळ्यांचंच मोठं मासलेवाईक मिश्रण आहे.

हा गप्पांचा प्रवास अनंतापर्यंत चालायला हवा. या उबदार संध्याकाळी जोगांच्या गोतावळ्यात एका सुखाच्या अन् समाधानाच्या गुंगीत माझी तंद्री लागून राहाते. ' पानं वाढली आहेत. ' असा काऊताईनी आतून पुकारा केल्यावर मात्र मी काढता पाय घेते.

# निद्रायोग

**अभिजित वैद्य १२ शास्त्र**

हल्ली रोजचं दमणं होतं.क्लास, प्रॅक्टिकल आणि कालेज. त्यातही आकाशातल्या बाप्पाची अवकृपाच. आमचं घर केंद्रबिंदू घेऊन एक मैल त्रिज्येचं वर्तुळ काढलंय असं माना. तर या वर्तुळाच्या व्यासाच्या एका टोकाला आहे क्लास आणि दुसऱ्या टोकाला आहे कॉलेज ! अर्थात हा संपूर्ण प्रवास सायकलवरूनच ! अनेक वेळा ही घोडदौड चालू असता पोटात असह्य डोंब उसळतो. घोडदौड चालू असता उसंत न घेता शेतातली बाजरीची कणसं तोडून लाल मिरचीबरोबर हातावर चोळून खाणाऱ्या बाजीरावाची आठवण येते. आशाळभूतपणे सभोवार नजर फिरते. दिसतात त्या रस्ते झिजवणाऱ्या गाड्या, डांबरी रस्ते, कडेची भावनाशून्य घरे, आणि त्याचबरोबर दृष्टीस पडतात ते इस्त्री केलेले चेहरे, चेहेऱ्याची घडीही मोडू न देता वावरणारे ! पोटाला विश्वासात घेऊन सांगावं लागतं. 'यार, जरा सबुरीनं घे. समोर बघ. नीट बघ. काय दिसतंय ? घर दिसतंय ना ? आता फक्त थोडा वेळ. एकच मिनीट हा येवढा चौक पार केला की...

घरी आल्यावर होमात हवन करून, काही वेळ खेळणं वगैरे आटोपलं की मी अभ्यास करतो. अभ्यास जेवणानंतरही काही वेळ चालू असतो; आणि मग मात्र मी वाचतोय का झोपतोय असा प्रश्न पडू लागतो. मानेला वारंवार गचके बसू लागतात. दिवा असूनही अंधार वाटतो. मग मी जाणतो की आता पुरे. हात अतीव उत्कंटेने पुस्तकं मिटून ती कपाटात ठेवून देतात.

...आणि तो क्षण समीप येऊन ठेपतो. चेहऱ्यावर जणू हजारो वर्षे प्रतीक्षा केल्याचा भाव आहे. अस्फुट अशा डोळयाच्या पापण्यांतून आनंद सांडतो आहे. मी शांतपणे माझी दृष्टी पलंगावरून फिरवतो. सकाळी शोभेसाठी टाकलेली त्याच्यावरची चादर ओरबाडून काढतो. खरं पाहिलं तर तीही काढायला मला आवडत नाही. पण सकाळी उठल्यावर मातुश्रींकडून मानसिक इजा होण्याचा संभव असतो. म्हणून नाइलाजास्तव दुसरी चादर टाकावी लागते. हे कार्य आटोपल्यावर मी क्षणभर काही क्रांतिकारक विचार करतो. या सगळया शहरी शिष्टाचारांचा बळी देण्यासाठी मी जन्माला आलो आहे. अशी माझी ठाम समजूत आहे. पारतंत्र्यात परदेशी कापडांच्या जशा चौकाचौकात होळ्या करण्यात आल्या तशा जीवनातल्या मोकळेपणाला हद्दपार करणाऱ्या या शिष्टाचारांची होळी केलीच पाहिजे...वगैरे क्रांतिकारक विचार मनात आल्याने मला माझे असामान्यत्व जाणवून मी सुखावतो आणि निदान शहरात राहाण्यासाठी मला पाळावे लागणारे शिष्टाचार कपाटातल्या हँगरला लटकावून मी बेधडक सर्वांग पलंगावर लोटून देतो. चादर पार विस्कटते. राहू द्या. त्यानं फारसं काही बिघडत नाही. दिवसभर दमून रात्री पलंगावर झोपल्यावर थोडं फार हलल्याने विस्कटलेली 'बेडशीट' पाहून "ओहो, माय डियर ! इट इज अ मॅनरलेस वे ऑफ स्लीपिंग". असं म्हणणाऱ्या युरोपियन यजमानिणीचा जाहीर निषेध असो.

तर मग मी क्षणभर आढ्याकडे पाहातो. नंतर डाव्या-उजव्या कुशीला वळून पहातो. सोयीस्कर वाटेल तशी 'पोझ' घेतो. आढ्याकडे पाहाणे बरं वाटल्यास पाय खिडकीच्या गजाच्या आधाराने तरंगत ठेवतो. कुशी बरी वाटल्यास लोडावर हातपाय झोकून देतो. आणि मग सावकाश डोळे मिटून घेतो. ओहो ! तरीदेखील एक गोष्ट राहिलीच ! लहानपणी झोपायच्या आधी आई मला नेहमी म्हणायला लावायची—

पड पड पुडी<br>
तुळशीच्या बुडी<br>
गंगेच्या काठी<br>
कृष्णेच्या काठी

असं म्हटल्याने म्हणे वाईट स्वप्नं पडत नाहीत. काय महान सामर्थ्यं आहे या मंत्राचं ! पण सध्या मी हा मंत्र म्हणत नाही. चांगली स्वप्नं अनेकवेळा पडतात. (अर्थात आधुनिक नवपऱ्यांची.) त्यामुळेच वाईट स्वप्न पडल्याशिवाय त्यात काही मजा नाही असं वाटतं. पण या स्वप्नांनी माझ्या अनेक सुप्त आकांक्षा पुऱ्या केल्या

आहेत. अनेक शूरवीरांनी माझ्या मनात संचार केला आहे. भगतसिंग बनून हसत हसत गळयात फास लटकावला आहे. अनेक साहसं केली आहेत. लालसावलेल्या अग्निज्वालांतून हजारोंचे प्राण वाचवले आहेत. कुशल वैमानिक बनून पेटलेल्या विमानाला मोठ्या हिमतीने खाली उतरवून सर्व प्रवाशांचे प्राण वाचवले आहेत आणि त्यासाठी स्वतःचं आयुष्य हसत समर्पित केलं आहे. दरोडेखोरांच्या भूमिकेतही जाऊन पाहिलं पण तुरुंगाची हवा खावी लागल्यावर तो नाद सोडून दिला. मला सर्व माहीत असलेल्या सर्व महात्म्यांचे, विचारवंतांचेही जन्म घेतले. सध्या उजळणी चालू आहे. मात्र कॉलेजमध्ये आल्यापासून हल्ली हल्ली मोटारसायकलवर बसून मुलींच्या घोळक्यांपुढून फिरत असल्याची किंवा 'बॉक्सर' झाल्याची स्वप्ने वारंवार पडू लागली आहेत.

तर अशा तऱ्हेने जागेपणीच्या नाहीतरी निदान स्वप्नातल्या माझ्या कर्तृत्वाची बेरीज अफाट झाली आहे. म्हणून परमेश्वरापर्यंत नेणाऱ्या आध्यात्मिक योगापेक्षा अनेक असाध्य आकांक्षांना मूर्त स्वरूप देणारा हा निद्रायोग मला जवळचा वाटतो.

तर अशा या निद्रायोगाची सांगता मी त्या मंत्रानं सध्या करत नाही. रोज आठवण मात्र होते. आता डोळे मिटायला हरकत नसते. शांतपणे डोळे मिटून मी जमेल तितक्या सुस्वरात घोरायला सुरुवात करतो. कारण शहरात बालपण गेल्याने झोप लागल्यावर घोरणं मला जमत नाही. म्हणून आधीच सुरुवात करतो. झोप लागल्यावर मात्र ताल पारच बिघडत असावा कारण उठल्यावर आईच्या शिव्या खाव्या लागतात. मी 'तिला संगीतातील काही कळत नाही.' असं मानून स्वतःचं समाधान करतो.

"हूं! मॅनरलेस क्रीचर!" कोणी म्हटलं हे? लक्षात असू द्या, हे फार जड जाईल. शाळेत इतिहासाच्या पुस्तकात जेव्हा महायुद्धांचा उल्लेख असायचा तेव्हा एक वाक्य असायचं 'अशा तऱ्हेने असंतोषाच्या ठासून भरलेल्या दारूवर तत्कालिन निमित्ताची ठिणगी पडून महायुद्धाचा भडका उडाला' इतिहासकारांचे हे लाडके वाक्य दहावीच्या पुस्तकातही होते. सध्या माझ्या मनात ही दारू ठासून भरली आहे. तिला फक्त काहीतरी निमित्तच हवं आहे की मग प्रचंड स्फोट! दिवसभर थकून गेल्यावर शहरी शिष्टाचारांच्या चौकटीतच झोपावं हे सांगणारे तुम्ही कोण? छोड दो यार! कुणीतरी भंकस आदमी दिसतो आहे.

अशा तऱ्हेनं घोरायला सुरुवात केली की झोप कधी लागते ते समजत नाही. डोळयांपुढे अनेक रंगांची काळपट छटांची वलयं फिरू लागतात. सारा शीण त्या वलयांमध्ये विरून जातो. मग हळूहळू पांढरे तुषार दिसू लागतात. विलक्षण वेगाने ते थरारत असतात. सावकाश त्यांचा वेग कमी होतो. त्यातून एक रुपेरी पडदा साकारतो. आणि मग एखाद्या स्वप्नाला सुरुवात होते. हा निद्रायोगाचा अत्युच्च बिंदू. मी स्वतःला हरवून जातो. अवयवांना विसरतो. चंदेरी स्वप्नात पूर्णपणे विलीन होतो. फक्त या एकतानतेचा परिणाम एवढाच होतो की सकाळी मला मी फरशीवर आढळतो. (अर्थात क्वचितच असं होतं.) पण असला अति 'उच्च दर्जाचा' 'निद्रायोग' या वयात पचण्यासारखा नाही हे माझ्या मनानं जाणलं आहे. हळूहळू पलंगापुरता मर्यादित 'निद्रायोग' मला दुर्दैवानं स्वीकारावा लागणार आहे.

निद्रायोगातला घोरणं हा एक महत्त्वाचा विधी आहे. त्यामुळे आपलं मन निद्रायोगाशी पूर्णपणे तन्मय पावतं. पण मला कित्येक वर्षांत 'अभिजात घोरणं' ऐकायला मिळालेलं नाही. ते ऐकण्यासाठी कान आसुसले आहेत. माझे एक चुलत आजोबा मात्र 'अभिजात घोरक' होते. ते संगीतातले मोठे दर्दी होते. साहजिकच त्याची छाप त्यांच्या घोरण्यावरही पडली होती. मी त्यांचं घोरणं मंत्रमुग्ध होऊन ऐकत बसायचो. प्रथम ते हाताची घडी घालून आढ्याकडे तोंड करून झोपत. काही वेळ तसाच जाई. आणि मग त्यांच्या गळयातून निनादणारा झंकार नाकातून मंदपणे बाहेर येई. त्याला एक लय येई. आणि काही वेळाने रंग भरे, अप्सरांच्या तालबद्ध पदन्यासारखं हे घोरणं होतं. शेवटी ते बेभान होऊन घोरू लागत. त्यात एक झिंग आणणारी मादकता होती. नंतरच्या प्रत्येक आंदोलनाबरोबर भोवतालची प्रत्येक वस्तू कंपायमान होऊ लागे. त्या कंपनांना विलक्षण वेग आल्यासारखा वाटे.

काही घोरक हे काळ्या दोन, तर काही काळ्या तीन पट्टीत घोरतात. काहींना फार उच्च स्वरात घोरण्याची सवय असते. काही कुत्र्यासारखे गुरगुरतात तर काही 'शेर' डरकाळ्या फोडतात. हे माझे आजोबा वरच्या पट्टीत घोरत पण कधी बेताल होत नसत. लहानपणी मला राहून राहून वाटे की संगीताच्या उद्गात्याला ही कल्पना कुणाचतरी घोरणं ऐकूनच सुचली असावी.

या निद्रायोगाचे अनेक प्रकार आहेत. यांचं वैशिष्ट्य

असं की प्रत्येकजण जन्मतःच याचं वरदान घेऊन येतो. फक्त 'अभिजात निद्रायोगी' बनण्यासाठी शिष्टाचार तेवढा झटकला पाहिजे. अर्थात या बाबतीत इतरही कसोट्या आहेतच. शक्य तेवढा जबडा रुंदावून चुटकीच्या तालावर भयानक आवाज करीत जांभई देता येणं. मग तिचा उपयोग वक्त्याचे (?) कंटाळवाणे भाषण, मित्राच्या वैतागवाड्या गप्पा, या प्रसंगी प्रखर–परिणामकारक शस्त्रासारखा करता येणं ही सर्वात महत्त्वाची कसोटी.

निद्रायोगाची स्थानंही निरनिराळी असतात. एस. टी. अथवा रेल्वेतून प्रवास करणाऱ्या निद्रायोग्यांची समाधी पाहाण्यात मोठी मजा येते. गाडीत राजकारण, समाजकारण व अर्थकारण वा धर्मकारण याविषयी प्रदीर्घ चर्चा करून कंटाळलेले हे योगी शेवटी समाधीत शिरतात. चारपाच जण एकाच बाकावर बसलेले असतील तर सर्वांची डोकी गाडीच्या ठेक्यावर तालात हलू लागतात. हलण्याची दिशाही सारखी असते. त्यातला एखादा 'शिशुयोगी' ताल चुकतो. मग दोन शेजारी योग्यांची टाळकी आपटून सामुदायिक समाधी भंग पावते. एखाद्या बंगल्याच्या वा कारखान्याच्या रखवालदाराचा निद्रायोगही पाहाण्यासारखा असतो. त्याला चोरापेक्षा मालकाचीच चाहूल जास्त चांगली लागते.

तर असा हा निद्रायोग! स्वप्न ही त्याची मानवाला महान देणगी! पण मात्र अनेकजण जसे झोपेत स्वप्नांचा आस्वाद घेतात त्याचप्रमाणे काहींना जागेपणी स्वप्न पहाण्याची सवय असते. याच स्वप्नांचं गोडसं नाव महत्त्वाकांक्षा! फरक ऐवढाच की निद्रायोगातल्या स्वप्नांनी वेगळयाच अनुभूतीचा लाभ होतो. पण जागेपणीची स्वप्ने आनंदानं उपभोगण्यासाठी ती मूर्त स्वरूपात उतरावी लागतात. आणि ती मूर्त स्वरूपात उतरवण्यासाठी कर्तृत्व लागते. चिकाटी लागते. कष्ट घ्यावे लागतात.

## 'सिंहगडची साहसी सहल'

**सुवर्णा कुलकर्णी,**
**प्रकाश सोनार,**
**विद्या देशमुख**
११ बी (वाणिज्य)

स. प. महाविद्यालयात नुकत्याच सुरू झालेल्या वाणिज्य विभागामधील उत्साही विद्यार्थ्यांनी गिरिभ्रमणमंडळ सुरू केले. भेडसा लेणे (कामशेट) आणि सिंहगड अशा दोन सहली यशस्वीपणे पार पाडल्या. नंतर कसोटी पाहणारी एखादी 'साहससहल' झाली पाहिजे असे विद्यार्थ्यांना वाटू लागले. यासाठी ३१ डिसेंबर १९७७ या दिवशी कात्रजघाट ते सिंहगड अशी साहससहल आयोजित केली गेली.

सुमारे १४ मैलांचे अंतर असूनही मुली आणि मुले उत्साहाने सहभागी झाली. चार प्राध्यापक या क्षेत्रात नेतृत्व करण्यासाठी आले होते. आदल्या दिवशी सूचना दिल्याप्रमाणे पाण्याचा पुरेसा साठा, डबा आणि भरपूर उत्साह घेऊन सकाळी ७–१० च्या बसने आम्ही स्वारगेट सोडले. भिलारेवाडी या पी. एम्. टी. च्या शेवटच्या स्टॉपपासून ७–१० वाजता घाट चढण्यास सुरुवात केली. बोगदा पार केल्यानंतर (उजव्या हाताचा डोंगर चढून) (पश्चिमेचा) सिंहगडचा रस्ता पकडला. टी. व्ही. टॉवर जणू ताठ मानेने म्हणत होता. "आता तर सुरुवात केलीत, बघू या केव्हा येता माझ्यापाशी!"

यानंतरचे मुख्य काम म्हणजे एकामागून एक डोंगर आणि दऱ्या पार करणे. एका वाक्यात सांगून संपले पण प्रत्यक्षात पार करण्यास कितीतरी तास आणि त्रास पडला. निसरड्या वाटेवरून चढत आणि उतरत किती डोंगर मागे टाकले याची मोजदादच नाही. कोणाला तरी 'पर्वतोपनिषद' सुचले.

कात्रजपासून सिंहगडावर जात असताना,
एक डोंगर पार केला तरीही,
आणखी डोंगर शिल्लक राहातातच,
अनेक डोंगर पार केले तरीही,
एकतरी डोंगर शिल्लक राहातोच.
तेव्हा हे मुलांनो,
तुम्ही डोंगरांची गणती सोडून द्या. इ...इ...इ...

'कोणाला दुरून डोंगर साजरे' या म्हणीची सत्यता प्रात्यक्षिकातून पटली तर कोणाला एवढे डोंगर पार करून (पोखरून?) कोणता उंदीर पहायला मिळणार? असा प्रश्न पडला.

दुपारी सुमारे १२–३० वाजेपर्यंत अपेक्षित अंतर पार पडलेले होते. धायरीचा डोंगर उजव्या हाताला दिसत होता. त्या ठिकाणी थोडी विश्रांती आणि उदरभरणाचे यज्ञकर्म पार पाडण्यात आले. तेथून पुढे निघाल्यावर मात्र चालण्याच्या गतीप्रमाणे दोन गट पडले.

आता सिंहगड अगदी जवळ दिसत होता. परंतु एका पाठोपाठ तीन, चार टेकड्या वाट अडवून उभ्या होत्या. तसेच जवळचे पाण्याचे साठे हळूहळू संपुष्टात आले आणि वाटेमध्ये तर कुठलेही पाणी नव्हते. आता खरी कसोटी होती.

पायामध्ये चावणारे बूट, पाठीवर डबा असूनही नको वाटणारे ओझे, अवाजवी सलगी करणारी वाटेतली काटेरी झुडपे, पँटमध्ये व पायमोज्यामध्ये आपली प्रेमळ स्मृती देणारे गवत, घशाला पडलेली कोरड अशा अवस्थेत आम्ही चाललोय आणि समोर मृगजळाप्रमाणे फसवणारा सिंहगड! जसेजसे पुढे जावे तसे तसे तो तर दूरच चाललेला.

रणरणत्या उन्हामध्ये वाटचाल करत असताना कोणी साहससहलीला आल्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करीत होते तर कोणाला त्यांच्यापेक्षा आपण 'शूर' आहोत या भावनेमुळे उत्साह चढत होता. आमच्यातील काही मुली अशाही अवस्थेत टणाटण उड्या मारत सर्वांपुढे चालल्या होत्या. "अरे, त्या मुली असूनसुद्धा उत्साहाने तुमच्यापुढे चालल्या आहेत," असे सरांनी म्हटल्यावर पडेल चेहरे करून बिचारी थकलेली मुले मुकाट्याने पाय ओढीत पुढे जात. अधूनमधून झाडीतून जाणारी वाट मात्र शीतल छाया देऊन जणू आमच्या उत्साहाचे कौतुकच करीत होती.

अखेर एकदाचा सिंहगड आटोक्यात आला. त्याच्या आणि आमच्यामध्ये कोणतीही दरी अथवा डोंगर वाट आडवायला नव्हते. अमेरिका सापडल्यानंतर कोलंबसाला कसा आनंद झाला असेल, त्याचा आम्ही जणू काही अनुभव घेतला. शिवरायांचे मावळे यातूनच वावरत होते. कल्पनेनेच अंगावर काटा उमटला.

'मंझिलके अंतिम पथपर यात्रीके कदम तेज चलते है' हे कुठल्याशा हिंदीच्या धड्यातील वाक्य आठवले. डांबरी सडकेवरून झपाझप पावले टाकीत चार वाजण्यापूर्वीच आमच्यातील पुढे असलेल्या गटाने सिंहगड काबीज केला. आमच्या पाठोपाठ ५–२५, ५–३० पर्यंत मागच्या गटातील विद्यार्थी येऊन डेरेदाखल झाले. मोगलाईत पडणाऱ्या धाडीनंतर गडावरील ताकवाल्यांवर पडलेली आमची धाड सर्वात मोठी असावी. दह्याताकाचा एकही थेंब आम्ही गडावर शिल्लक ठेवला नाही. दह्याने भरून आणलेली गाडगी पैशांनी भरून त्यादिवशी गवळणी घरी परतल्या. सिंहगडावरचे देवटाकेही आमच्या धाडीतून सुटले नाही. त्याला 'देवटाके' असे नाव का पडले असावे ते आम्हाला त्या दिवशी समजले. त्याच्या थंड व गोड पाण्याने प्रदीर्घ वाटचालीचा क्षणभरतरी विसर पडला.

राजाराम महाराज समाधीचे व्यवस्थापक श्री. ढमढेरे यांच्या घरामध्ये राहाण्याची सोय झाली. बरोबर आणलेल्या डब्यांच्या जोडीला तेथे करून घेतलेली गरम गरम पिठले भाकरी असा बेत जमला. १० वाजेपर्यंत जेवणे उरकली आणि मग थंडीची जाणीव प्रकर्षाने होऊ लागली. प्रत्येकाने झोप घेण्याचा प्रयत्न केला परंतु ज्या अनुभवातून आम्ही गेलो होतो त्यामुळे सहजासहजी झोप लागणे शक्यच नव्हते. अखेर १२ वाजता नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वजण उठले. बरोबर १२ वाजता 'हॅपी न्यू इयर' चा एकच कल्लोळ उसळला. तेवढ्यात १ जानेवारी हा जन्मदिवस असलेल्या प्राध्यापकांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम करण्याचे ठरविले. दीडदोन वाजता मात्र थंडी असह्य वाटू लागली म्हणून थोड्या काटक्याकुटक्या गोळा करून छानपैकी शेकोटी तयार केली. आपल्या स्वतंत्र खोलीतून मुलीही शेकोटीची उब घेण्यास बाहेर आल्या. साडेतीन चारच्या पुढे एक एक करीत सर्वजण निद्राधीन झाले. जे दोन प्राध्यापक जागेच होते त्यांनी वेळेचे भान ठेवून साडेपाच वाजता सर्वांना जागे केले. आणि मावळत्या चांदण्यात सर्वांनी गड उतरण्यास सुरुवात केली. वेळेवर गड उतरून चहा पिऊन ७–३० च्या एस्. टी ने सर्वजण परतले.

अनेक दृष्टींनी अविस्मरणीय ठरणारी ही साहससहल उपयुक्तही ठरली. गिर्यारोहणातील अनेक बारकावे स्वानु-

भवातून शिकता आले. आपल्या अंगी असणारी शारीरिक क्षमता, चिकाटी, धैर्य आणि उत्साह यांची खरी कल्पना प्रत्येकाला आली. सामूहिक जबाबदारी, सहकार्याची वृत्ती आणि सहनशीलता वाढविण्यासाठी या सहलीचा निश्चितच उपयोग झाला. आपल्या मित्रांच्या स्वभावाची जवळून ओळख पटली. अशा सहलींसाठी मुली पात्र नसतात या समजुतीला धक्का देण्याजोगे कर्तृत्व बऱ्याच मुलींनी गाजविले.

बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनीही आलेल्या अनुभवाने खचून गेल्या नाहीत. अशाच प्रकारची किंवा अधिक कठीण साहससहल आयोजित करावी ही त्यांची मागणी हीच या साहससहलीच्या यशाची पावती होय. महाविद्यालयांनीही या उत्साहाला योग्य ते मार्गदर्शन आणि अन्य सहाय्य देऊन उत्तेजनच दिले पाहिजे. तसेच पालकांनीही आपल्या पाल्यांच्या छंदाला वाव द्यावा. यातूनच पुढे तेनसिंग किंवा मिसेस ताबी निर्माण होतील.

## जग हा वेड्यांचा बाजार !

**रंजना दीक्षित** ११ बी, साहित्य

" जगी हा खास वेड्यांचा पसारा, माजला सारा " एकदा सहज वाचीत बसले असता वरील ओळी कानावर पडल्या मनात आले, 'आपण सर्वजण शहाणे असताना जग हा वेड्यांचा बाजार कसा ?'

वेडा म्हटले की शक्याशक्यतेचा, संभाव्य–असंभाव्यतेचा विचार न करता एखादी गोष्ट सतत करणारा मनुष्य डोळ्यांपुढे येतो. एखाद्या गोष्टीचा छंद असला, नाद लागला म्हणजे आपण त्याला वेडा समजतो.

वेड्यांचा खरा पसारा वेड्यांच्या इस्पितळातच ! इंजिनाशिवाय आगगाडी चालवायचे वेड लागलेला वेडा. मोठे लोहचुंबक घेऊन आगगाडी पुढे धरून धावत सुटायचे की मग आपोआप गाडी मागे येईलच असे गृहीत धरून सतत धावत सुटलेला वेडा ! एखादा स्वतःच पंडित नेहरू बनून समोरच्या कल्पित अफाट जनसमुदायात व्याख्यान देत असतो. एक ना दोन.

अशा वेड्यांना आपण सारे अगदी वेगळे ठेवतो. पण मोकळे सुटलेले आपण काही कमी असतो का ? आता हेच बघा ! अर्धी पानभर जाहिरात. जिमखान्यावर प्लॉट ! कात्रजला प्लॉट ! या ठिकाणी बांधकाम होणार ! निराशा टाळण्यासाठी त्वरित कचेरीत भेट द्या व पैसे भरा. ५००० रुपयांत घर ! कचेरीत घराचा प्रत्यक्ष नमुना पाहायला मिळेल ! झाले ! ! गेले पाहायला. पुठ्ठयाची सुंदर घरे पाहिली. भरले पाच हजार ! आणि महिन्याभरात ऑफिसवगैरे गुंडाळून तो माणूस गेला की हो निघून ! अहो, एकातरी शहाण्याच्या मनात आले का की तो इंजिनियर आहे का ? त्याचे क्वॉलिफिकेशन काय ? त्याने कुठे प्रत्यक्ष घर बांधलंय का ? इतरांना एवढ्या कमी पैशात का जमत नाही ? साधी मंडईतील पालेभाजी सुद्धा घासाघीस करून घेतात. पण येथे मात्र काही विचार न करता भरले पैसे ! उघडच आहे ' जग हा वेड्यांचा बाजार ! '

' तो मी नव्हेच 'चे हजार प्रयोग झालेत. नाटक फार छान पण हे नाटक प्रत्यक्षात घडतंय. चांगली शहाणी, शिकलेली माणसे पोशाखीपणाला भुलतात.

आणि ह्या बायकांचा वेडेपणा तर काही विचारूच नका. बोहारणीकडून भांडी घेण्यासाठी किती खळखळ करतात. पण सेल पाहिला की पिसाटासारख्या धावतात.

प्रत्यक्षात २५ रु. ची साडी. त्यावर शिक्का ४० रु. चा. आणि सेलर विकतो ३० रु. ला. पण कुणी विचार करत नाही की नुकसान सोसून कुणी धंदा करेल का ? चालायचंच ! जग हा वेड्यांचा बाजार !

आता आमचंच उदाहरण पाहाना. सर्वजण चालले सायन्सकडे. कोणीही उठला चालला सायन्सला. प्रत्येकालाच डॉक्टर-इंजिनीयर व्हायचं. जातात सायन्सला नि बसतात बाराबीत डेरेदाखल होऊन ! वेडे !

शिक्षणतज्ज्ञांचंच पाहा ना. १० + २ + ३ = १५ असे गणितात दिसायला दिसले तरी व्यवहारात मात्र १० + २ + ३ = ०. रशियात जसे, अमेरिकेत जसे तसेच भारतात हा अट्टाहास का ? मोर नाचायला लागला की लांडोरीही नाचायला लागते. त्यातलाच हा प्रकार. हा आपल्या शहाण्यासुरत्या लोकांचा वेडेपणा !

पण या वेडामुळे जगाचे कल्याणही खूप झालंय. ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधी मावळत नव्हता अशा अफाट सत्तेला आपल्या कोवळ्या हातांनी कितीसा विरोध होणार याचा विचार न करता ध्येयानं झपाटलेले वेडे हसत फाशी गेले. या अंदमानवर अनंत यातना भोगणाऱ्या वेड्यांच्या आत्मबलिदानानेच ना १५ ऑगस्ट दाखवला.

पूर्वी 'अग्नी' दुर्मिळ ! म्हणून अखंड नंदादीपाला महत्त्व ! पण आता क्षणार्धात प्रकाशणारा विद्युतदीप एका वेड्यामुळेच शक्य झाला ना ? जगातील निरनिराळ्या जंगलातून असंख्य तंतू गोळा करून, तहानभूक विसरून अविश्रांत परिश्रम करून, निराश न होता एकाच वेडानं, ध्येयानं प्रयोग चालू ठेवले म्हणूनच विजेचा दिवा ' लागला '. या वेडानं झपाटलेला एडिसन मानव जातीचा हितकर्ता ठरला.

मंगोपार्क, लिव्हिंगस्टन, मार्को पोलो, स्कॉट अशा वेड्यांनी आफ्रिकेची जंगलं, ध्रुवाचे प्रदेश अशा ठिकाणी धाडसी प्रवास करण्याचा वेडेपणा केला म्हणूनच भूगोलाचे ज्ञान वाढले.

आपल्या जीवनाला अर्थ आणायचा असेल तर अशाच एखाद्या वेडाने झपाटले पाहिजे. जग हा वेड्यांचा बाजार आहे, पण या बाजारात वेड्या जगासाठी झटलेले वेडेच अमोल ठरतात. म्हणून शहाण्यांनो ' वेडे ' व्हा ! वेड्यांनो ' वेडेच ' राहा !

नियमन मनुजासाठी, मानव
नसे नियमनासाठी जाणा

—**केशवसुत**

## पाखरा, येशिल का परतून !

**प्रज्ञा पिसोळकर** १२ वी शास्त्र

मी तंद्रीत डुलत डुलत चालले होते. अचानक हाक ऐकू आली. थांबले. त्याचे वडीलही थांबले. विचारपूस केली त्यांनी. माझ्या पाठीवर हलकेच थोपटल्यासारखे केले. आर्द्र झालेले डोळे पुसत झपाट्याने ते निघूनही गेले.

सुकत आलेल्या जखमेवरची खपली निघाली. भळाभळा रक्त वाहू लागले. भारावल्याप्रमाणे अनामिक ओढीने पर्वतीकडे चालू लागले.

रवंथ करणाऱ्या म्हशीप्रमाणे पर्वती सुस्त पहुडली होती. बेडकाच्या आतड्याप्रमाणे आकाशात ढगाकृती विखुरलेल्या. ती चांदणी तेथेच लुकलुकत होती. माझ्या अगोदरच तो त्या चांदणीवर गेला होता. मला फसवून !

मी त्वेषाने त्या चांदणीला दगड मारत राहिले. शेवटी आजूबाजूचे सर्व दगडच संपले. उरले फक्त मी ! एकाकी !! मातीतल्या अनेक पावलांच्या नक्षीत मी त्याच्या पावलाचा

चिमुकला ठसा शोधत निघाले. पण तो मला सापडलाच नाही. मला अतिसंतापामुळे चक्कर येऊ लागली. समोरच्या डोंगर रांगा हातात हात घालून माझ्याभवती भयाण नृत्य करू लागल्या.

हल्ली कितीतरी दिवस मी रोज पर्वतीवर जातेय. हातात एक मळकट पिशवी. पिशवीत दगड. रोज मी त्या चांदणीला दगड मारत राहाते. ते पोहचतच नाहीत तिच्यापर्यंत ! संपूनच जातात ! मग मला खूप वाईट वाटते. मी रडते. टाळ्या वाजवून उड्या मारते. हसतेही !!

आहे तेथे एक निष्पर्ण झाड. त्या सांगाड्याला पाहून मला अत्यानंद होतो. पण हल्ली त्यालाही लालसर हिरवी पालवी फुटतेय. दुष्ट ! माझ्या दुःखित, निष्प्राण मनाला विस्मृतीची पालवी फुटायला तयार नाहीये. ते झाडही माझ्या दुःखात सहभागी व्हायला तयार नाहीये तर !

मातकट, अळयांप्रमाणे पसरलेल्या झोपड्या पाहून राग येतो. चंद्रावर तोच तो विरळ ढगांचा पुंजका असतो. चंद्राला बुरशी लागल्याप्रमाणे दिसते. छी ऽ ! घाण वाटते बाई अगदी !

हे लोक आहेत ना ? असेच किळसवाणे आहेत. ते माझ्याकडे बोट दाखवतात ! मी वेडी आहे म्हणतात !! कधी कधी दगडही मारतात !!! काहीजण खोटी सहानुभूती दाखवतात. सहानुभूतीच्या मऊ पंज्यातून क्रूर थट्टेची नखं बोचत असतात. मन रक्तबंबाळ होऊन विव्हळू लागते. तरीसुद्धा मी रडत नाही काही ! फक्त भेसूरपणे खदखदून हसते. हाऽहाऽऽहाऽऽऽ !!!

हसून हसून डोळ्यांत पाणी येते अगदी ! अश्रूंचा पडदा बांधला जातो डोळ्यांवर. हा पडदा वर्तमान काळातले काहीही मला दिसू देत नाही. मग मी आसुसून भूतकाळात शिरते. एका आठवणीचं शेपूट धरून दुसरी आठवण येते. अशा आठवणींच्या दुव्यांतून तयार होते एक मजबूत शृंखला ! अन् मन्मनाला ती करकचून बद्ध करते.

एक चेहरा नजरेसमोर तरंगू लागतो. डिंकाने चिकटवल्यासारखे मऊ तपकिरी केस. कुरळ्या केसांच्या स्प्रिंगा मधेच टुणकन् उभ्या राहणाऱ्या. तुकतुकीत अरुंद कपाळ. अर्धवट काळी अर्धवट तपकिरी मजेशीर भुवई. नाकाच्या उगमाजवळ दोन भुवया हातात हात घालून उभ्या. अवखळ, विलक्षण बोलके निळसर डोळे. कच्च्या शेंगदाण्याच्या साली सारखे लालसर आर्द्र ओठ. ओठांच्या कडांतून सतत झिरपणारे मिस्किल स्मित, दोन ओठांच्या बरोबर मध्ये ठाण देऊन बसलेला तीळ. शिस्तीत उभे असलेले इवलेसे दात. मखमली ओठांत अर्धवट चघळलेले चॉकलेट, ओठांचा इवलासा चंबू करून प्रश्न विचारण्याची, वेड लावणारी लकब, प्रकाशात चमकणारी अंगावरील सोनेरी लव. आकाशी रंगाचा सानुकला शर्ट. शेपटी फुगवून बसलेली त्यावरील खारुकली. निळे पांढरे मॅचिंग बूट.

सय येते एका रंगीबेरंगी संध्याकाळची. मी पर्वतीच्या एका दगडावर बसून सूर्यास्ताचा सौंदर्यस्वाद घेत होते. काळ्या ढगांना पडली होती फट. त्यातून सूर्य हळूच डोकावून पाहात होता. "काळ्या ढगांच्या दगडावर मधेच शेंदूर कोणी लावला ?" मुखातून उफाळून आलेली माझी काव्योर्मी ?

"मी नाय बाब्बा !" मागून कोवळा मधाळ आवाज आला. मला अगदी राग आला. काव्योर्मीचं भजं झालं होतं. झट्कन मागे वळून पाहिले मी.

"हे माझे बाबा" एका ३-४ वर्षाच्या मुलाने ओळख करून दिली.

"तू कोण ?" माझा खुळा प्रश्न.

"मी त्यांचा मुलगा !" त्याचे शहाणे उत्तर. जमली गट्टी त्या दिवसापासून.

त्या दिवशी तो पर्वती पायथ्याशीच भेटला. ते कोकरू बघून मला पर्वतारोहणाचा आला झटका. पाठकुळी चढला माझ्या. मृदू करपाश माझ्या गळ्याभोवती. अशा कोकराला घेऊन मी डोंगर चढायला सुरुवात केली. "व्हेरी गुड ! और जोरसे चलो ऽ !" त्याची मिश्र भाषेतली चिथावणी ऐकून माझा आतल्या आत जळफळाट.

"ए, तू गाणं म्हण ना !" कोकराची फर्माईश. मला दम लागलेला. त्या अवस्थेत माझं धापा टाकत म्हटलेलं गाणं, "कोणाच्या पाठीवर कोणाचे ओझे कोणाचे ओझे ऽ ऽ."

"यू आर ए गुड गर्ल !" त्याने खूष होऊन मला सर्टिफिकेट दिले.

वरती जाऊन नेहमीच्या दगडावर बसलो. "आज मामींनी नवं बाळ आणलं दवाखान्यातून," "आज मला देव भेटला होता," "आज बाबांनी चुकून माझ्या ऐवजी आईचाच पापा घेतला," "आज माझी अन प्रशांतची लढाई झाली. मी त्याला एकच चुर्रकन चिमटा काढला..." रोज घडलेल्या प्रसंगांची प्रात्यक्षिकांसहीत रसभरित कॉमेंट्री मला सक्तीने ऐकावी लागे. ती ऐकता ऐकता मी वर्तमान काळातून भूतकाळाच्या उबदार

शाळीत शिरायची.

" काल मी राणीच्या बागेत गेलो होतो. जिराफावर बसून खूपऽऽऽ हिंडलो."

" शेंड्या लावतोस काय लेका ?" त्या बेधडक थापांचा राग येऊन मी विचारले.

" अग नाय ! स्वप्नात ग !" निरुत्तरित करणारे त्याचे सफाईदार उत्तर. आज मी त्याचीच वाट पाहात बसले होते. डोळे झाकले गेले माझे. तो रेशमी मृदू स्पर्श ओळखला मी. जणू फुलपाखरूच अलगद येऊन बसले होते पापण्यांवर.

" अरे तूच तो !" मी आनंदाने ओरडले.

" डोळे मिटून आ कर बघू !" त्याची मी निमूटपणे आज्ञा पाळली. बाबांनी दिलेल्या कॅडबरीतील अर्धी कॅडबरी त्याने माझ्या तोंडात कोंबली. टाळ्या पिटल्या. त्याच्या त्या निष्पाप प्रेमाच्या उबेने माझे हृदय वितळले. अश्रूंच्या रूपाने डोळ्यांतून ठिपकू लागले. तो बावरला. समजुतदार आवाजात म्हणाला, " ए, मी तुला गोष्ट सांगू का ?"

" हं !" माझ्या ' हं 'चा सिग्नल मिळताच त्याच्या शब्दांची आगगाडी बेफाम वेगाने निघाली.

" एकदा काय झालंऽ, लांडगा ऊस खायला गेला. काय ? तेथे भेटला त्याला वाघ ! दोघं रिक्षात बसून आले घरी, अन्..."

" बिच्चारा रिक्षेवाला" अर्थात मी. ऊस खाणारा लांडगा पाहून मला भडभडून येत होतं. पण मधे मधे शंका विचारल्या की लाथाबुक्क्यांचा प्रसाद मिळतो हेही मला माहीत झालं होतं.

" ए, चूप ! मधेच अशी बदकासारखी बोलू नकोस हं ! तर काय बरं ? तेथे दोघांची खूप लढाई झाली. वाघाने लांडग्याला तोंडात धरून गर्रागर्रा फिरवले. मग लांडग्याने वाघाला अश्शी लाथ मारली..."

" अयाई गऽ" त्याच्या सणसणीत लत्ताप्रहाराने मी विव्हळते.

" संपली तुमची गोष्ट ! पळा रे पळा !" मी धूम ठोकते तेथून. तो हताशपणे माझ्याकडे बघतो. चड्डी सावरत सावरत माझ्यामागून पळू लागतो.

" तो बघ चंद्र ! कसा दिसतोय सांगू ? श्रीखंडाच्या गोळीसारखा !"

" माला गोळीऽऽ" त्याचा हट्ट. पुन्हा अशा खाद्यपदार्थांच्या उपमा न देण्याचा निश्चय करते मी.

" रडून रडून गोंधळ घातलान् याने, तुझ्याशी खेळायला यायचं म्हणून. याला घरी आणून सोडशील ? येथेच बसस्टॉप समोर आहे घर." त्याचे बाबा मला विचारत होते, मी मान डुलवली. कोण कुठला मुलगा. त्याला माझ्याशिवाय करमत नाही. अन् तो तर माझ्या मनाचाच एक भाग होऊन बसलाय. त्याच्याशी गप्पा मारल्या नाहीत तर मला चुकल्या चुकल्यासारखे वाटते.

तो वक्त्याची आणि श्रोत्याची भूमिका चोख बजावत होता. हवेत पोहणारे कावळे दाखवले त्याने मला.

" अरेच्या ! Sun कुठे गेला ?"

" खाऊन टाकला." त्याच्या आवडीचे उत्तर.

" आई शप्पथ ! कोणी ?" त्याचा कासावीस प्रश्न

" निसर्गानं !"

" हा कोण बुवा ?" भुवयांची धनुकली ताणून त्याने प्रश्नांकित नजरेचा तीर सोडला.

" तो सर्वव्यापी, सर्व शक्तिमान असतो, विश्वाचे अंतिम सत्य !" माझा पीळ.

" हा प्रकाश कसा उरला मग ?" पुन्हा प्रश्न.

" अं ! कसा बरं ? हं ! बशीत आइसक्रीम घेऊन खाल्लंस ना ? की खाली कसं रंगीत पातळ दूध राहतं किनई ? तस्साच !" माझे ठासून उत्तर. पण माझी चूक मला लगेच उमजली. त्याने आईसक्रीम मागण्याआधीच मी त्याचे लक्ष दुसरीकडे वेधले.

" ते बघ आकाश ! हिंदी हिरोप्रमाणे कसे क्षणोक्षणी विविधरंगी शर्ट घालतेय !" हिंदी हिरोचे नाव काढताच त्याची तबियत कशी अगदी खूश होऊन गेली.

" तू गब्बरसिंह अन् मी धर्मेंद्र. मी तुला सहा गोळ्या मारल्या की तू जीभ बाहेर काढून धाड्दिशी मरायचे, बरं का ! चालेल ?" चालवून घेण्याशिवाय उपायच नव्हता ! त्या दिवशी मी कितीदा मेले आणि कितीदा माझा पुनर्जन्म झाला ते मलाच माहीत ! " ढोऽ ढोऽ "च्या आवाजाने मात्र माझ्या कानाची चाळण झाली. जीभ बाहेर काढून काढून दुखू लागली.

" ती बघ चांदणी ! मी तिच्यावर जाणारेय ! तू येतेस?"

" छेऽ ! काही तरीच पण अगदी !!" मी नाक मुरडले ?

" मग आपण तिला दगडी मारू या !" कशाचा कशाला काही संबंधच नाही. मग त्याने इतका जोर लावून, इतका जोर लावून दगड फेकला की दगडाआधी तोच खाली पडला अन् दगड त्याच्या शेजारी !!

" आपण आज डॉक्टर डॉक्टर खेळूया का ?"

" अरे बापरे ! नकोऽ..." माझा धास्तावलेला भयभीत आवाज.

" तुला बरं नसणार. हां ? तुला काय होतंय ? "

" माझ्या पोटात भितीनं गोळा उठलाय. "

" काय खाल्लं ? "

" काय नाय बुवा ? "

" का ? "

" उगीचंच "

" उगीचंच कशाला ? आता काय औषध घेणार ? "

" येडे का राव तुम्ही ? तुम्ही डॉक्टर आणि मलाच विचारताय काय औषध घेणार ? "

असे रोज नवे नवे खेळ. नव्या नव्या कल्पना. नवी नवी करमणूक. आम्ही दोघंही रंगून खेळत होतो. दंगा करत होतो. भांडतही होतो. धावत पर्वती उतरत होतो. टणाटण उड्या मारत होतो. टेकडीवरील झाडं वाऱ्याच्या गुदगुल्यामुळे फांद्यांची डोकी हलवून खदखदून हसत होती. आम्हीही झाडांबरोबर खदखदत होतो.

" माझं आज apple नाही खाल्लं ? " त्यानं आठवण करून दिली. मी त्या सायीसारख्या मऊ, खळीवाल्या गालाचं apple पटकन खाऊन टाकलं. त्यानेही मग मोठ्या प्रेमानें माझी ' पप्पी ' घेतली.

" ए, तो चंद्र काळ्या ढगाचं ब्लँकेट घेऊन गुडुप्पा झोपून का गेलाय ? त्याला ताप आलाय का ? " किती छान बोलतो नाही हा ?

" त्या युनिव्हर्सिटीच्या टॉवरसारखं माणसाने आपलं मन उंच करावं " त्याला उपदेश करण्याचा माझा निष्फळ प्रयत्न " अय्या ! म्हणजे सर्कशीतल्या छोकऱ्याप्रमाणे उंच व्हायचं ? काही नको " असे म्हणून तो पाण्यातून बुडबुडे आल्यासारखा हसू लागला. " चल, आता तू माझी म्हैस. मी तुझ्या पाठीवर बसतो. हॅक, हॅक...हुर्ररऽ...हुंबा...हुंबा ऽऽऽ " काय लबाड आहे पाहा एकदा मला गब्बरसिंह करतो, एकदा पेशंट तर आज चक्क म्हैस केलंन की. किती रोल करायला लावतो हा मला.

सूर्यरूपी आकाशाच्या डोळ्याने ढगांचा काळा गॉगल घातला. हळूहळू पृथ्वीच्या डोळ्यांवर अंधाराची पट्टी बांधली गेली. सर्व तारे आकाशात आंधळी कोशिंबीर खेळत फिरू लागले. समोरच्या डोंगराने शुभ्र दिव्यांच्या टप्पोऱ्या कळ्यांचा भरगच्च गजरा घातला.

" चंद्र ढगांमागे पळतोय तशी पळापळी खेळूया का ? "

" नको रे बाबा. अंधार झालाय ना ? चल घरी जाऊया. "

आज त्याला देण्यासाठी मी ' फाइव्ह स्टार ' घेतलं होतं. त्याचा आनंदलेला लालबुंद चेहेरा डोळ्यांसमोर थुईथुई नाचत होता. घाबरलेले बाबा मला शोधत शोधत वर्गात आले. " चल ! चल लवकर. तुला तो बोलावतोय. " चमत्कारिक बोबडे शब्द त्यांनी उच्चारले. फाइव्ह स्टार छातीशी घेऊन मी त्यांच्याबरोबर धावले. कुठलं तरी हॉस्पिटल. गाडीगाडी खेळता खेळता कुठल्यातरी गाडीखाली सापडला होता म्हणे तो. तोच औषधाचा गचाळ वास स्वच्छ फरशी, नर्सेसची धावपळ. पांढऱ्या रंगाचे साम्राज्य पांढरे पडदे, पांढरे कपडे, पांढरी भांडी...तो एका शुभ्र पलंगावर, उलट्या लटकवलेल्या सलाईन व रक्ताच्या बाटल्या. इवल्याशा हातात क्रूरपणे खुपसलेल्या सुया. त्याच्या आईचे सुजलेले डोळे. आजूबाजूला चेहेऱ्यांचे जंगल. निर्विकार चेहेरे. भावनाप्रधान चेहेरे. रूक्ष चेहेरे. कंटाळलेले चेहेरे. चेहेरेच चेहरे. त्याचा हसरा चेहेरा काही मला सापडेना. बरीचशी भांबावले. माझे पाय लटलटले. भेलकांडत, विचित्र आवाज करत मी पलंगाकडे धावले. त्याला जाऊन बिलगले. भयाण शांततेचे वस्त्र टराटरा फाटत, माझी आर्त हाक त्याच्या काळजाला भिडली.

" माझ्या सोनुल्या, मी तुझ्यासाठी गंमत आणलीय बघ. बघ ना रे डोळे उघडून. " गोऱ्यामोऱ्या चेहेऱ्याने मी करुण आवाजात केलेली त्याची विनवणी.

क्षीणपणे नयनकमलांच्या पाकळ्या उघडल्या. ते निस्तेज निळसर डोळे मला बरेच काही सांगून गेले. सुई न टोचलेल्या हातात त्याने गंमत घेतली. गालाला लावली. पुन्हा एकदा करुणपणे माझ्याकडे पाहिले. ओठ बराच वेळ काहीतरी पुटपुटत राहिले. काही वेळाने सैल, निष्प्राण मुठीतून फाइव्ह स्टार गळून पडले. गुलाबी चेहेरा पांढरट पिवळा झाला. उबदार हात गार पडले.

माझ्या नाकातून, कानांतून लाल मुंग्या सैरावैरा धावल्या. कचकचून डसल्या. झिणझिण्या आल्या. त्या थंडीतही माझ्या कपाळाच्या काचेवर घामाच्या थेंबांचं दव साठलं. हृदय दाबल्याचा भास झाला. छातीची धडधड वाढली. डोळ्यांत रक्त उतरले. लवकरच त्याचे रूपांतर उष्ण, खारट अश्रूंत झाले. कानात घुई ऽऽऽ विमानांचा आवाज घुमला. दूर दूर त्या चांदणीवर निघाला होता तो. त्या विमानातून. मला एकटीलाच

सोडून. जीव खाऊन मी धावले त्याला धरायला. पण अंधारात गडप झाले ! अंधारात गडप झाले ! !

त्याला शोधण्यासाठी हल्ली कितीतरी दिवस मी रोज पर्वतीवर जातेय...!

" हर्षखेद ते मावळले
हास्य निमाले
अश्रु पळाले;
कण्टकशल्ये बोथटली
मखमालीची लव वठली;
काही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला
तिमिर हरपला;
काय म्हणावे या स्थितिला ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

**केशवसुत**



## क्लास – एक फॅड

**भालचंद्र पटवर्धन**, ११वी वाणिज्य

दहावीची परीक्षा संपली. मे महिना आनंदात घालवला. मग आली अकरावी. रिझल्ट लागताच स. प. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. थोड्याच दिवसांत कॉलेज सुरू झाले. आई म्हणाली, " हे कॉलेजचे पहिलेच वर्ष आहे. शिवाय इंग्रजी माध्यम. त्यामुळे तू माझ्या मताप्रमाणे क्लास लाव."

क्लास ! या विचारानेच माझ्या डोक्यात तिडीक उठली. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे क्लास ही आज एक आवश्यक गोष्ट बनली आहे. जो तो उठतो तो क्लास लावतो. नववी हे वर्ष दहावीची पूर्वतयारी म्हणून. दहावी ही तर बोर्डाची परीक्षा, अकरावी हे कॉलेजचे पहिले वर्ष, बारावी परत बोर्डाची परीक्षा आणि एफ. वाय., एस. वाय., टी. वाय., ही वर्षे तर महत्त्वाचीच. त्यामुळे काही लोकांच्या मते उत्तम रीतीने पास होण्यासाठी या सर्व वर्षी क्लास लावलाच पाहिजे. अशा रीतीने नववीपासून ते टी. वाय. पर्यंत क्लासचा पाठलाग सुटतच नाही.

बरे क्लासचे प्रकार तरी किती ! शिवण, फोटोग्राफी, टायपिंग, इंग्रजी बोलणे, विविध उपकरणांची दुरुस्ती इत्यादी क्लासच्या जाहिराती वृत्तपत्रात सतत झळकतच असतात. मी म्हणतो बाकीच्या क्लासला जाणे योग्य आहे कारण तेथून आपल्याला शाळा-कॉलेजातील शिक्षणाव्यतिरिक्त शिक्षण मिळत असते. पण ज्या क्लासमध्ये शाळेतलेच शिकवले जाते ते क्लास नकोत.

परीक्षेत सुयश प्राप्त करण्यासाठी...
...........क्लास.
भेटा......

Cancer cells arise from normal cells in two phases. First is the irreversible damage to respiration which is followed by the second phase i.e. ... the development of cancer–a long struggle for existence by the injured cells in which others succeed in replacing the lost energy of respiration by energy of glycolysis. Normal cells become disease producing due to inhabitation of catalase, an important enzyme by the mutagenic processes and the development of viruses.

**Possible causes of cancer**

( 1 ) Smoking–It has been found by Dr. E. C. Hammand and D. Horn that the death rate among the somkers is 70% above the rate of non-smokers. The effects of smoking show up far greater incidence of cancer diseases among smokers. Heavy smoking is merely symptomatic of health conditions that make a person more susceptible to certain diseases. In other words, smoking as such may not cause cancer but may merely induce it among cancer susceptible person.

( 2 ) Air pollution–It has been established that nauseating exhaust fumes from vehicles and smoking chimneys contain cancer producing chemicals. Incomplete combustion in the furnaces also produces a chemical known to cause skin cancer in humans and lung cancer in laboratory animals. The poisonous chemicals such as Sulphur Dioxide, Hydrogen Sulphide, Carbon Monoxide pollute Oxygen, so vital for our health and life and consequently interfere with the cellular respiration.

( 3 ) Hardened fats– The increasing consumption of hardened fats contained in margarine, artificial creams and chocolate products may have a share in the incidence of cancer.

( 4 ) Irritation– There are many well-known examples of irritation having apparent association with cancerous growth. For example, cancer of mouth may be a consequence of chewing ' nas ' – a mixture of tobacco, lime ashes and cotton seed oil. Then, in cold countries, people apply tanning lotions which may ultimately cause skin cancer-

( 5 ) Thymus and cancer– In the initial hours or days after the birth of a human being, the thymus, an organ which lies beneath the breast bone over the upper part of the heart pours out a secretion into the body cells which protects it from viruses and other invading organisms. The cells from the thymus might not function properly so that leukaemia occurs due to functional strain.

( 6 ) Viruses– Some researches have proved that many types of tumours have been induced by viruses. In 1940, Dr. Fransisco Drau–Reynals of Yale University expressed his belief that some human cancers are also caused by viruses.

( 7 ) Suppression of normal functions– The common type of breast cancer is caused due to suppression of certain normal functions. Nowadays, several cases occur in which mothers do not breastfeed their babies which causes the clotting of milk in the breast

glands. This is the main cause of breast cancer in women.

**Symptoms of cancer**

( 1 ) Unusual bleeding or discharge.
( 2 ) A lump or thickening in the breast or elsewhere.
( 3 ) A sore that does not heal.
( 4 ) Change in bowel or bladder habits.
( 5 ) Hoarseness or cough.
( 6 ) Indigestion or difficulty in swallowing
( 7 ) Change in a wart or mole.

**Diagnosis of cancer**

For the detection of cancer, special instruments known as ' scopes ' have been designed. Some diseased organs are also detected by X-rays. In America, a new system for diagnosis of cancer of lungs has been found out by flowing electricity at a low voltage in the human body. In another method, the diseased cells are scraped from the organ or collected in fluid and are subjected to microscopic examination.

**Treatment for cancer**

The relevant frontiers of knowledge have not yet been adequately explored; least to say of any cancer-control programme as such. Cancer research therefore proceeds in many different ways, developing and applying what is already known or seeking along the margins of fundamental knowledge for new facts that may be applicable to its problems.

If diagnosis of cancer is made early, the cancer remains localised and can be treated successfully. Surgery and radiation are today the two best methods for treating cancer. Malignant tumour along with adjoining tissues, is removed from the human body. In certain cases, surgical removal is not possible or feasible. In such cases, radiation therapy is resorted to. When a cancerous post is exposed to radiation, cancer cellues are attacked. The damage to normal tissuse is minimised by treating the patient with many small doses over a period of few weeks. General Electrical Company of the United State of America has invented a plastic filter which is capable of separating cancer cells from the human blood, because these are bigger in size than normal cells. This filter allows normal cellts to pass through its tiny holes, and separates cancer cells.

Experiments are going on all over the world to find out a cure for this dreadful disease. Doctors are busy finding out successful vaccine for the prevention of this disease. The day does not appear to be far when this disease would also be like any other disease, curable by the doctor. ★

*With Best Compliments From*

**The Poona University Federal Co-operative Consumers Stores Ltd.,**

GANESHKHIND, POONA 7

WE SELL STATIONERY, COSMATICS, CLOTH, H. M. T. WATCHES, MEDICINES, DUPLICATING STAFIONERY, CLEANED FOOD GRAINS. & ALL OTHER STATIONERY ITEMS REQUIRED FOR UNIVERSITY & COLLEGES.

Time : 9.30 a. m to 7.30 p. m     Sunday closed.

**S. C. Gupte**
Chairman

**P. D. Donjekar**
General Manager

# Nothing but trouble

**Hemant Mahadkar**, S. Y. J. C. Science

Trouble and me, me and trouble. We were always together. We never parted company for more than a few weeks. I seemed to have an instinct for trouble. A week without trouble and I got bored. Thus it was that I landed in this hospital. It all happened as I was crossing the road. I was getting late for college and hence was in a hurry. I decided to cross the road when the traffic was flowing. Well, I managed to avoid the PMT's and cars, but a cycle knocked me down, right in the path of a motorcycle. I had my right leg broken and the rest of me got well jolted.

Mournfully I looked at my room or ward. Everything was white and smelt of disinfectant. Every now and then, a nurse came along and checked me. I looked at myself in the mirror and grinned. I remembered the fright I had, when I saw my own reflection in the mirror, my face white, my hair standing erect and covered with blood-clots. I looked at my right leg which was in traction, for what purpose I don't know. Just then my peace was disturbed. A young man, ( a newly qualified doctor as I learnt later ) accompanied by two nurses, came into the room. The nurse held a tray. Inside I could see a few syringes and needles. I started to sweat. The doctor asked me how I was feeling. ' Okay. ' I croaked. He got the injection ready. I gathered my courage and asked, " Doctor, what is the injection for ? " " Oh, it's the anaesthetic, it'll make you sleep during the operation ! ", the doctor replied. I almost fell out of my bed. My eyes bulged out. The nurses helped me back in bed.

" But...but...what am I being operated for ?" I stammered, I was thoroughly frightened by now.

" For your tonsils,young man, you should know ! " The doctor replied looking annoyed.

" But....but my leg is broken, my tonsils are perfectly okay, believe me doctor.... they've okay, see. " So saying I opened my mouth as wide as I could.

" Oh ! " said the doctor, " I'm so sorry, we have got into the wrong ward. " So saying the doctor accompanied by the now thoroughly bewildered nurses, went out. I let out a loud sigh, mopped my brow and gulped down a glass of water. I cursed my stars, my fate. Even in the hospital, I was in trouble. I wondered what more did fate have in store for me. I was soon to find out that it held quite a lot, and none of it good.

I was eagerly awaiting my first lunch in the hospital. At about twelve-thirty a white-coated old man came in accompanied by a trolley containing my lunch in a tray, along with many other trays. He looked half-dead. I really pitied him. He handed over the lunch tray to me, raised the top half of the bed, so that I would have no trouble in eating and went off. I looked at the tray.... and my appetite vanished like a missile just launched from its pad. All the food was only boiled. No salt...no masals.... nothing ! Just boiled ! Some how I moved it back into place and leaned on the push-bell next to my bed. I didn't move my finger till a slightly irritated looking nurse appeared. I glared at her.

" Is this the food I get ? Boiled ? Without any salt or masalas ? " I demanded angrily. She checked the list in her hand, peered at the contents of the tray and mutte-

red " Oh, no! It's happened again ! "

" What's happened again ? " I demanded; wanting to know what she was talking about.

" Nothing, I'll have your tray changed in a few minutes. " So saying she turned and vanished. After a few minutes, while I was fretting and fuming, a man came whistling cheerfully, whisked off my original tray, placed a new one and went away whistling. My lunch over, I gave a loud *burp* which echoed round the room and a sigh of pleasure. As though he had been waiting for me to burp, the same old man trandled in with his trolley, pickd up the tray without so much as a glance at me and went off. I leaned back and pondered over the old man's behaviour. I decided to sleep. Then I realised that the old man had forgotten to lower the raised section of the bed. I cursed, and leaned on the bell. The same nurse appeared. Before I could say anything she had lowered the bed and having accomplished the task, she walked out, I slept.

At 5 P. M. after I had been washed, my family arrived.... meaning my parents, brothers and sister. The instant they entered, my mother started one of her lectures, " How many times have I told you to be careful while crossing the roads, but you are always lost in your own world, you never look right or left while crossing the road.... " and so her voice droned on like a recorded cassette.

My brothers, I was glad to note, had brought a cassette player. along with some of my favourite cassette. My sister had got some books for me. Good ! Thanks God for that ! At least I wouldn't get bored now.

My mother was still talking, as though she had taken part in a talkathon. Finally she stopped. ( Must have run out of breath. )

My father took this opportunity to enquire about my health, and asked how I was being treated in hospital. ' Fine '. I replied to both the questions. After a few more minutes they went off. It seemed like Heaven not to hear my mother's voice.

After that the nurse came to tell me that a few of my friends had come to see me. I told her to tell them that I was resting. I just couldn't face anybody after hearing my mother's voice.

At seven-thirty, I had my dinner. I had a sudden urge to listen to some music. I picked up the cassette player. I looked at it puzzled. Then light dawned in my head. My brother had forgotten to put some cells in the player. I felt like weeping. I pressed the bell. When the nurse appeared, I requested her to provide me with some reading-light. She shook her head. " No lights after eight" she said. I pleaded, but of no avail. Right then I felt like throwing everyone and every thing including the hospital itself in a ditch. I prayed to all the Gods, Allah and Swamis and sadhus to deliver me from this hospital as early as possible.

The next day I decided to see if I could walk. But I gave up the idea. I didn't want to break my leg in another place, it was broken in two places already. Thus, it was that I spent a thoroughly boring week. The only coloured thing I saw in that week was a plastic glass with which I drank water. I thought I would get colour-blind. At the end of the second week, the doctor decided that my leg was healed enough to walk about with crutches. Well, something was better than nothing.

The first time I tried to walk with the damned crutches, I slipped and landed on my seating apparatus, and it hurt a lot ! After a lot of persuasion on the doctor's behalf, I decided to venture again.

In a couple of days, I could move quite easily. I was pleased, at least I was a bit independent.

A month thus passed. My leg was completely healed. The plaster was removed and thrown off. I could have danced for a week with joy. The whole family came to accompany me home. All my belongings had been packed, I walked out of the room humming

a tune. There were three steps before I could come on the ground. As I put my right leg on the second step, it slipped on the water which was on the step...

When I recovered consciousness, the first thing I saw was white ceiling and my nose caught the stink of disinfectant. See what I mean....about me and trouble...always together !

# A look at your eyes

**Sanjaya Chordiya,** S. Y. J. C. (Science)

Had an eye–ckeckup lately? If you are over 55 and haven't come eyeball to eyeball with an ophthalmoscope or tonometer recently; it's time you did.

These instruments are used to diagnose the presence of glaucoma and cataract–both potential causes of blindness if not discovered and treated early. An annual chek–up is important after age of 35, but it is essential to good eye health after the age of 55.

Glaucoma results from an increase of *fluid* pressure inside the eyeball. This is caused by excess production or decreased drainage of the fluid. It damages the eye's structure and interferes with normal vision. Fortunately, medication or surgery can control the problem if diagnosed early.

The tonometer provides an accurate measure of the eye fluid pressure. It is painless and takes only a few moments of your time.

Cataract, like glaucoma, is a common eye-x disease. It is a cloudiness that develops in the lens of the eye. The lens, normally clear and flexible, changes shape to allow yourself to focus on objects at varying distances. Most cataracts result from the normal aging process, during which the lens becomes less flexible and less transparent. Heredity, poor health and eye-injury can predispose to its development.

Unfortunately, the progress of a cataract cannot be stopped. But vision can usually be maintained with prescribed lense. Watch it closely, however. If vision becomes so poor that a person cannot function normally in daily activities, it may be necessary to remove the lens. Vision is restored with either contact lenses or eyeglasses.

The keys to good eye health and clear vision are early diagnosis and prompt treatment. □

Success is a matter either of getting around you better man than yourself, or getting around better man than yourself.

Idleness is the hoilday of fools

**Chesterfield.**

विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी,
हितासाठी,
लाभासाठी–

# स. प. महाविद्यालय सहकारी ग्राहक भांडार (म.) पुणे

**उत्तम माल–वाजवी किंमत–विनम्र सेवा**

सर्व प्रकारची स्टेशनरी,
जर्नल्स्,
फाइल्स,
टायपिंग–डुप्लिकेटिंग कागद,
कार्बन पेपर,
सौंदर्यप्रसाधने,
साबण,
कन्फेक्शनरी,
बनियन्स.
विद्यार्थी कल्याणाच्या
अनेक योजना
कार्यान्वित होत आहेत.
भांडारातूनच आपली खरेदी करा.
भांडाराचे सभासद व्हा.
सहकाराने आपले व
समाजाचे जीवन सुखी करा.
आपल्या गरजांसाठी
भांडारास भेट द्या.

| | | |
|---|---|---|
| **ब. अ. बोकील** | **प. वा. मनोलकर** | **मा. ध. गुर्जर** |
| कार्यवाह | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |

# वार्षिक अहवाल

१९७७–७८

१. हीरक महोत्सव
२. स्नेहसंमेलन
३. कनिष्ठ महाविद्यालय
४. सायन्स असोसिएशन
५. वाणिज्य मंडळ
६. राष्ट्रीय सेवा योजना
७. राष्ट्रीय छात्रसेना
८. जिमखाना विभाग
९. क्रिकेट

# वार्षिक अहवाल

१९७७-७८

## हीरक महोत्सव

[ २७ डिसेंबर १९७७ रोजी झालेल्या पंतप्रधान माननीय श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या भाषणाचे मराठी रूपांतर. ]

### संस्थेबद्दल स्नेह व आदर :

शिक्षण प्रेमी कार्यकर्त्यांद्वारा या संस्थेची उभारणी झालेली आहे. शिक्षणाबद्दल आदर असणाऱ्या कार्यकर्त्यांद्वारा ही संस्था चालविली जात आहे. आपले काम आणि शिक्षण या बद्दल कळकळ असणाऱ्या भावी नागरिकांवर या संस्थेत संस्कार होत आहेत. आपल्या संस्थेबद्दल लोकांना वाटणाऱ्या आदरामुळे, स्नेहामुळेच आज येथे इतक्या मोठ्या संख्येने ते उपस्थित आहेत.

### शिक्षणाचे ध्येय :

ज्यामुळे मुक्ती प्राप्त होते ते शिक्षण, ती विद्या. ही मुक्ती कोणापासून ? आपल्या स्वतःपासून मुक्ती हा मुक्तीचा आदर्श आहे. ही मुक्ती प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे निर्भयता आणि निर्भय होण्याचा मार्ग म्हणजे विद्या. शिक्षणामुळे निर्भय होण्याचा संस्कार होतो. अशा निर्भयतेतूनच समाजाचे परिवर्तन किंवा समाजाचा नवीन जन्म होत असतो. जो स्वतः निर्भय असतो तो दुसऱ्याला धाकात ठेवण्याचे काम करीत नाही. निर्भयपणामुळे मनुष्य खऱ्या अर्थाने मनुष्य होतो. जो स्वतः घाबरत असतो तो दुर्बल असतो आणि म्हणून दुसऱ्यांना धाकात ठेवण्याचे प्रयत्न तो सतत करीत राहातो.

### भारतीय संस्कार आणि भारतीय मन दोन्ही श्रेष्ठ.

या देशात केले जाणारे संस्कार आणि संस्कार करणारे व संस्कारित होणारे या सर्वांची एक श्रेष्ठ परंपरा आहे. भारतीय लोकशाहीची परंपरासुद्धा फार प्राचीन आहे. ग्रीसमधील लोकशाहीसुद्धा गुलामांसाठी कधीच नव्हती. जुलूम जबरदस्ती होऊच शकणार नाही, ते होण्याची शक्यताच निर्माण होणार नाही अशी शक्ती या देशात वृद्धिंगत होत आलेली आहे. भारतातील अगदी निर्धन, गरीब माणसाचे मानसिक संस्कार श्रेष्ठ उंचीचे आहेत. हीच आमची पैतृक संपत्ती आहे, शक्ती आहे, परंपरा आहे. या शक्तीमुळेच आपण प्रगती करीत आलो आहोत. आपले कर्तव्य समजण्याचा संस्कार भारतीय शिक्षण पद्धतीचा पहिला संस्कार आहे.

### शिक्षणाचे कार्य

प्रत्येक मनुष्याजवळ बुद्धी आहे आणि बुद्धीची वाढ करण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील असतो, बुद्धी वृद्धिंगत करण्याची शक्ती प्रत्येकात असते. सत्य–असत्य, उचित–अनुचित, खरे–खोटे यामधील अंतर समजण्याची बुद्धी म्हणजे माणसाची विवेकशक्ती होय. या विवेकशक्तीची वृद्धी करण्याचे काम शिक्षण करीत असते. आत्मावलंबन, आत्मशांती, आत्मशक्ती, आत्मविश्वास, आत्मश्रद्धा इत्यादी अन्य अनेक गुण आहेत की जे शिक्षणाने प्राप्त होतात.

### शिक्षणपद्धतीत बदल

आजची आपली शिक्षणपद्धती आणि ब्रिटिश शासन काळात प्रचलित असणारी शिक्षणपद्धती यात फारसा फरक नाही. त्यामुळे आपल्या आवश्यकतेप्रमाणे, परंपरेप्रमाणे शिक्षण पद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे मूलभूत उद्दिष्टच आपण विसरलो असल्याने आपल्या विचारात एकता नाही. ना विद्यार्थ्यांत ना शिक्षकात. आपल्या शिक्षणप्रणालीत विद्यापीठाचे स्थान महत्त्वाचे आहे. अगदी खालच्या स्तरावर शिकविणारा शिक्षक विद्यापीठाशी कोठे ना कोठे संबंधित असतोच. विद्या आणि विद्यार्थी याबद्दल शिक्षकांना वाटणारी कळकळ आणि शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना वाटणारा आदर दोन्ही महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी खऱ्या अर्थाने विद्यार्थी घडविला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या तळमळीने शिक्ष-

कांना खऱ्या शिक्षकाची प्रतिष्ठा दिली पाहिजे. पदवी आणि नोकरी यांचा संबंध जोडण्याची सवय सुटली पाहिजे. शिक्षणामुळे संतोषवृत्तीची जोपासना झाली पाहिजे. काम करीत करीत शिक्षण प्राप्त करण्याची जुनी परंपरा या देशामधे आहे. महात्मा गांधींनी दाखवून दिलेला जीवन-शिक्षणपद्धतीचा मार्ग या संदर्भात फार महत्त्वाचा आहे.

## मातृभाषेतून शिक्षण : जसे शिक्षण तसा देश

शिक्षण देशाला गती देते. जसे शिक्षण त्याप्रमाणे देश घडत–बिघडत असतो. प्रचलित शिक्षणाचा संस्कार आपापला स्वार्थ पाहण्याचा आहे. देशहित कोणीच पाहात नाही. ज्यांनी इंग्रजीतून शिक्षण घेतले ते मराठी माध्यमातून शिकवू शकत नाहीत म्हणून मराठीचा किंवा मातृभाषेचा धिक्कार केला आहे. ही स्वार्थी वृत्ती संपली पाहिजे आणि देशहिताची वृत्ती वाढीला लागली पाहिजे. या बाण्यातूनच मातृभाषा–माध्यमाचा विचार केला जाऊ शकतो. ज्यावेळी आपण मातृभाषेतून शिक्षण देऊ घेऊ शकू त्याच वेळी आपण खऱ्या अर्थाने भारतीय होऊ!

## परीक्षा आणि गाइडस्

विद्यार्थ्यांचे कर्तृत्व, गुण-अवगुण इत्यादींचा जर परीक्षा हा एकच निकष असेल तर विद्यार्थी परीक्षार्थीच होईल; आणि संपूर्ण समाजानेच जर परीक्षावलंबी होण्याचे ठरविले तर परीक्षामाहात्म्य वाढविण्यापलीकडे दुसरे काहीच होणार नाही. या ना त्या प्रकारे परीक्षा उत्तीर्ण होणे एवढेच विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकाचे लक्ष्य राहील. विद्यार्थी–परीक्षार्थी आणि शिक्षक–परीक्षक बनण्याशिवाय मग गत्यंतर राहणार नाही. गाइडस् हा त्या मार्गाने नेणारा महत्त्वाचा घटक आहे.

ऐहिक सुखाच्या मागे विद्यार्थी लागत नाही तर परीक्षार्थी लागतो. त्यामुळे आज सर्वचजण पैशाच्या मागे लागलेले दिसतात. गाइडस् प्रकाशित करणारे प्रकाशक, परीक्षक आणि परीक्षार्थी सगळे गाइडावलंबी झाले आहेत.

## शिक्षक-पुत्राची व्यथा

मी शिक्षकाचा मुलगा आहे. शिक्षण आपल्या ध्येयापासून ढळलेले पाहून मला अतिशय दुःख होते. आपला देश कधी एकसंध एकजीव, होऊ शकला नाही याचे कारण ही शिक्षण पद्धतीच आहे. भारताची एकात्मता ही शिक्षणाच्या खऱ्याखुऱ्या संस्कारामुळेच शक्य आहे.

मनुष्य जितका जास्त शिकलेला तितका तो अधिक नम्र आणि प्रसन्न असला पाहिजे, तितका तो अधिक परिश्रमी असला पाहिजे. जो जास्त शिकलेला तो सर्वांपेक्षा कमी काम करणार हा संस्कार नष्ट झाला पाहिजे.

## शिक्षक-पुत्राचा विश्वास

आपण आपल्या शैक्षणिक संस्कारांपासून आणि परंपरेपासून कितीही दूर जायचे म्हटले तरी आपण जाऊ शकणार नाही. आपण भले परंपरा सोडू, परंपरेने आपल्याला सोडले पाहिजे ना! आणि माझा विश्वास पक्का आहे की आपली परंपरा आपल्याला सोडणार नाही. याच विश्वासाच्या शक्तीवर आपण उन्नती करणार आहोत. जे भारतात घडले ते अन्यत्र घडेल. भारताने लोकशाहीसाठी आपली योग्यता सिद्ध करताना याचाच प्रत्यय दाखवला आहे. लोकशाहीसाठी भारत लायक नाही असे म्हणणाऱ्यांनाही आता कबूल करावे लागते आहे की भारतच एकमात्र लोकशाहीला लायक देश आहे.

★

# स्नेहसंमेलन १९७७–७८

स्नेहसंमेलनातील कार्यक्रम पाडण्याकडे अलीकडे मुलांची वाढती प्रवृत्ती दिसल्यामुळे स्नेहसंमेलन न करण्याकडे किंवा स्नेहसंमेलनाच्या स्वरूपात काटछाट करण्याकडे महाविद्यालयांचाही कल दिसतो. अशा परिस्थितीत स्नेहसंमेलनाबाबत समितीचा विचार चालू असताना विद्यार्थी प्रतिनिधींनी सर्व कार्यक्रम आपण आपल्या जबाबदारीवर यशस्वी रीतीने पार पाडण्याचे प्राचार्यांना आश्वासन दिले आणि अतिशय थोड्या दिवसांची मुदत असूनही संमेलन करावयाचे ठरले.

या वर्षीच्या संमेलन समितीत प्रा. दा. रा. गोळे, प्रा. अ. स. गिजरे, प्रा. सौ. विद्या साठे, प्रा. अ. गो. जुमडे आणि प्रा. गो. रा. कामतकर या प्राध्यापकांचा समावेश होता. आतापर्यंत विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन प्राध्यापकांच्या जबाबदारीवर पार पडत होते. ही प्रथा बदलून संमेलन विद्यार्थ्यांचे, विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थ्यांकडून साजरे करविण्याची योजना समितीने आखली.

पहिल्या सभेत विविध गुणदर्शन, गमतीचे खेळ, गंमत जत्रा आणि अल्पोपाहार हे चार कार्यक्रम निश्चित होऊन त्यांचे कामकाज पाहणाऱ्या समित्या ठरविल्या गेल्या. प्राध्यापकांना स्वेच्छेने काम करावयाची सवलत

असल्यामुळे त्यांच्याकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

महाविद्यालयातील प्रचंड संख्या लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची चार गटांत विभागणी करण्यात आली. दि. १० व ११ फेब्रुवारी १९७८ या दोन दिवशी महाविद्यालयाच्या आवारात सर्व कार्यक्रम एकाच वेळी सुरू ठेवल्यामुळे अतिशय धामधुमीत आणि उत्साहात विद्यार्थी स्नेहसंमेलनाचा आनंद मनसोक्त लुटीत असल्याचे विलोभनीय दृश्य पाहावयास मिळाले.

विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात लोकप्रिय 'विच्छा माझी पुरी करा' हे लोकनाट्य संक्षिप्त स्वरूपात सादर केले. रंगेल आणि रंगेल भांगडा नृत्याने कार्यक्रमाचे आकर्षण वाढले होते. पूर्व तयारीसाठी मिळालेली अत्यल्प मुदत लक्षात घेता विद्यार्थ्यांनी कार्यक्रम चांगले सादर केले. एकंदर व्यवस्थाही चोख होती. त्यात श्री. बी. पी. चौधरी, श्री. एन. आर. जेस्ते, कु. रंजना कुलकर्णी आणि कु. पुष्पा आठवले यांचा वाटा मोठा होता. प्रा. विजय देव आणि प्रा. उल्हास बापट यांचे याबाबतीत मार्गदर्शन लाभले. 'गंमत-जत्रे'मध्ये चाळीसहून अधिक स्टॉल विद्यार्थ्यांच्या कौशल्याची चाचणी घेण्यासाठी आणि मनोरंजन करण्यासाठी सिद्ध होते. 'तंबोला' आणि 'आपकी फर्माईश' या दोन स्टॉलनी उत्पन्नाचे रेकॉर्ड मोडले. या विभागाकडे श्री. भा. त्र्यं. बधान, श्री. एम्. ए. जयकर, कु. अरुणी एन्. दीक्षित आणि कु. उर्विजा गोडबोले या विद्यार्थ्यांच्या समितीने काम केले. त्यांना प्रा. एस. जी. खाजगीवाले आणि प्रा. सुधांशू गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. गंमतीच्या खेळांनाही विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी विरुद्ध प्राध्यापक असा क्रिकेटचा रंगतदार सामना हे या विभागाचे आकर्षक वैशिष्ट्य होते. या विभागाची सर्व व्यवस्था श्री. एन्. एम्. हसबनीस, श्री. एम. व्ही. केळकर, श्री. द. जी. केळकर, कु. शुभदा साठे या विद्यार्थ्यांनी चोख ठेवली होती. त्यांना सौ. शकुंतलाबाई कटककर आणि प्रा. अरुण बेलसरे यांनी मार्गदर्शन केले. अल्पोपाहाराचा कार्यक्रम मागील बाजूच्या हिरवळीवर आयोजित केला होता. खाद्यपदार्थांची निवड करण्यापासून सर्व व्यवस्था विद्यार्थ्यांनी ठेविली होती. निवडक गाण्यांच्या ध्वनिमुद्रिकांनी एकंदर आनंदात भरच पडली. श्री. बी. टी. बोडके, श्री. डी. बी. गोसावी, कु. वासवदत्ता पटवर्धन व कु. हेमा लाटकर या विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने ही जबाबदारी पार पाडली. प्रा. होनप आणि प्रा. देवकुळे यांनी मार्गदर्शकांचे काम केले.

यंदाच्या वार्षिक बक्षीससमारंभात वर उल्लेख केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. जबाबदारीची सांघिक जाणीव ठेवून नेतृत्व करणे आणि एकंदर कार्यक्रमाची व्यवस्थित आखणी करून ते शांतपणे पार पाडणे ही कामगिरी त्यांनी उत्तम रीतीने केली आणि विद्यार्थ्यांवर संपूर्ण जबाबदारी टाकली तर ते जबाबदारी ओळखून संमेलन पार पाडतात असे निदर्शनास आले. स्वतः प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांनी हीरक महोत्सवाच्या सोहळ्याच्या व्यापातून नुकतेच मोकळे झाले असताही सर्व कार्यक्रमांत मोकळेपणाने भाग घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. सर्वांच्याच मनःपूर्वक लाभलेल्या सहकार्यामुळे संमेलन उत्तम रीतीने पार पाडले.

**प्रा. दा. रा. गोळे**
स्नेहसंमेलन प्रमुख

★

## महाविद्यालय-वार्ता

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे हे तिसरे वर्ष आहे. १९७६–७७ या वर्षी प्रथम फक्त १२ वीचे वर्ग महाविद्यालयात चालू झाले. १९७७–७८ पासून १२ वी बरोबरच ११ वीचे वर्गही चालू झाल्यामुळे सर परशुरामभाऊ महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालय पूर्णार्थाने सुरू झाले.

१९७७–७८ या वर्षापासून या महाविद्यालयात शास्त्र आणि साहित्य शाखांबरोबर वाणिज्य शाखेची सुरूवात झाली व ११ वीचे वर्ग सुरू झाले. ही घटना सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. कारण वाणिज्य शाखा सुरू करावी अशी अनेक पालकांची, हितचिंतकांची आणि व्यवस्थापक मंडळाची बऱ्याच दिवसांची अपेक्षा या वर्षी पूर्ण झाली इतकेच नव्हे, तर या वर्षी वाणिज्य शाखेकडे १२ वीचे वर्ग सुरू झाले. तसेच, याच वर्षी प्रथम वर्ष वाणिज्य वर्ग सुरू करण्याची अनुज्ञा शासनाकडून मिळाली आणि त्यानुसार हा वर्ग वरिष्ठ महाविद्यालयात सुरूही झाला आहे. येत्या दोन-तीन वर्षांत सर परशुरामभाऊ महाविद्यालयात वाणिज्य शाखेकडे सर्व वर्गांचे म्हणजे पदवी परीक्षेपर्यंतचे अध्यापन सुरू होईल.

**विद्यार्थी संख्या :** कनिष्ठ महाविद्यालयात या वर्षी शास्त्र शाखेकडे ३६४, साहित्य शाखेकडे १९०, आणि

"परशुरामीय"

हार्दिक शुभेच्छा!

## दि पूना अर्बन को-ऑप. बँक लि.

२५ शुक्रवार पेठ, पुणे २.

स्थापना १९२४ दूरध्वनी ४४३७४१

औद्योगिक, शैक्षणिक व व्यापारी क्षेत्रात अग्रणी असलेल्या पुणे शहराचे मध्यवर्ती ठिकाणी, समाजातील प्रामुख्याने दुर्बल व लहान घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सातत्याने अर्धशतकाहून अधिक काळ बँकिंग व्यवसाय करीत आहे. ठेवीदारांना मुदत ठेवीवर राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा १ टक्का व्याज जादा दिले जाऊन ठेव-विमा योजनेद्वारा ठेवींना संरक्षण दिले जाते.

विश्वासपूर्ण व विनम्र सेवेसाठी संपर्क साधा.

**अर्थसंचय**

१. भाग भांडवल ११५२४०
२. गंगाजळी व अन्यनिधी १३४३५२१
३. ठेवी ७४०४५५०
४. गुंतवणूक ४२५५७५०
५. कर्ज ५१६७६१०

**मा. य. बा. जेधे**
अध्यक्ष

**मा. शि. धों ढमढेरे**
कार्याध्यक्ष

**मा. बा. ना. वीर**
उपकार्याध्यक्ष

**श्री. प्र. बा. गायकवाड**
व्यवस्थापक

वाणिज्य शाखेकडे १९० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**परीक्षांचे निकाल :** १९७८ च्या मे महिन्यात उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या १२ वीच्या परीक्षेत शास्त्र शाखेकडे ४०८ बसले होते. त्यापैकी २९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शास्त्र शाखेकडे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ७२. ५४ आहे. विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे शास्त्र शाखेकडे १२ वीच्या परीक्षेत उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीत या महाविद्यालयाचा श्री. बळवंत पाटील हा विद्यार्थी गुणानुक्रमे १८ वा आला.

साहित्य शाखेकडे १८६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८१. १८ आहे. साहित्य शाखेकडील उच्च माध्यमिक मंडळाने प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता यादीत या महाविद्यालयाचा श्री. रोहित कावळे हा विद्यार्थी गुणानुक्रमे चवथा आला.

महाविद्यालयाने घेतलेल्या अकरावीच्या परीक्षेस शास्त्र, साहित्य आणि वाणिज्य शाखेकडे गुणानुक्रमे पहिले आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

**शास्त्र शाखा :**

( १ ) श्री. विवेक उटगीकर : गुणानुक्रमे पहिला
( २ ) श्री. दीपक कुलकर्णी : गुणानुक्रमे दुसरा
( ३ ) श्री. प्रदीप महाजन : गुणानुक्रमे तिसरा
( ४ ) श्री. कु. सुधा म्हैसुरकर : गुणानुक्रमे चवथी.

**साहित्य शाखा :**

( १ ) कु. प्रज्ञा राजे : गुणानुक्रमे पहिली
( २ ) कु. भट्ट हेमा : गुणानुक्रमे दुसरी
( ३ ) कु. रंजना दीक्षित : गुणानुक्रमे तिसरी.

**वाणिज्य शाखा :**

( १ ) श्री. भालचंद्र पटवर्धन : गुणानुक्रमे पहिला
( २ ) श्री. रामचंद्र पाटील : गुणानुक्रमे दुसरा
( ३ ) कु रश्मी बर्वे : गुणानुक्रमे तिसरी.

या तिन्ही शाखांकडे गुणानुक्रमे प्रथम तीन विद्यार्थ्यांना व सर्व विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना खास पारितोषिके देऊन महाविद्यालयाने त्यांचा दि २२.४.१९७८ रोजी गौरव केला.

**शिक्षक वर्ग :** कनिष्ठ महाविद्यालयात १९७८–७९ या वर्षी ४४ प्राध्यापक काम करीत आहोत. या तज्ज्ञ अध्यापकांबरोबरच वरिष्ठ महाविद्यालयातील तज्ज्ञ आणि अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा लाभ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केला जात आहे.

१९७८–७९ या वर्षी पुढील प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आलेली आहे :

( १ ) श्री. पळशीकर सुहास : राज्यशास्त्र
( २ ) कु. कर्वे माधुरी : तत्त्वज्ञान
( ३ ) श्रीमती देशपाडे वरदा : अर्थशास्त्र
( ४ ) श्री. गायकवाड रणजित : भूगोल
( ५ ) कु. मेधा पारखी : वाणिज्यशास्त्र
( ६ ) श्री. ओक दिलीप : वाणिज्य
( ७ ) कु. डांगे सुरेखा : वास्तवशास्त्र
( ८ ) कु. अरगडे संजीवनी : गणित
( ९ ) सौ निलिमा नुलकर : रसायनशास्त्र
(१०) श्री. फडके ए. आर. : जीवशास्त्र
(११) कु. कुलकर्णी मंगला : गणित
(१२) सौ. वासंती वर्तक : मराठी

**ग्रंथालय :** कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विशेष प्रयत्न केले जात आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील आजची ग्रंथसंख्या ११८० आहे.

**विशेष सवलती :** गतवर्षीप्रमाणेच या वर्षीही १० वी व ११वीच्या परीक्षेत चांगले गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने मोठ्या प्रमाणावर गुणवत्ता शिष्यवृत्या जाहीर केल्या. तसेच विशेष प्रगती ज्या विद्यार्थ्यांनी दाखविली त्यांना महाविद्यालयातर्फे पुस्तकांचे संच ६.८.७८ रोजी भेट म्हणून देण्यात आले.

केवळ सहामाही व वार्षिक परीक्षेवर अवलंबून राहण्याऐवजी आणखी काही चाचणी परीक्षा घेण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर सातत्याने अभ्यास करतील अशी अपेक्षा होती.

एप्रिल १९७८ मध्ये घेतलेल्या ११ वीच्या परीक्षेत विशेष गुण मिळविणाऱ्या शास्त्र शाखेकडील विद्यार्थ्यांसाठी मे महिन्यात जीवशास्त्र व वास्तवशास्त्र ह्या विषयांचे १२ वीच्या अभ्यासात उपयुक्त ठरतील असे प्रयोग करून घेण्यात आले. या उपक्रमात वास्तवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. के. आर. कुलकर्णी यांचे व जीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. श. द. भागवत यांचे बहुमोल सहाय्य झाले.

वाणिज्य शाखेकडील ११ वीच्या परीक्षेत चांगले गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांकरिताही एक सुटीतील वर्ग चालविण्यात आला. या कामी प्रा. मावळणकर यांनी पुढाकार घेतला होता.

याखेरीज कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात, वादस्पर्धेमध्ये आणि इतर क्षेत्रात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने कामगिरी केलेली आहे. त्या विषयीचा अहवाल इतरत्र आलेला आहे.

★

न विज्ञानेन सदृशं पवित्रमिह् विद्यते ।

## सायन्स असोसिएशन

### १९७७–७८ चा अहवाल.

प्रतिवर्षाप्रमाणे ह्या वर्षी सायन्स ॲसोसिएशनचे कार्य मोठ्या जोमाने सुरू झाले. उद्घाटन समारंभ दि. २२ ऑगस्ट, १९७७ ह्या दिवशी डॉ. एस. एस. डड्डी यांच्या शुभहस्ते झाला. ह्या प्रसंगी त्यांनी "प्लॅस्टिक सर्जरी" ह्या अलीकडेच प्रगत झालेल्या तंत्रावर, स्लाईडसूच्या सहाय्याने अतिशय उद्बोधक व्याख्यान दिले. तसेच "सायन्स बुलेटिन" ह्या हस्तलिखित पाक्षिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन केले.

दि. १४ फेब्रुवारी १९७८ ह्या दिवशी प्रा. डॉ. एम्. एस्. बाळकृष्णन्, पुणे विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख, ह्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. "विज्ञान आणि समाज" ह्या विषयावरील त्यांचे विचार त्यांनी ह्या प्रसंगी अतिशय रोचक शब्दांत विशद केले.

प्रतिवर्षाप्रमाणे ह्याही वर्षी शास्त्रीय कूट स्पर्धा आयोजित केल्या होत्या. पहिल्या फेरीत ११ वी व १२ वी शास्त्रसंघ व प्रथमवर्ष शास्त्र संघ स्पर्धक होते. प्रा. कृ. रा. कुलकर्णी, वास्तवशास्त्र विभाग प्रमुख, ह्यांनी स्पर्धेचे संचालन केले. स्पर्धेमध्ये ११।१२ वीचा संघ विजयी झाला. दुसऱ्या फेरीमध्ये द्वितीय वर्ष शास्त्र व तृतीय वर्ष शास्त्र संघ स्पर्धक होते. प्रा. श. द. भागवत, जीवशास्त्र विभाग प्रमुख संचालक होते. तृतीयवर्ष शास्त्रसंघ ह्या फेरीत विजयी झाला. तिसऱ्या फेरीत ११ वी १२ वी शास्त्र संघ व तृतीय वर्ष शास्त्र संघ हे स्पर्धक होते. प्रा. डॉ. दि. मु. वाघ, भूगोल विभाग प्रमुख, संचालक होते. ११ वी व १२ वी शास्त्र हा संघ विजयी झाला.

दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणाऱ्या हस्तलिखिताव्यतिरिक्त शास्त्र विषयासंबंधी निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून व शास्त्र विषयाला वाहिलेल्या मासिकांतून प्रसिद्ध होणारे लेख, स्फुटे इत्यादींची कात्रणे "सायन्स इन्फर्मेशन ब्युरो"मध्ये लावली जात होती. रसायन विभागातील प्रा. द. अ. भागवत व श्री. व्ही. ए. जाधव ह्यांनी हे काम पाहिले.

निबंधस्पर्धा सायन्स असोशिएशनतर्फे आयोजित केली होती. स्पर्धेसाठी दोन गट पाडण्यात आले होते. ११ वी, १२ वी व प्रथमवर्ष शास्त्र ह्या वर्गाचा कनिष्ठ गट व द्वितीयवर्ष शास्त्र व तृतीयवर्ष शास्त्र ह्या वर्गाचा कनिष्ठ गट. कनिष्ठ गटाने खालील विषयावर निबंध सादर केले.

(१) रेकॉर्डिंग अँड रीप्रॉडक्शन ऑफ साऊंड.
(२) सोशल बिहेव्हिअर ऑफ इन्सेक्टस.
(३) सिम्बायॉसिस.
(४) नॅचरल रिसोर्सेस इन इंडिया अँड दी नीड ऑफ देअर कॉन्झर्व्हेशन.
(५) हिस्टरी ऑफ ॲटोमिक स्ट्रक्चर.

वरिष्ठ गटाने खालील निबंध सादर केले.

(१) युझेस ऑफ रेडिओ आयसोटोप्स इन मेडिसीन अँड ॲग्रिकल्चर.
(२) जेनिटिक कोड.
(३) प्रॉब्लेम्स ऑफ इंडस्ट्रियल पोल्युशन इन इंडिया.
(४) दी रोल ऑफ मिचेलसन मोर्ले एक्सपेरिमेंट इन दी स्पेशल थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी.

कनिष्ठ गटातील रु. २०।– चे प्रथम पारितोषिक कु. ज्योती नाझरे, प्रथमवर्ष शास्त्र, हिने पटकाविले. तसेच रु. १५।– चे दुसरे पारितोषिक कु. प्राची क्षीरसागर, ११ वी शास्त्र हिने मिळविले.

वरिष्ठ गटातील रु. २०।–चे प्रथम पारितोषिक विजेते श्री. चं. मो. अवचट, तृतीयवर्ष शास्त्र, हे आहेत. तसेच रु. १५।– चे द्वितीय पारितोषिक विजेत्या कु. कुमुदिनी दानवे, द्वितीयवर्ष शास्त्र ह्या आहेत. दोन्ही गटांत मिळून एकून आठ उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

ता. १७ मार्च १९७८ ह्या दिवशी समारोप झाला. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एम. आर. भिडे, वास्तवशास्त्र विभाग प्रमुख व सायन्स फॅकल्टीचे डीन, पुणे विद्यापीठ, हे होते. प्रा. डॉ. भिडे ह्यांच्या हस्ते बक्षिस समारंभ साजरा झाला. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "ॲटमबॉंब, हायड्रोजन बॉंब व न्युट्रॉन बॉंब" ह्यासंबंधी उद्बोधक माहिती सांगितली.

**प्रा. वा. म. दाते**, *प्रमुख, सायन्स असोसिएशन*

वाणिज्यं भिन्न रूचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ।

## वाणिज्य-मंडळ

### १९७७-७८ : कार्याचा वृत्तांत

१३ ऑगस्ट १९७७ रोजी पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे डीन प्रा. प्र. चिं. शेजवलकर यांच्या हस्ते वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन झाले, या वेळी केलेल्या अतिशय उद्‌बोधक अशा व्याख्यानात त्यांनी पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यावहारिक शिक्षण आणि जीवनाभिमुखता यांचेही महत्त्व विशद केले.

दि. १२ सप्टेंबर रोजी वाणिज्य मंडळाचा पहिला कार्यक्रम झाला. या प्रसंगी मा. श्री. बाबूरावजी पारखे यांचे व्याख्यान झाले. तांत्रिक प्रगतीबरोबरच आपल्या भारतीय संस्कृतीची जोपासना करणे आवश्यक आहे हा त्यांच्या भाषणातील प्रमुख मुद्दा होता. याच वेळी विद्यार्थी विद्यार्थिनींनी त्यांच्या वर्गाच्या सहलीच्या खर्चामधून शिल्लक राहिलेल्या १०१ रुपयांची देणगी महाविद्यालयाच्या हीरक-महोत्सव निधीस दिली.

मार्च महिन्याच्या सुरुवातीस मंडळातर्फे औद्योगिक सहल आयोजित केली होती. पुण्याजवळील 'टेल्को' या प्रसिद्ध कारखान्यास भेट देऊन तेथील कार्यालयीन पद्धती व त्यासाठी वापरली जाणारी आधुनिक तांत्रिक उपकरणे यांची माहिती करून घेणे हा या सहलीमागील मुख्य उद्देश होता. सुमारे ८० विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. हाही कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला.

हीरक महोत्सवाच्या धामधुमीत दुसरे सत्र संपून गेले, त्यामुळे कार्यक्रमांची संख्या मर्यादित दिसत आहे. चालू वर्षी मात्र वाणिज्य मंडळ अनेक कार्यक्रम यशस्वी करून दाखवेल यात शंका नाही. प्राचार्य मंगळवेढेकरांनी या वर्षीच्या असंख्य कामांच्या गर्दीत वेळ काढून मंडळास मार्गदर्शन केले व सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून प्रोत्साहन दिले. कनिष्ठ महाविद्यालय-प्रमुख प्रा. शिरगुरकर यांनी जातीने सर्व उपक्रमांमध्ये लक्ष घालून बहुमोल सहकार्य दिले.

**प्रा. सु. गो. मावळणकर**
'परशुरामीय' अहवाल
कनिष्ठ महाविद्यालय, वाणिज्य विभाग

साथी हाथ बढाना

## राष्ट्रीय सेवा योजना वृत्तांत

### १९७७-७८

१९७७-७८ हे वर्ष राष्ट्रीय सेवा योजनेचे म्हणून कनिष्ठ महाविद्यालयास पहिलेच वर्ष होते. या वर्षाच्या योजनेत संपूर्ण महाविद्यालयातर्फे १०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे २७ विद्यार्थी सहभागी झाले. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे या योजनेतील उपक्रम संयुक्त स्वरूपात कार्यवाहीत आणण्यात आले. या वर्षी योजनेचे नेतृत्व प्रा. वि. रा. शिरगुरकर व प्रा. प्र. पां. शिरोळे यांनी केले. वर्षभरात खालील महत्त्वाचे कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले.

(१) पुणे-हडपसर जवळील उंड्री-पिसोळी या गावी गावकऱ्यांच्या सहकार्याने आमच्या विद्यार्थ्यांनी सुमारे तीनशे यार्डांचा गावठाणाकडे जाणारा मुरमाचा रस्ता बांधून दिला.

(२) नेहमीप्रमाणे आमच्या महाविद्यालयाच्या प्रांगणातील गाजर गवत उपटून टाकण्याचा कार्यक्रम तीन दिवस घेण्यात आला.

(३) पहिल्या व दुसऱ्या सत्रात नवीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे या हेतूने प्रा. शिरगुरकर व प्रा. शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'गटचर्चा' आयोजिण्यात आल्या. त्यासाठी 'राष्ट्रीय सेवा योजनेची आधुनिक काळातील उपयुक्तता', 'मी राष्ट्रीय सेवा योजनेत का दाखल झालो ?', 'प्राथमिक शाळांची उपस्थिती वाढावी या दृष्टीने ही योजना काय करू शकेल ?' इत्यादी विषयांवर गट-चर्चा झाल्या.

(४) गांधी जयंतीच्या दिवशी श्री. विनोबाजींच्या पवनार आश्रमात कार्य करणारे श्री. बाबासाहेब जाधव यांचे 'गीताई'वर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

(५) प्रतिवर्षाप्रमाणे आमच्या विद्यार्थ्यांनी महंमदवाडी या योजनेच्या दत्तकगावी गावकऱ्यांना सदिच्छा-भेट दिली. नवीन विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनात मिसळण्याची व गावकऱ्यांशी बोलण्याची एक चांगलीच संधी त्यामुळे मिळाली.

(६) १३ जानेवारी १९७८ या दिवशी रक्तदानाचा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या दिवशी १०० बाटल्या रक्त गोळा केले. रेडक्रॉसच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य झाले.

( ७ ) या वर्षाचा विशेष उल्लेखनीय कार्यक्रम— आमच्या विद्यार्थ्यांनी आंध्रच्या वादळग्रस्तांसाठी दहा दिवस सातत्याने धडपड करून सबंध पुण्यातून कपडे गोळा केले. विविध प्रकारचे सुमारे ३००० कपडे गोळा केले व 'दैनिक सकाळ'च्या ट्रस्टतर्फे हे कपडे आंध्रला पाठविण्यात आले.

( ८ ) या योजनेचा वार्षिक सांगता-समारंभ ६ मार्च १९७८ रोजी झाला. प्राचार्य मंगळवेढेकरांच्यां उपस्थितीत प्रा. शिरगुरकरांनी वर्षभराच्या कार्याचे स्वरूप समजावून सांगितले. प्राचार्यांच्या दोन उद्बोधक शब्दांनंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

**प्रा. शिरोळे,** राष्ट्रीय सेवा योजना

*

सदैव सैनिका पुढेच जायचे

राष्ट्रीय छात्रसेना

## ३६ महाराष्ट्र पलटण पायदळ विभाग

### ( अहवाल १९७७–१९७८ )

नवीन शैक्षणिक आकृतिबंधामुळे वाढलेल्या अभ्यासक्रमामुळे छात्रसेनेत प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांचा उत्साह पूर्वीइतका राहिला नाही. एका प्लॅटूनची संख्या पूर्ण करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागला.

२५ जुलै १९७७ या दिवशी दुपारी साडेचार वाजता स. प. च्या लेडी रमाबाई हॉलमध्ये सिग्नल युनिटचे छात्रसेनाधिकारी मेजर कृष्णन् यांचे 'सैन्यातील उत्कर्ष संधी'वर भाषण झाले. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य श्री. मंगळवेढेकर होते.

२१ ऑगस्ट १९७७ या दिवशी छात्रसैनिकांनी स. प. च्या विद्यार्थी वसतिगृहामागील मैदानावरील गाजर गवत निर्मूलनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. उप-प्राचार्य डॉ. केरूर यांनी छात्रसैनिकांचे अभिनंदन केले.

४ सप्टेंबर १९७७ या दिवशी लेफ्टनंट अ. शां. जानवे यांनी सपमतील छात्रसैनिकांसह कात्रज बोगद्यातून सिंहगडपर्यंत 'साहस सहल' ( हायकिंग व ट्रेकिंग ) यशस्वीरीत्या पार पाडली.

१७ नोव्हेंबर १९७७ ते २९ नोव्हेंबर १९७७ या दरम्यान देवळाली ( नासिक ) येथे झालेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात स. प. म. चे सतरा छात्रसैनिक उपस्थित होते. राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रमाणपत्र परीक्षांचे निकाल पुढीलप्रमाणे.

'सी' प्रमाणपत्रपरीक्षा निकाल टक्केवारी ७५ टक्के
'बी' प्रमाणपत्रपरीक्षा ,, ,, ६२ टक्के

सार्जंट भावसार हेमंत राजाराम ह्याने बी ग्रेडमध्ये बी' प्रमाणपत्रपरीक्षा ( ३२५/५०० ) उत्तीर्ण होऊन सपमचे नाव राखले. त्याचे मनःपूर्वक अभिनंदन !

**प्रा. अविनाश एस. जानवे,** लेफ्टनंट
छात्रसेनाविभाग प्रमुख, स. प. महाविद्यालय

*

शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ।

## जिमखाना विभाग – १९७७–७८ चा अहवाल

१९७८–७९ या वर्षात कनिष्ठ महाविद्यालयाचे आंतर-महाविद्यालयीन खेळांचे सामने आयोजित करण्यात आले होते. शाळेतून मुले कनिष्ठ महाविद्यालयात येतात. या दोन वर्षांच्या काळात जर खेळांचे सामने भरविण्यात आले नाहीत तर त्या खेळाडूंना खेळता येणार नाही व एकदम वरिष्ठ महाविद्यालयात खेळ खेळावे लागतील. साहजिकच त्यांच्या खेळामध्ये दोन वर्षांचा खंड पडेल. ही गोष्ट लक्षात घेऊन पुण्यातील काही कनिष्ठ महाविद्यालये एकत्र आली आणि एक क्रीडासमिती स्थापन करण्यात आली. आणि विविध खेळांचे सामने कनिष्ठ महाविद्यालयांनी भरविले. यामध्ये मुलांच्या व्हॉलीबॉलमध्ये आपल्या महाविद्यालयाला अजिंक्यपद मिळाले. तसेच मुलांच्या कबड्डीमध्ये उपविजेतेपद मिळाले. मुलींच्या कबड्डीमध्ये उपविजेतेपद मिळाले.

जिल्हापरिषदेतर्फे पण पावसाळी सत्रात आणि दिवाळी सत्रात विविध खेळांचे सामने आयोजित करण्यात आले. या सर्व खेळांमध्ये आपल्या महाविद्यालयाने भाग घेतला होता. या सामन्यात मुलांच्या व्हॉलीबॉलमध्ये आपल्याला विजेतेपद मिळाले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडाक्षेत्रात खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

( १ ) श्री. हसबनीस—व्हॉलीबॉल
( २ ) श्री. बहाले राजेंद्र—बॅडमिंटन
( ३ ) श्रीमती कामथे माधुरी—कबड्डी
( ४ ) अनुराधा गोखले—बॅडमिंटन

**सौ. शकुंतला कटककर,** जिमखाना संघटक

वादस्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राची क्षीरसागरने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

तसेच सोलापूर येथे झालेल्या आचार्य शांतिसागर वक्तृत्व स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या उमेश घोडकेने वैयक्तिक प्रथम क्रमांक व विनोद कुलकर्णी याने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

बेळगाव येथे झालेल्या वाङ्मयचर्या मंडळाच्या एका महत्त्वाच्या स्पर्धेत वर्षा दप्तरदारने द्वितीय क्रमांक पटकावला.

दि. दहा सप्टेंबर रोजी झालेल्या आंतर महाविद्यालयीन वादविवाद संस्थेच्या स्पर्धेत प्राची क्षीरसागरने प्रथम क्रमांकाचा मान मिळविला.

सोलापूर वक्तृत्त्वोजक सभेतर्फे चार डिसेंबरला भरविलेल्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील तसेच वैज्ञानिक विषयांवरील स्पर्धेत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने भरघोस यश मिळविले.

मराठी वक्तृत्वात सर्वप्रथम येऊन उमेश घोडकेने महाविद्यालयाला चांदीची, ५५० ग्रॅम वजनाची ढाल मिळून दिली.

विज्ञानविषयक स्पर्धेतही प्रथम क्रमाकांचा मान उमेश घोडकेलाच मिळाला. याच स्पर्धेत विनोद कुलकर्णीने वैयक्तिक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

उमेश घोडकेने याशिवाय हिंदी वक्तृत्वात द्वितीय व इंग्रजी वक्तृत्वात तृतीय पारितोषिक पटकावले. दिनांक सहा फेब्रुवारी रोजी संतबोध वक्तृत्वमंडळातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत उमेश घोडके दुसरा व वर्षा दप्तरदार तिसरी आली.

यावर्षी महाविद्यालयातर्फे "विशेष नैपुण्यविषयक पारितोषिकासाठी" उमेश घोडकेची निवड झाली. वर्षा दप्तरदार हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

यंदा आपल्या महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवाच्या सोहळ्यात वादसभेने दोन महत्त्वाचे कार्यक्रम सादर केले, ते म्हणजे 'अभिरूप न्यायालय' व 'अभिरूप लोकसभा' हे होत. त्यात कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही मोठ्यासंख्येने भाग गेतला.

**प्रा. उल्हास बापट**
कार्याध्यक्ष


बँकिंग क्षेत्रात ५० वर्षे  सहकारी क्षेत्रात ७३ वर्षे

## दि कॉस्मॉस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

**मुख्य कार्यालय**–कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मीपथ, पुणे ३०.
दूरध्वनी : ४५२७३, ४४२२९, कार्याध्यक्ष निवास : ४६७८७.

**शाखा-पर्वती-दर्शन** : ४८९/अ/२ पर्वती, पर्वतीदर्शन, पुणे ९.
दूरध्वनी : ४२३८६.

**खडकी–बोपोडी** : ३३. बॉम्बे-पूना रोड, खडकी, पुणे ३.
दूरध्वनी : ५३९३५.

**गोखलेनगर** : १०१० शिवाजीनगर, उषःकाल अपार्टमेंट, पुणे १६.
दूरध्वनी : ५७७२६.

कनिष्ठ महाविद्यालय क्रिकेट

## (विद्यार्थ्यांसाठी)

### अहवाल १९७७-७८

खास कनिष्ठ महाविद्यालयासाठी अशा क्रिकेटच्या स्पर्धा नाहीत हे लक्षात घेऊन या दृष्टीने काहीतरी करावे या उद्देशाने बाद पद्धतीचे, मर्यादित षटकांचे सामने या वर्षी आपण भरविण्याचे ठरविले. एकूण सात महाविद्यालयांनी याला प्रतिसाद दिला आणि सुरुवात तर यशस्वी रीतीने झाली.

आपला पहिला सामना नौरोसजी वाडिया महाविद्यालयाबरोबर झाला. त्यांनी सर्व बाद १२४ धावा केल्या. सुनील जोशी व जयंत कुलकर्णी या आपल्या गोलंदाजानी अनुक्रमे २४ धावांत ५ व २६ धावांत ३ गडी बाद करून उत्तम कामगिरी केली. केवळ दोन बळींच्या मोबदल्यातच आपण प्रतिस्पर्ध्याची धावसंख्या ओलांडली आणि सामना जिंकला. यात तोरवीच्या नाबाद ६६ आणि परदेशीच्या ३९ धावांचा वाटा महत्त्वाचा होता.

दुसऱ्या फेरीत बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाबरोबर खेळलेला सामना आपण गमावला. त्यांनी ६ गडी बाद २०८ धावा केल्या तर आपण ६ गडी बाद १०६ धावाच करू शकलो. कर्णधार द्रवीडने या सामन्यात ४८ धावा केल्या.

चालू वर्षी आपला संघ अधिक भरीव स्वरूपाची कामगिरी करू शकेल असा विश्वास वाटतो.

**प्रा. अ. रा. बेलसरे**
कनिष्ठ महाविद्यालय, क्रीडा विभाग

■

वादे वादे जायते तत्त्वबोध

## वादसभा

### अहवाल (१९७७-७८)

गेल्या वर्षी, दिनांक एक ऑगस्ट एकोणीसशे सत्त्याहत्तर रोजी पुणे विद्यापीठातील अधिव्याख्याते डॉ. भालचंद्र फडके यांच्या शुभहस्ते वादसभेचे औपचारिक उद्‌घाटन झाले. दिनांक तेरा जुलै रोजी वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन व निबंधलेखन यात रस घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता व यानंतर वादसभेच्या कार्याला मोठ्या उत्साहाने सुरुवात झाली.

बोर्डाच्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत बोर्डात १८ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या श्री. बळवंत रघुनाथ पाटील या शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्याच्या पालकाचे प्राचार्यांना आलेले पत्र.

शिरपूर दिनांक २० जुलै १९७८

मा. प्राचार्य मंगळवेढेकर साहेब,

स. न. वि. वि.

आपली दिनांक १५ जुलैची तार मिळाली. मजकूर कळल्यावर मला जो काही आनंद झाला तो शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही. परंतु या माझ्या मुलाच्या यशात माझ्यापेक्षा आपलाच वाटा अधिक असल्यामुळे माझा आनंद आपल्या आनंदापेक्षा कमीच आहे असे मी मानतो.

आपण माझ्या मुलावर नुसतेच शाब्दिक प्रेम केले असे म्हणता येणार नाही. त्याला अपत्यवत् वागणूक देऊन मला आपण अतिशय उपकृत करून ठेवले आहे. त्याला यशाचा मानकरी ठरविले आहे. त्याला आपण मार्गदर्शन दिले नसते तर तो या यशाचा मानकरी ठरला नसता. तरी आपण व्यक्तिशः तार व अभिनंदनाचे पत्र पाठवून आमच्या कुटुंबावर एक प्रकारची मायाच केली आहे. त्या ऋणातून आम्हाला मुक्त होणे शक्य नाही.

तरी आपणांस अशाच गरीब, होतकरू तरुणांस मार्गदर्शनाची सद्‌बुद्धी परमेश्वर देवो अशीच प्रभुचरणी प्रार्थना करून माझे मनोगत मी पूर्ण करतो.

आपला स्नेहांकित
**रघुनाथ पाटील**

आमच्या महाविद्यालयातील अनेक वादपटू विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महाराष्ट्रातील विविध वादस्पर्धांत सहभागी होऊन उज्ज्वल यश संपादन केले. नाशिक येथे दिनांक नऊ सप्टेंबर, सत्त्याहत्तर रोजी झालेल्या डॉ. चंदुबाई





अकरावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेले शास्त्र शाखेचे विद्यार्थी उन्हाळी सुट्टीमध्ये महाविद्यालयाच्या पदार्थविज्ञान आणि जीवशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळांमध्ये कार्यमग्न असताना.